वासंतिक
विशेषांक

छात्र प्रबोधन

सौर चैत्र, शके १९३५ । वर्ष १३ अंक ७
मूल्य रुपये पंचवीस



वसंतबहार !...

(अंकातील पान क्र. ४ पाहा)

(सौजन्य : संकेतस्थळे)

छात्र प्रबोधन

वासंतिक विशेषांक सौर चैत्र, शके १९३५। वर्ष १३ अंक ७

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै – ऑगस्ट १९९२) २४९ वा अंक, वर्ष २१ अंक ९

प्रकाशन दिनांक – ११ चैत्र, शके १९३५/१ एप्रिल २०१३

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

• अंतरंग •

२. **संवाद** – महेन्द्र सेठिया

३. माहितीपर... **रंग-गंधोत्सव !!** – डॉ. कांचनगंगा गंधे

७. कथा ... **चूक** – आश्लेषा महाजन

१२. कविता... **वसंतवारे !** – सुनिल शिनखेडे

१३. माहितीपर... **सफर आकाशाची...** – डॉ. प्रकाश तुपे

१५. वाचलेच पाहिजे असे काही... **ध्यास जिंकण्याचा** – नीलिमा करमरकर

१७. संस्था परिचय... **विद्यार्थी साहाय्यक समिती एक कल्पवृक्ष** – प्रभाकर पाटील

१९. ललित... **ऐकतो मराठी, वाचतो मराठी** – चंद्रशेखर हडप

२१. एकांकिका... **रिंगा रिंगा** – जयश्री काटीकर

२६. माहितीपर ... **आरोग्यम् धनसंपदा!** – डॉ. रमेश गोडबोले

२९. ललित ... **रे हिंद बांधवा थांब या स्थळी...** – राम जोशी

३१. कल्पकतेला वाव... लेखांक – १ **कल्पकता आपल्या 'आसपास'ची** – डॉ. नलिनी गुजराथी

३४. कविता... **मुक्त गाणं** – राजाराम बनसकर

३५. मुलांचे पान... **अविस्मरणीय लंडन !!** – चि. रुचिर कुलकर्णी

३७. कथा ... **गंगू गायीची गोष्ट** – प्रतिमा इंगोले

४१. निर्णयातील स्वावलंबन... लेखांक – ४ **निर्णयातील प्रभाव व स्वभाव** – सुभाष देशपांडे

४३. **हस्तलिखित स्पर्धा मागोवा**

४५. स्फुटं ... **हसता... हसता...**

४६. **व्यक्तिकार्याविषयी आवाहन...**

४७. **माझ्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'**

४८. **सुट्टीतील शिबिरे**

याशिवाय– विज्ञान प्रयोग (६, ११), ऐका ऽ हो ऐका ऽ (१०),विद्यार्थी विशेषांक आवाहन (१२), बौद्धिक खेळ (१६, ४२), कार्यानुभव घ्या, समृद्ध व्हा (२०), जोडीकार्य आवाहन (२८)

पानाखालील तळटिपेतील माहितीपर ओळी आत्तापर्यंतच्या **भारतरत्न पुरस्कार** प्राप्त व्यक्तींची नावे दिली आहेत.

मुखपृष्ठाविषयी – मुखपृष्ठावरील चित्र हे जलरंगातील आहे. उंचच उंच झाडांमधून रस्त्यावर पडलेल्या उन्हामुळे, 'ऊन सावली'चा खेळ रस्त्यावर दिसतो आहे. पुण्यातील भांडारकर रस्ता, प्रभात रस्ता यांना जोडणारा हा दुतर्फा झाडी असलेला रस्ता आहे. पूर्वी त्याला 'कॅनॉलचा रस्ता' असं म्हणत. आता तिथं 'जॉगिंग ट्रॅक' आहे.

– मिलिंद मुळीक

♦ संपादक, प्रकाशक, मुद्रक ♦
महेन्द्र सेठिया

♦ कार्यकारी संपादक ♦
शिल्पा कुलकर्णी

♦ संपादक मंडळ ♦
शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन

♦ मुखपृष्ठ ♦
मिलिंद मुळीक

♦ आतील चित्रे ♦
राहुल देशपांडे

♦ संपर्क पत्ता ♦
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९
संकेतस्थळ
www.chhatraprabodhan.org
ई-मेल
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

ऐकाऽ हो ऐकाऽऽ

'छात्र प्रबोधन' मधील साहित्याला 'ऑडिओ-व्हिडिओ' ची पूरक जोड !!

संगणकावर पाहा/ऐका

तपशीलासाठी –पृष्ठ क्र. १० वर पाहा.

सौजन्य : श्रीनिवास कुलकर्णी, राहुल भानोसे, अमेय कुलकर्णी, ओंकार प्रधान

मासिकाची वर्गणी : वार्षिक: ₹ १८०, द्वैवार्षिक: ₹ ३४०, त्रैवार्षिक: ₹ ५००, दशवार्षिक: ₹ १,५००. **या अंकाची किंमत :** ₹ २५ (पुण्याबाहेरील धनादेशासाठी – ₹ २० जादा, घरपोच दिवाळी अंकासाठी– प्रतिवर्षी ₹ ४० जादा)

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

कोकिळेच्या कूजनाने, आम्रतरू बहरला। चैत्राची गुढी उभारा, नववर्षाच्या स्वागताला।।

भारतरत्न पुरस्कार - श्री. चक्रवर्ती राजगोपालचारी, स्वातंत्र्यसेनानी, **१९५४**

संवाद

संवेदनशील अन सह-अनुभूती घेणाऱ्या प्रिय प्रबोधकांनो,

हा अंक तुमच्यापर्यंत पोहोचेल तेव्हा परीक्षा संपून, सुट्टीचा आनंद लुटायला सुरुवात झाली असेल. काय-काय मनसुबे रचलेत या सुट्टीत? कोणत्याही प्रकारच्या सहली-शिबिरांमध्ये सहभागी होणार असाल तर पुढाकार घेऊन, जबाबदारी घेऊन, मनापासून सहभागी व्हा. तुमच्या मनातली जिज्ञासा, कुतूहल सतत जागं ठेवा! निव्वळ माहितीपर प्रश्नांमध्येच अडकून न पडता, का? कसं? असंच का? यांसारखे प्रश्न विचारून प्रक्रिया, हेतू समजून घ्यायचा प्रयत्न करा. मला खात्री आहे, की त्यामुळे शिबिरे-सहली तुम्हाला दीर्घकाळ उपयोगी पडतील. शिबिरे निवडतानाही कृतिशीलतेला, अनुभवांना, अभिव्यक्त व्हायला, गटकार्याला वाव देणारी शिबिरे निवडण्यावर नक्कीच भर द्या. प्रबोधिनीतर्फे या सुट्टीत होणाऱ्या विविध शिबिरांची, उपक्रमांची माहिती या अंकात ठिकठिकाणी व शेवटच्या पानावर तुम्हास वाचायला मिळेल. तुमच्या आवडीनुसार जरूर त्यात सहभागी व्हा !

या अंकात 'वसंत' ऋतूतील सृष्टीसौंदर्याचे वर्णन विविध लेख, कविता, चित्रांमध्ये तुम्हाला वाचायला, पाहायला मिळेल. फुलांच्या रंग-गंधांनी आणि नवनिर्माणाच्या सोहळ्यांनी, कोकिळेच्या तानांनी अन् चैत्राच्या पालवींनी बहरणाऱ्या वसंत ऋतूचा आनंद आपण सारेच लुटूया. पण त्याचबरोबर महाराष्ट्रभर पडलेल्या भीषण दुष्काळाचीही जाण ठेवूया. आपल्याच वयाच्या गावाकडच्या मुला-मुलींना, तीन-चार किलोमीटर अंतरावरून, छोट्या झऱ्यातील पाणी वाटी-वाटीनं काढून, २-३ घागरी पाणी डोक्यावरून आणावं लागतं. त्या मुलांचे दिवसातले २-३ तास त्यातच जातात. जनावरांची स्थिती तर अजूनच बिकट. 'आधीच दारिद्र्याची परिस्थिती, त्यात दुष्काळाच्या झळांचे चटके ही कुटुंबं कशी सहन करत असतील?' असा प्रश्न तुमच्या मनात निर्माण होतो का? दुष्काळाचं वर्णन करणाऱ्या बातम्यांनी तुम्ही अस्वस्थ होता का? दुसऱ्यांची दु:खं समजून घेता येणं हे जिवंतपणाचं, माणूसपणाचं लक्षण आहे.

निव्वळ स्वत:मध्येच मश्गुल न राहाता, आपल्या आजूबाजूच्या माणसांबद्दल, आसपासच्या परिस्थितीबद्दल तुमचं मन संवेदनशील असायला हवं. ही संवेदनशीलता कशातून वाढेल? तर त्यासाठी सह-अनुभूती घ्यायला हवी. या सुट्टीत आपल्या गावाच्या आसपासच्या दुष्काळग्रस्त गावात जाऊन तुम्हाला 'प्रत्यक्ष परिस्थिती' पाहता येईल का? तेथील गावकऱ्यांशी बोलून दुष्काळाची धग समजून घेता येईल का? त्यांच्या बरोबर त्या परिस्थितीत १-२ दिवस राहता येईल का? त्यातून शब्दांच्या पलीकडची अनुभूती तुम्हास येईल. स्वत: घेतलेल्या या अनुभवांबरोबरच दुष्काळाचं वर्णन करणाऱ्या बातम्या, लेख, कहाण्या, कादंबऱ्या, पुस्तकं वाचून, चित्रपट पाहून मनानं त्या अनुभवांच्या जवळ तुम्हाला जाता येईल का? त्यावर आपल्या आई-बाबांशी, मित्रांशी, भावंडांशी बोलून त्यातील गांभीर्य समजून घेता येईल का? भावनिक संवेदनशीलतेबरोबरच बुद्धीच्या साहाय्यानं दुष्काळाची कारणं समजून घेता येतील का? त्यावरची 'उत्तरं' आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी येणाऱ्या अडचणींवर चर्चा करता येईल का? अशी 'उत्तरं' ज्यांनी यशस्वी करून दाखविली त्यांची कामं पाहता येतील का? त्यांच्याशी गप्पा मारून त्यांच्या अडचणी समजून घेता येतील का?

दुष्काळग्रस्तांचं जगणं थोडंतरी सुसह्य करण्यासाठी आपल्याला खारीचा वाटा कसा उचलता येईल? त्या गावात उत्पादित होणारे पदार्थ थोडी अधिक रक्कम देऊन आपण खरेदी करू शकू का? तेथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी वह्या, पुस्तके वा अन्य मार्गांनी साहाय्य करू शकू का? या सुट्टीत, या आणि अशा प्रश्नांची उत्तरं शोधण्याचा, त्यावर कृतिरूप प्रतिसाद देण्याचा प्रयत्न करावा, असं मनापासून वाटतं. सह-अनुभूती घेताना थोडे कष्ट पडतील; पण त्यातून जो मानसिक-भावनिक ओलावा निर्माण होईल; तो तुमच्या जगण्याला अधिक अर्थ मिळवून देईल. म्हणजे काय ते तुम्ही आई-बाबांशी बोलून, जमलं तर मलाही संपर्क करून समजून घ्या.

गुढीपाढव्यानिमित्त सुरू होणाऱ्या 'विजय' या नवीन संवत्सरात (वर्षात) तुम्हा सर्वांच्या मनातला हा ओलावा वाढावा, त्यासाठी संवेदनशीलतेनं विविध परिस्थितींची सह-अनुभूती तुम्ही घ्यावी, यासाठी मनापासून शुभेच्छा!

सस्नेह तुमचा,

(महेन्द्र सेठिया)

गुढीपाडव्याचा सण आला, उभारा रे गुढी। नव्या वर्षाचं लेणं, सोडा मनातली अढी ।।

भारतरत्न पुरस्कार - डॉ. सर. सी. व्ही. रामन, शास्त्रज्ञ, भौतिकशास्त्रातील कामगिरीबद्दल, **१९५४**

प्रायोजक - व्ही. व्ही. आर्किटेक्ट प्रा. लि., पुणे.

बदलत्या ऋतूची चाहूल आपल्याला निसर्गाच्या बदलत्या विभ्रमातून ऐकू येते. कधी पानगळ, कधी नवी पालवी, तर कधी फुलांचा बहर ! वेगवेगळ्या ऋतूत फुलणारी वेगवेगळी फुलं रूप-रंग-गंधाने मन प्रसन्न करतात. *वसंत ऋतूत तर लाल, केशरी, पिवळ्या, पांढऱ्या अशा फुलांच्या बहरातून निसर्गातील रंगपंचमीच अनुभवायला मिळते. या लेखात वसंत ऋतूत फुलणाऱ्या फुलांची ओळख शास्त्रीय अंगाने तरीही अतिशय लालित्यपूर्ण भाषेत डॉ. कांचनगंगा गंधे यांनी करून दिली आहे!*

रंग-गंधोत्सव !!

- कांचनगंगा गंधे

Tag No. CP130711 ActiveLink | कवितांचा व्हिडिओ पाहा
तपशीलासाठी पृ. क्र. १० पाहा.

पौषातलं धुकं ओसरायला लागलं, की हेमंत ऋतू लयाला गेल्याचं जाणवतं. माघातल्या थंडीचा तडाखा कमी व्हायला लागला, की पानगळीच्या शिशिर ऋतूची सांगता होते. फाल्गुनातल्या उन्हाच्या झळा वसंतऋतूच्या आगमनाची आठवण करून देतात. चैत्र, वैशाखात तर वसंत ऋतू अगदी शिगेला पोहोचलेला असतो. पानगळ झालेल्या वृक्षांवर येत असलेली मऊ, लुसलुशीत पोपटी पालवी आणि रंगी-बेरंगी फुलतुऱ्यांचा या ऋतूत येणारा ऐश्वर्याचा खजिना म्हणजे कवी, लेखकांना पर्वणीच! फुलाच्या निरनिराळ्या कुळातले वैविध्यपूर्ण प्रकार, विविध आकार, भुरळ पाडणाऱ्या रंगांमुळे आणि मधाच्या साठ्यांमुळे फुलांवर झेपावणारे छोटेखानी पक्षी, किडे, मधमाशा, फुलपाखरं यांची भिरभिरही याच ऋतुतली! नकळत त्यांचा वृक्षांच्या नवनिर्मितीसाठी हातभार लागतो. या सर्वांचं सखोल निरीक्षण आणि संशोधन करून वनस्पती सृष्टीचं रहस्य उलगडण्याची संधीही शास्त्रज्ञांना मिळते तीही या वसंतऋतूतच !

ठरावीक ऋतूत अनेक मोठ्या वृक्षांची पानगळ होणं, नवीन पालवी फुटणं, फुलं येणं, फळांच्या - बिजांच्या रूपानं नवनिर्मिती होणं, बीज रुजणं, वाढणं अन पुन्हा पानगळ होणं हे सृष्टीतलं चक्र अव्याहतपणे चालू आहे, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. आणि या घटनांचा आत्मा म्हणजे वसंतऋतूच आहे !

पळस

वनस्पती सृष्टीत वसंतऋतूची चाहूल लागते ती पर्णहीन झालेल्या; पण मखमली, केशरी रंगांच्या फुलांनी लगडलेल्या 'पळस' वृक्षावर ! रानात अंगार ओतल्यासारखा जागोजागी फुलणारा 'पळस' 'जंगलज्योत' म्हणूनही ओळखला जातो. त्याच्या मऊ, लुसलुशीत, मखमली शेंगेत एकच बी असल्यामुळे वनस्पतीशास्त्रज्ञ त्याला 'ब्युटीया मोनोस्पर्मा' म्हणतात. (मोनॉस - एक; स्पर्मा - बीज). कडेकपारीत, पडक्या दगडी भिंतीत जिथे चुनखडी जास्त आहे अशा ठिकाणी पानांच्या बेचक्यातून छोट्या पुंगळीसारखी असंख्य फुलं असलेली 'धायटी' याच दिवसात फुलते. लालभडक फुलांतून पिवळसर केशरी पुंकेसर बाहेर येतात, तेव्हा तिथेही अंगार फुलल्यासारखा वाटतो. म्हणून धायटीला 'ताम्रपुष्पी', 'वन्हीशिखा' अशी नावं आहेत तर तिचे शास्त्रीय नाव 'वुडफोर्डीया फ्रुटीकोसा' आहे. निष्पर्ण झालेल्या वृक्षावर मऊ, मुलायम पण टपोऱ्या पिवळ्या जर्द 'गणेरी' च्या फुलांतून बावनकशी सोनं तापवल्यासारखे पूंकेसर जेव्हा मध्यभागी ताठ उभे राहिल्यासारखे दिसतात, तेव्हा पिवळ्या-सोनेरी-नारिंगी रंगाचं लावण्य अन् फुलाचं सौष्ठव बघत राहावसं वाटतं! अशा या 'कॉक्लोस्पर्मम्' वृक्षावर छोटेखानी पक्ष्यांची 'ये-जा' बघणं म्हणजे पर्वणीच! या फुलांचं सौंदर्य लयाला जात असतानाच पिवळ्या रंगाची कमतरता भासू नये, म्हणून की काय पिवळ्या जर्द रंगाचा 'टॅबुबिया' जेव्हा नखशिखान्त फुलतो

काटेसावर

तेव्हा कुबेर स्वर्गातून 'सोनियाच्या' राशी ओतत असल्याचा भास होतो. त्याच्याच बरोबर त्याचे गुलबट-जांभळट आणि पांढऱ्या फुलांचे भाईबंदही तेव्हाच फुलतात. त्यांच्या मोहक रंगामुळं उन्हाची तीव्रता कमी झाल्यासारखी वाटते. जसा-जसा उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत जातो, तसे-तसे जणू फिकट पिवळ्या-हिरव्या घट्ट पेल्यात पाच ठसठशीत पाकळ्यांची तांबडा रंग असलेली 'काटेसावरी'ची फुलं फुलतात. हा वृक्ष लहान असताना त्याच्या खोडावर त्रिकोणी काटे असतात. झाड मोठं होत असताना त्याच्यावरचे काटे गळून पडतात; पण खोड वाढत असलेल्या ठिकाणी मात्र ते टिकून असतात. फुलांमध्ये खूप मध असल्यामुळे असंख्य प्रकारच्या पक्ष्यांची लगबग सकाळपासून संध्याकाळपर्यंत या 'शाल्मली' अर्थात 'काटे सावरी' अर्थात (बॉम्बॅक्स)वर चालू असते. त्यावेळी या पक्ष्यांद्वारे नवनिर्माणाचं कार्यही पार पडतं..! मध संपला की फुलं जमिनीवर टपाटप गळतात आणि जमिनीवर सुंदर रांगोळी घातली जाते. याच्याच कुळातल्या 'सिबा'ला मात्र फिकट बदामी-पिवळट रंगाची फुलं येतात. ती एवढी आकर्षक नसतात. 'काटेसावर' फुलायच्या आतच त्याला छोटी लांबट फळंही येतात नवनिर्माणाचं कार्य सुरळीत होण्यासाठीच ही निसर्गाची योजना तर नसेल ना?

पांढऱ्या, गुलाबी फुलांचा 'ग्लेरिसिडीया' जेव्हा फुलतो, तेव्हा झाडावर आईस्क्रीमचे गोळे ठेवल्याचा भास होतो. पण याच्या कडवट वासामुळे काही ठरावीकच किडे त्यावर आलेले दिसतात. या फुलांच्या पाकळ्यांची रचना जरी पळसाच्या फुलांसारखी असली, तरी त्याची फुलं आणि पाकळ्या छोट्या असतात. ग्लेरिसिडीयाच्या पाकळीचा आकार उंदराच्या कानासारखा दिसतो म्हणून त्या वृक्षाला 'उंदीरकानी' असंही नाव आहे.

रानावनामध्ये भटकंती करताना फांदीच्या डहाळीच्या टोकागणिक छोटे जपानी पंखे उलगडावे तसे केशरी, शेंदरी, तांबड्या रंगाच्या 'रानपांगाऱ्याच्या' फुलांचे गुच्छ फुलतात, तेव्हा फुलांचा नाजूक डौल डोळ्यांचं पारणं फेडतो. त्याच्या फुलांच्या रंगामुळे त्याला 'पळसपांगारा' असंही नाव दिलंय ! पळसाचं आणि रानपांगाऱ्याचं कूळ आणि उपकूळ एकच असलेल्या या वृक्षाला वनस्पतीशास्त्रात 'एरिथ्रिना सुबरोझा' म्हणतात. याचाच एक जवळचा भाईबंद 'एरिथ्रिना इंडिका' (म्हणजेच 'एरिथ्रिना व्हॅरीगेटा') याच दिवसात पण थोड्या उशीरानं फुलतो. या पांगाऱ्याची फुलं रानपांगाऱ्यापेक्षा मोठी आणि लालभडक असल्यामुळे याला 'रक्तपुष्प' किंवा 'इंडीयन कोरल ट्री' अशीही नावं आहेत. या उपकुळातल्या सर्वच फुलांच्या पाकळ्यांची रचना फुलपाखराच्या पंखांसारखी दिसते.

वसंतऋतूत रानावनात रंगोत्सवाला उधाण आलेलं असतं! खोडावर, फांद्यांवर जिथे जागा मिळेल तिथे, पैंजण बांधावेत तशी जांभळ्या-निळ्या 'अंजनी'ची शास्त्रीय भाषेत 'मेमेसिलॉन अंबेलॅटम'ची फुलं जेव्हा फुलतात तेव्हा मुक्तेश्वरांनी म्हटलेल्या, 'पुष्पधुळीमाजी लोळे वसंत'ची आठवण आल्याशिवाय राहत नाही. त्याच सुमारास 'वावळा' हॉलोपटेलिया फळाला आलेला असतो. पातळ, कोवळ्या, चपट्या, पोपटी रंगाच्या फळांचे घोसच्या घोस झाडांवर लटकतात तेव्हा दुरून पाहाणाऱ्याला ही 'फुलं की फळं' असा संभ्रम पडतो. या 'होलोपटेलिया'च्या फळावर कोवळी उन्हं पडली, की तेच पोपटी घोस सोन्यासारखे चमकतात. पोपटी हिरव्या रंगाच्या 'पानाच्या अशोकाला' (पॉलीअॅलथिया लाँगिफोलि) कोवळी पालवी फुटते, तेव्हा त्याच्या पानाच्या बेचक्यात हिरव्या रंगाचीच फुलं येतात. त्या

फुलांत न्हाली पहाट ओली, क्षितिजावरती चंद्र झुले। नभात भिजल्या केशरीयांचे रंग फुलावर ओघळले ।।

भारतरत्न पुरस्कार - डॉ. श्री. भगवान दास, स्वातंत्र्यसेनानी, **१९५५**

प्रायोजक - श्री. अजित भिडे (डायरेक्टर, अॅसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.) पुणे ☎ २५३८०४०६

दोहोंचा रंग एकमेकात इतका मिसळलेला असतो की अगदी बारीक निरीक्षण केलं तरच ही फुलं आहेत हे कळतं. त्या फुलांचा रंग पिवळट-हिरवा असतो. ‘महॉगनी’, ‘शिसम’ (डालबरजिया शिसू) यासारख्या महाकाय वृक्षांना वसंतऋतूतच पालवी फुटते, त्याचवेळेस हिरवट, पिवळ्या छोट्या मंजिऱ्या असलेली फुलं येतात; पण पानांच्या पसाऱ्यात ती नीट दिसत नाहीत. किड्यांमार्फत परागीभवन झाल्यावर या नाजूक फुलांचा सडा पडतो तेव्हा वसंतऋतुतल्या रंगोत्सवात धरणीही सहभागी होते असं वाटतं! रानात वाढणाऱ्या ‘गरिबी’च्या एन्टाडाच्या वेलावर फिकट पिवळ्या रंगांच्या नाजूक फुलांचे तुरे वसंतात येत असले, तरी त्याची ४ ते ५ फूट शेंग होण्यासाठी या वेलीला वर्षाऋतूच्या अखेरपर्यंत वाट पाहावी लागते.

वसंतऋतूच्या आगमनापासून ते वसंतऋतू संपेपर्यंत विविध प्रकारची, रंगांची असंख्य फुलं सहभागी होतात. पांढऱ्या शुभ्र फुलांचा ‘काळा कुडा’ (ऱ्हायटीया टिंक्टोरिया), हिरव्या फुलांची ‘उक्षी’ (कॅलीकॉपटेरीस् फ्लोरिबंडा), लाल पिवळ्या रंगाच्या घोसात येणारी ‘सीतेचा अशोका’ची (सराका इंडीका) फुलं, पांढरी शुभ्र, लांबट नळीसारखी ‘मेढसिंग’ (डॉलीकॅन्ड्रॉन फलकाटा) वृक्षाची फुलं; सुवासिक आणि पांढऱ्या रंगाची फुलं येणारं ‘डिकेमाली’ (गार्डेनिया गम्मीफेरा) हे झुडूप, पांढऱ्या सुवासिक फुलांचे झुबके येणारा तेंदू (डायोस्पायरॉस मेलॅनोझायलॉन) वृक्ष, लाल रंगाचा गुलमोहोर (डेलोनिक्स रेजिया); पिवळ्या रंगाचे घोसच्या घोस लगडलेला पर्णहीन ‘बहावा’ (कॅशिया फिस्ट्युला), तांबडट, गुलबट रंगाच्या नाजूक फुलांचे कॅशिया वृक्ष; गडद निळ्या नाजूक फुलांचा ‘मलेशिया’, जांभळ्या फुलांची, पाच पाकळ्यांची चांदण्यासारखी फुलणारी ‘पेट्रीया व्होल्युबिलीस’ ही वेल आणि अनेक वृक्ष-वेलींवर येणाऱ्या विविध रंगी फुलांमुळे ऋतुराज वसंताला अनेकांनी ‘कुसुमाकर’ असंही नाव दिलंय!

कुसुमाकराच्या या ऋतूत रंगोत्सवाबरोबर गंधोत्सवालाही उधाण आलेलं असतं! वसंतऋतूचा आत्मा म्हणजे ‘चैत्र’! या महिन्यात फुलणाऱ्या कडुलिंबाच्या (अ‍ॅझाडिराक इंडिका) पिवळट फुलांना

पेट्रिया

जरी कडवट वास येत असला तरी भाजून काढणाऱ्या उन्हात तो जास्त आल्हाददायक वाटतो. पौषात फुललेल्या आंब्याच्या मोहाराला, छोट्या कैऱ्या येत असतानाच त्याच्या मोहोरातल्या फुलांना आंबेमोहोर तांदुळासारखा वास येतो. आपल्या मंद सुवासाने वेड लावणारी तसेच मातकट, तपकिरी रंगाची फुलं असलेली ‘बकुळ’ ही (मायम्युसॉप्स एलिनगी) वसंतऋतूच्या सुरूवातीला फुलते. मातकट-मोतिया रंगाचीच, सुगंधी ‘मोहाची’ (मधुका इंडिका) फुलं जेव्हा रानात फुलतात तेव्हा पक्षी, प्राणी त्यावर तुटून पडतात, पांढऱ्या रंगाची, सुवासिक ‘निर्मळी’ (स्ट्रीकनॉस पोटॅटोरम्); हिरवट, पांढऱ्या त्रिकोणी फुलांचा, हळदीच्या वासासारखा ‘काजरा’ (स्ट्रीकनॉस नक्सव्होमिका); पांढऱ्या, पिवळ्या रंगाच्या मंजिऱ्यात येणारी ‘काकडा’ची (गारूगा पिनाटा) गोड सुवासिक फुलं; पिवळसर - मोतिया रंगाची झाक असलेली आसमंतात दरवळणाऱ्या मंद सुवासाची ‘इंद्रजव’, ‘कुडा’ ची फुलं, एकाच वेळी वृक्षावर पिवळ्या, पांढऱ्या आणि निळसर रंगाची सुवासिक फुलं येणारा ‘वायवर्णा’ (क्रिटेव्हा रिलीजिओसा), आंब्याच्या मोहोरासारखी पण उग्र वासाची बिब्ब्याची (सेमीकारपस् अ‍ॅनाकारडियम्) फुलं; गुलबट, फिकट जांभळ्या फुलांचे घोस लटकत असलेल्या, कडवट फुलांचा ‘करंज’ (पॉन्गॉमिया पिनाटा); जांभळट आणि पांढऱ्या पुंकेसरांचा, मंद वासाचा ‘कपॅरिस’; पांढऱ्या फुलांचा ‘बारतोंडी’(मॉरिंडा

टिंक्टोरिया) वृक्ष; पांढऱ्या फुलांचा, सुगंधी मोगरा; पिवळट फुलांचा मादक वासाचा पण आल्हाददायक 'दवणा'ही या वसंतऋतूतच फुलतात. त्यांच्या सुवासांनी वातावरण आल्हाददायक होतं आणि सजीवांमध्ये उन्हाळ्याच्या दाहकतेतही चैतन्य निर्माण होतं!

फाल्गुनात होणारी पानगळ विनाश; पण रंगीबेरंगी आणि सुवासिक फुलांच्या माध्यमातून होणारं 'पुनर्निर्माण' म्हणजे सृष्टीतल्या निरंतर चालणाऱ्या चक्राचा संदेश देतो तो वसंतऋतू.

•••

– **डॉ. कांचनगंगा गंधे,** ४१/६६७ लोकमान्यनगर, पुणे ३०
kanchan.gandhe@gmail.com

संकलन करा... पावसाळ्यात फुलणाऱ्या पारिजात, सोनटक्का, गुलबक्षी, तेरडा, सोनचाफा, जास्वंद, केवडा विविध प्रकारची गवतफुलं अशा विविध फुलांची शास्त्रीय माहिती मिळवा.
साहित्यात या लेखातील फुलांचे वर्णन असणाऱ्या कवितेच्या ओळी मिळवून 'छात्र प्रबोधन'कडे आवर्जून पाठवा.

विज्ञान प्रयोग... विज्ञान प्रयोग... विज्ञान प्रयोग...

Tag No. **CP130718** ActiveLink | **कवितांचा व्हिडिओ पाहा**
तपशीलासाठी पृ. क्र. १० पाहा.

क्रोमॅटोग्राफी

रंग हे वेगवेगळ्या रसायनांपासून बनलेले असतात. समजा आपल्याला २-३ रंगांचं एकत्र मिश्रण करून दिलं तर त्यातील वेगवेगळे रंग कोणते हे आपण कसं ओळखणार ? यासाठी एक अतिशय सोपी कृती आपण करू शकतो व हे सगळे रंग विलग करू शकतो. त्यामुळे ते मिश्रण कोणकोणत्या रंगाचं आहे, ते सहज ओळखू शकतो.

साहित्य : एक टिश्यू पेपर, रंग

कृती : १) टिश्यू पेपरला दुमडून/कापून त्याची एक आयताकार पट्टी करा. (चित्रात दाखवल्याप्रमाणे)

२) पट्टीच्या एका टोकापासून साधारण २ सेंमी. लांब पाहिजे त्या रंगाच्या मिश्रणाचा ठिपका टिश्यू पेपरवर काढा.

३) एका भांड्यात साधारण अर्धा कप पाणी घ्या.

४) ज्या बाजूला ठिपका आहे ती टिशू पेपरची बाजू पाण्यात सोडा. ठिपका पाण्याला स्पर्श करणार नाही ही काळजी घ्या.

५) साधारण ५ ते १० मिनिटे थांबा. निरीक्षण करा.

निरीक्षण : पाणी जसे जसे टिश्यू पेपरमध्ये वर वर चढते तसे त्यासोबत ठिपक्यातले रंगसुद्धा वर चढतात. यातसुद्धा ठरावीक रंग ठरावीक उंचीपर्यंतच चढतात. त्यामुळे सुरुवातीला जर रंगांचे मिश्रण घेतले, तर कागदावर ते रंग विलग झालेले दिसतात.



कारण : प्रत्येक रंगाची पाण्यात विरघळण्याची क्षमता वेगवेगळी असते. काही रंग कमी प्रमाणात पाण्यात विरघळतात तर काही जास्त प्रमाणात! तसेच टिश्यू पेपरवरील छिद्रांमुळे पाणी व त्यात विरघळलेले रंग वर चढतात. त्या छिद्रात रंगांचे रेणू अडकून बसू शकतात. या सगळ्यांच्या एकत्रित परिणामामुळे वेगवेगळे रंग वेगवेगळ्या उंचीपर्यंत पोहोचतात व आपण रंगांच्या मिश्रणातून रंग वेगळे करू शकतो.

– हर्षवर्धन जोग
disha.iiserpune@gmail.com

पुष्पांचे झुबके किती लगडले, प्रत्येक फांदीवरी। त्यांचा गंध चहूकडे पसरिला, वर्णू किती माधुरी।।

भारतरत्न पुरस्कार - पं. जवाहरलाल नेहरू, स्वातंत्र्यसेनानी, पहिले पंतप्रधान, **१९५५**

दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा. **प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे.**

चूक

आश्लेषा महाजन

वेगवान धावपटू असणारा महेश टी.व्ही.वर क्रिकेटची मॅच पाहात होता. धोनीने जोरदार सिक्सर लगावली आणि लगेच जाहिराती सुरू झाल्या. नामवंत कंपनीच्या बुटांची जाहिरात लागली... महेश अस्वस्थ झाला... का? त्यानंतर कोणतं रामायण घडलं?

मी माझ्या नागरवस्तीतल्या कार्यालयात काही काम करत होतो. बाहेर कसलासा गलका ऐकू आला; पण असा गलका, गडबड, भांडण....हा नित्याचाच भाग होता. त्यामुळं मला त्याचं फारसं आश्चर्य वाटलं नाही. तेवढ्यात –

‘‘काकाऽ महेश सकाळधरून बेपत्ताय. किती शोधला... सापडतंच नाय...’’

‘‘त्यात कालच त्याच्या आईनं त्याला लई बडवलं होतं. बापानं बी ठोकलं होतं त्याला. रागावून निघून गेलाय कुठंतरी...’’

जितू, रवी, भैरू, हेमा आणि रेखा सर्वजण धापा टाकत थेट माझ्या कार्यालयातच येऊन धडकले. गणूदादानं त्यांना हटकलं होतं; पण त्याला न जुमानता पोरं आत घुसली होती. माझ्या समोरच ती सर्व उभी राहिली.

‘‘त्यानं जिवाचं काही बरंवाईट...’’ हेमाला दाटून आलं, तसा रेखानं तिचा हात हलकेच दाबला...

‘‘नाय, मह्या तसलं काही करणार नाय,’’ जितू आवंढा गिळत म्हणाला. त्याच्या कपाळावरून घामाची धार पार भुवईपर्यंत वाहत आली. प्रकरण गंभीर आहे, हे जाणून मी हातातली फाईल मिटवून ठेवली.

‘‘परवापास्नं शाळेत खेळाच्या शर्यती आहेत. मह्यानं बऱ्याच स्पर्धांमध्ये भाग घेतलाय. आमचे सर म्हंतात, मह्या म्हंजे ‘महेंद्रसिंह धोनी’ आहे, धोनी! ’’ रवी आवेशानं म्हणाला. त्याचा चेहरा फुलला होता.

‘‘काय झालं? मला पाहिल्यापासून नीट सांगा बरं!’’ मी मुलांसमोर तांब्याभांडं ठेवत म्हटलं.

‘‘मी सांगतो.’’ जितू म्हणाला, ‘‘काल रातच्याला मह्याच्या आईनं मह्याला खूप म्हणजे खूपच बडवलं. शेजारच्या शहाभाभीपण त्याच्यावर खेकसत होत्या. त्या त्याला सारखं ‘बदमाश, चोरटा’ म्हणत होत्या.’’

‘‘मह्याचं तर तोंड सुजलं होतं आणि ओठातून रक्तही येत होतं. आम्ही मह्याच्या आईला रोखायचा प्रयत्न केला; पण ती खूपच चवताळली होती. मह्याचा बापही त्याला काठीनं फोडत होता.’’

परिस्थिती माझ्या ध्यानात आली. तातडीनं हालचाल करायला हवी होती. ‘पोलिसात कळवावं का?’ क्षणभर विचार चमकला; पण ‘नको’, दुसरं मन म्हणालं. गणूदादाला सूचना देऊन मी मुलांसह कार्यालयाच्या बाहेर पडलो.

‘‘मी नदीकिनारी शोधतो, तू रामटेकडीवर जा,’’ हेमा जितूला म्हणाली.

‘‘काका, आपण शिवमंदिराजवळ तो आहे का बघू; तो तिथल्या व्यायामशाळेत जातो कधी कधी.’’ रवी मला म्हणाला.

भैरूनं मान डोलावली आणि म्हणाला, ‘‘मी आमच्या सरांच्या घरी जाऊन बघतो.’’

आम्ही सर्व पांगलो. रवी झपाझप पावलं टाकत होता. शिवमंदिराचा कळस दुरूनच दिसला. मनात मह्याच्या आठवणी दाटल्या होत्या. मह्या म्हणजे महेश. एक हुशार, चुणचुणीत मुलगा. घरची परिस्थिती बेताची. बाप दारुडा. हमाली करून चार पैसे कमवायचे आणि ते दारूवर उडवायचे. हा त्याचा नित्यक्रम. आई चार घरची धुणीभांडी करते.

पहाट झाली, रवि उगवला उधळत रंगसडे। चैतन्याची चाहूल उठली, प्रफुल्ल पूर्वेकडे।।

भारतरत्न पुरस्कार - पं. गोविंदवल्लभ पंत, स्वातंत्र्यसेनानी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री, **१९५७**

प्रायोजक – आय. टी. डी. सिमेंटेशन इंडिया, सातारा.

दोन बहिणी. ओढगस्तीचा संसार.

मह्या अभ्यासात बऱ्यापैकी हुशार; शिवाय मल्लखांब, योगासनं, धावणं यात अगदी तरबेज. घर छोटं, म्हणून तो आमच्या संस्थेतल्या अभ्यासिकेत रोज अभ्यासाला येतो. स्वभावानंही नम्र आणि मायाळू.

''चला, आलं मंदिर! बघूया इकडं मह्या बसलाय का...'' रवी म्हणाला. मी मंदिराबाहेरच्या नंदीला नमस्कार केला. त्या नंदीच्या दोन शिंगांमधून पाहताना सहजच माझं लक्ष दूरवर एका बाकड्यावर बसलेल्या मुलाकडं गेलं. मला मह्याचाच भास झाला. चष्मा नाकावर दाबत डोळे बारीक करून मी नीट पाहिलं. आम्ही दोघंही दबक्या पावलांनी गेलो आणि पटकन मह्याच्या दोन्ही बाजूस जाऊन बसलो.

मह्या निर्विकारपणे समोरच्या झाडाकडे बघत होता. आम्ही दोघांनी त्याचे हात पकडले, तरी हा आपला ढिम्म्! जणू काही पुतळाच! डोळे सुजलेले. ओठ रक्ताळलेले. कपडे फाटलेले-मळलेले.

मी प्रेमानं त्याच्या पाठीवरून हात फिरवला, तसा तो कळवळला. मग लक्षात आलं त्याच्या पाठीवरही वळ आहेत. मह्या बोलण्याच्या मन:स्थितीत नव्हता. उपाशीही असणार. मी त्याला काखेत धरून उठवलं आणि आम्ही हलके-हलके चालत निघालो.

मह्या आणि रवीला घेऊन मी शेजारच्या हॉटेलमध्ये गेलो. खूप आग्रह केल्यावर मह्या खाऊ लागला; पण घास त्याच्या घशात अडकत होता.

''खाऊन झालं की आपण तुझ्या घरी जाऊ.'' असं मी म्हणताच मह्या ओक्साबोक्शी रडू लागला. हात जोडून पाया पडू लागला. हे दृश्य पाहून रवीच्याही डोळ्यांत पाणी आलं.

रवी म्हणाला,

''खूप मारलं तरी आई-बाप आहेत ते तुझे. तुझी आई तर सकाळधरून रडतेय, शोधतेय तुला. खूप माया आहे तिची तुझ्यावर.''

मह्याचा पुन्हा पुतळा झाला. मह्याचं घर जसं जवळ येऊ लागलं तसा मह्याचा चेहरा अधिकच भेसूर दिसू लागला. दुरूनच गलका ऐकू आला. त्या गलक्यातूनच मह्याची आई किंचाळत आली आणि तिनं मह्याला गच्च मिठी मारली. मह्याचा चेहरा वेदनांनी आक्रसला. आम्ही दोघांनी तिला सावरलं. शांत केलं.

''आला का चोरटा? आरती ओवाळा त्याची!'' चाळीच्या खिडकीतून कोणीतरी बाई ओरडली.

''पोरगं पार वाया गेलं!''- दुसरी खिडकी!

''ह्याला रिमांड होमला टाकायला पाहिजे !''- गॅलरी.

मह्याचा भकास चेहरा अधिकच विच्छिन्न झाला.

''शांत व्हा! आपण ह्यातून मार्ग काढू,'' मी शक्य तेवढ्या संयमानं म्हटलं आणि मह्याला त्याच्या घरात घेऊन गेलो. रवीला बाहेरच थांबायला सांगितलं.

ते घर म्हणजे दहा बाय दहाची एक खोली. मह्याचा बाप नशेतच होता. दोघी बहिणी भांबावून डोळे पुसत होत्या. त्यातली थोरली मीरा म्हणाली,

''मह्या चोर नाही काका. शहाभाभी उगाचच आळ घेताहेत.''

''पण ह्याच्या खिशात दोनशे रुपये सापडले. ते शहाभाभींकडचेच असणार...'' आई दबक्या स्वरात म्हणाली. दुसऱ्या क्षणी स्फुंदत स्फुंदत आई म्हणाली,

''गुरासारखे कष्ट करते हो मी. संसाराला नवऱ्याची कायबी मदत नाय. उलट त्यालाच पोसावं लागतं. त्यातच पोरानं चोरी केली हो शेजारी...! मग लई मारलं त्याला काल मी! मी तरी काय करू?''

मह्याच्या आईला शांत करण्यासाठी शब्द जुळवत मी म्हणालो,

''तुम्ही शांत व्हा. मार देऊन प्रश्न सुटत नाही. आपण मह्याचं काय म्हणणं आहे, ते ऐकू. महेश बाळा सांग, तू शेजारच्या घरातून पैसे का उचललेस? सांग. तुला कोणी मारणार नाही, रागावणार नाही.''

मह्यानं तीव्र संतापानं बापाकडं

बालपण आठविता, अंगणात झुला झुले। फांदीवरचं गोड पाखरू, गीतातून बोले।।

भारतरत्न पुरस्कार - डॉ. धोंडो केशव कर्वे, स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य, **१९५८**

प्रायोजक - श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे.



पाहिलं, तीच नजर आईवर फिरवली आणि काहीतरी बोलणार तोच त्याच्या लक्षात आलं, की त्याला बोलताच येत नाहीये. त्याची दातखीळ बसली होती. हताशपणे हातवारे करत तो नुसता रडत राहिला. मी त्याच्या खांद्यावर हात ठेवला आणि खाली बसायला सांगितलं. समोरच देव्हारा होता. त्यात निरांजन लावलं. उदबत्ती लावली. माझ्या शबनममधून माझी वही बाहेर काढली. पेनही काढलं. वही-पेन मह्याच्या हातात दिलं.

''इथे देवापुढे बसून तू तुझ्या मनात जे काही आहे, ते या कागदावर लिही. खरंखरं लिही. घाबरू नकोस. तुझं लिहून होईपर्यंत मी इथेच बसतो,'' मी म्हणालो.

कितीतरी वेळ मह्या निरांजनाच्या ज्योतीकडं भकास बघत बसला. मधूनच त्याचा बाप काहीतरी बरळत होता. छोटी बहीण मधुरा त्याच्या जवळ येऊन बसली आणि तिनं पेन त्याच्या हातात देत त्याचा खांदा दाबला.

एकाएकी स्फुरण चढून मह्या झरझर कागदावर लिहू लागला... लिहीतच सुटला... चार, साडेचार पानं लिहून झाल्यावर तो उठला. त्याचे डोळे डबडबले होते. कागद माझ्या हातात देऊन तो रडू लागला. मी त्याला गच्च मिठी मारली. थोपटून शांत केलं.

काय लिहिलं होतं मह्यानं? सर्वांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. तेवढ्यात, काहीशा त्वेषानं मह्याच म्हणाला,

''वाचा काका. कळू दे सर्वांना...!''

मी स्मितहास्य केलं. मह्याच्या आईला म्हटलं, ''वहिनी, मस्त चहा करा की सगळ्यांना. तोवर मी हे वाचतो आणि मग सर्वांना मह्यानं काय लिहिलंय, ते थोडक्यात सांगतो''

मह्याच्या आईची आणि बहिणींची कळी खुलली. चहाच्या वाफेच्या सोबतच माझ्या मनात सर्वांना काय नि कसे सांगायचे यांचे मनसुबे तरळू लागले. कठीण प्रसंगातून चांगला मार्ग काढण्यासाठी माझीच कसोटी लागणार होती... चहाच्या घोटाबरोबरच मी बोलायला सुरुवात केली.

''हे पाहा, नीट ऐका सर्वांनी. घडलेला प्रसंग वाईटच होता. आपापल्या जागी तुम्ही सगळेच बरोबर आहात; पण त्याचवेळी तुम्ही सगळे चुकलात!''

''काय कोड्यात बोलताय काका? नीट स्पष्ट सांगा की!'' मीरा म्हणाली. वातावरण

हलकंफुलकं करण्यासाठी मी म्हणालो,

‘‘आता आपला महेश अभ्यासात हुशार आहेच, पण खेळातही तरबेज आहे. उगाच नाही त्याचे पी.टी.चे सर त्याला महेंद्रसिंह धोनी म्हणतात!’’

बहिणींचे चेहरे खुलले. आईचेही कान टवकारले. नशेत असूनही बाप उठून बसला. मी पुढे सांगू लागलो,

‘‘पुढल्या सप्ताहात शाळेत क्रीडास्पर्धा आहेत. महेशनं अनेक स्पर्धांमध्ये भाग घेतलाय. पळण्याच्या शर्यतीत तर महेश एखादया चित्त्यासारखा वेगानं पळतो. ‘पायात बूट असतील, तर आणखी जोरात पळता येतं आणि पायांना खडेही टोचत नाही,’ असं त्याचे सर म्हणाले. म्हणून महेशनं बुटासाठी आईकडं हट्ट केला... ’’

‘‘पण मी कुठून आणू एवढे पैसे? चार घरची धुणीभांडी करून मी कसाबसा गाडा ओढतेय...’’ मह्याच्या आईनं डोळ्यांना पदर लावला.

‘‘पण बाबाला शंभर शंभर रुपये देतेस की नशा करायला...?’’ मीरा तक्रारीच्या सुरात म्हणाली. मधुराही बाबांकडे त्वेषानं बघू लागली.

आता ही चर्चा भलतीकडे वळून पुन्हा भांडणं होतील, या भीतीनं मीच मध्ये पडत म्हटलं,

‘‘तर... तर महेशला आईनं बुटासाठी पैसे दिले नाहीत; महेश ते पैसे स्वत: कमावण्याइतका मोठा आहे, पण तेवढा वेळ नव्हता त्याच्याकडे. बरं, त्यानं ही गोष्ट मला किंवा संस्थेतल्या इतर लोकांना सांगायला हवी होती. आपण नक्की काहीतरी मार्ग काढला असता. कुणा मित्राचे, नातलगाचे बूटही तात्पुरते मिळवता आले असते; पण जेव्हा मन सैरभैर होतं, तेव्हा डोकंही चालेनासं होतं, हो नं?’’ मी महेशच्या डोक्यावर प्रेमानं टप्पल मारली. महेश वरमला.

‘‘पण म्हणून शेजाऱ्यांकडचे दोनशे रुपये चोरायचे? अहो, ‘चोर’ अशी बदनामी झाली हो मह्याची...! गरीबालाबी इज्जत असते...!’’ मह्याच्या आईचा कंठ दाटून आला. मीरानं आईचा खांदा दाबत तिला धीर दिला.

‘‘आता मी महेशनं लिहिलेला शेवटचा परिच्छेद फक्त वाचून दाखवतो ऐका हं!’’ असं म्हणत मी वाचू लागलो...

‘‘आई, बाबांना नशा करायला पैसे देते; पण मला देत नाही. हे

छात्र प्रबोधनच्या अंकातील शेजारील चौकट ज्या लेखांच्या सुरुवातीला दिली आहे त्या लेखांशी निगडित ऑडिओ/व्हिडीओ

Tag No. ActiveLink	ऑडिओ/ व्हिडिओ पाहा/ऐका

इंटरनेटद्वारा आपल्या संगणकावर वा भ्रमणध्वनी यंत्रावर(मोबाईलवर) कसे ऐकावे/पाहावे याच्या सूचना खाली दिल्या आहेत. त्याप्रमाणे कृती करून लेखांच्या वाचनाबरोबरच पूरक साहित्याचा आनंद घ्या.

View multimedia content on your Computer or on the Mobile/Tablet

Instructions to use ActiveLink on PC and Mobile/Tablet:

1. Go to http://www.activel.in

2. You can use your PC as well as your tablet/mobile (Smartphone).

3. Insert the ‘tag’ number given with the article in Chhatra Prabodhan and **click ‘search’** for video.

टॅग नंबरसाठी पाहा – पान क्र. ३, ६, १३, १७, ४३

ऐकाऽ होऽ ऐकाऽ

छात्र प्रबोधनतर्फे अभिव्यक्ती शिबिर

(इ. ७ वी ते १० वीच्या मुला-मुलींसाठी)

- सुप्त गुणांना वाव देणारे,
- कलागुणांना खतपाणी घालणारे
- सभाधीटपणा, आत्मविश्वास वाढवणारे

अभिव्यक्ती शिबिर !!

अभिवाचन, नाट्यछटा, एकांकिका, साभिनय पद्य सादरीकरण आणि बरेच काही...

कालावधी : दि. २, ३, ४ मे २०१३

वेळ : सकाळी ११ ते ४, **शुल्क :** रु. ४००/-

नावनोंदणी : २५ एप्रिल २०१३ पर्यंत

अधिक माहितीसाठी **छात्र प्रबोधन** कार्यालयात संपर्क करा. ०२० - २४०७१७४/१७९

आम्रमोहोराचा गंध वाऱ्यावर पसरला। आसमंत सारा सुगंधाने धुंद झाला।।

भारतरत्न पुरस्कार - श्री. पुरुषोत्तमदास टंडन, स्वातंत्र्यसैनिक, **१९६१**

प्रायोजक – डॉ. संतोष काकडे, बंगळुरू.

बघून मी दु:खी झालो होतो. वेगवान धावपटू असूनही मी बूट नसल्यामुळे स्पर्धेत मागे पडणार... याचा मला खूप ताण आला. माझं अभ्यासातही लक्ष लागेना. सारखे बूटच डोळ्यांपुढे दिसत होते. आमच्या घरात टी. व्ही. नाही म्हणून मी कंटाळून शेजारच्या पिंकू शहाकडे गेलो. आम्ही टी. व्ही. वर क्रिकेट पाहू लागलो. महेंद्रसिंह धोनीनं जोरदार सिक्सर लगावला आणि लगेच जाहिराती सुरू झाल्या...! त्यात नामवंत कंपनीच्या बुटांचीच जाहिरात लागली... मी अस्वस्थ झालो... त्याचवेळी शहाकाकींनी त्यांच्या हातातले दोनशे रुपये टी. व्ही. शेजारच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवल्याचं मी पाहिलं. माझे डोळे लकाकले. मी उठलो... मी काय करतोय हेच मला उमजत नव्हतं. मी सरळ ड्रॉवर उघडला, दोनशे रुपये घेतले आणि पळत सुटलो... पिंकूनं आरडाओरडा केला... मी जीव खाऊन पळू लागलो. मला बूट घ्यायचे होते... मला स्पर्धेत पळायचं होतं... मला नंबर काढायचा होता; पण अशी गोष्ट करून नव्हे !''

वाचता वाचता मी थांबलो. कारण मह्या पुन्हा स्फुंदू लागला होता. बहिणीही रडत होत्या. मह्याची आई मात्र सावरली होती. मह्याच्या पाठीवर हात ठेवत समजुतीच्या सुरात ती म्हणाली, ''तुला तुझी चूक कळली ना? हे बेस झालं. आरं, टीवीतल्या जाहिरातीतली चमचमती दुनिया येगळी, आन आपली जिंदगानी येगळी. कळलं?''

''हो ! पण डोकं फिरलं होतं नं धोनीचं !'' असं म्हणत हसत मधुरानं मह्याला टप्पल मारली. मह्या वरमला.

मीही माझी शबनम खांद्यावर टाकत उठलो. पायात चप्पल सरकवत म्हणालो,

''महेश, उद्या संध्याकाळी संस्थेत ये. मग आपण दोघं बूट-खरेदीला जाऊ... आणि हो, शहाभाभींची माफी मागायला विसरू नकोस!'' महेशचा चेहरा फुलला. तो हसरा चेहरा डोळ्यांत साठवत मी चालू लागलो.

•••

- आश्लेषा महाजन
'मंजिरी' २३०, चित्ररेखा सोसायटी,
सहकार नं. १, पुणे ०९

बटाट्यापासून वीज निर्मिती

विज्ञान प्रयोग... विज्ञान प्रयोग... विज्ञान प्रयोग...



बटाटा किंवा लिंबू, टोमॅटो पासून वीज निर्माण करता येते, आणि त्यांना चक्क 'पेन्सिल सेल' म्हणून वापरता येतं! कसं? प्रत्यक्ष प्रयोग करून बघा.

साहित्य : ८ बटाटे, ८ जस्ताचे खिळे, ८ तांब्याचे खिळे, तांब्याची तार, एक ५ वॅटचा बल्ब.

कृती : १. प्रत्येक घेतलेल्या बटाट्यांमध्ये एका बाजूला तांब्याचा आणि एका बाजूला जस्ताचा खिळा टोचून ठेवा. (चित्र बघा) २. हे बटाटे एका टेबलवर दोन ओळींमध्ये ठेवा. ३. तांब्याच्या तारेनं एका बटाट्यात जस्ताचा खिळा तर दुसऱ्या बटाट्यात तांब्याच्या खिळ्याला जोडा. ही कृती सर्व बटाट्यासाठी करा. ४. आता एका जस्ताच्या आणि तांब्याच्या खिळ्यांमधील तार काढा व ते दोन्ही खिळे बल्बला तारेनं जोडा. तार जोडल्या क्षणी बल्ब प्रकाश द्यायला लागेल. कारण हे बटाटेच त्याला वीज पुरवतील.

टीप : हीच कृती बटाट्याऐवजी लिंबू अथवा दुसऱ्या आंबट फळासोबत करता येईल. फक्त खिळ्यांऐवजी तांब्याच्या व जस्ताच्या पट्ट्या वापराव्या लागतील.

- हर्षवर्धन जोग, disha.iiserpune@gmail.com

घमघमणारा मोगरा, आला माझ्या दारी। सुगंधाची पखरण, झाली अवनीवरी।।

भारतरत्न पुरस्कार - डॉ. राजेंद्र प्रसाद, स्वातंत्र्यसेनानी, शिक्षण तज्ज्ञ, पहिले राष्ट्रपती, **१९६२**

प्रायोजक - श्री. सुधीर विष्णू दफ्तरदार, पुणे

वसंतवारे !

शिशिरामधल्या पाचोळ्याच्या
पायरवाने पळे हिवाळा
वसंत आला, वसंत आला
आला सांगत सुगंधी वाळा !

रंगबिरंगी पर्णफुलांनी
नवी-नवेली नटली सृष्टी
तिच्याच पोटी रसरसली
चवीचवीची फळे गोमटी !

होळीमधले रंग सोयरे
संग तयांचा हवाहवासा
ओळखीचे जग भासे नवखे
वसंत देई हृदय भरवसा !

रम्य अशा या ऋतुपर्वातच
अभ्यासाची असते घाई
'फुलपंखांच्या सवे असू दे
पुस्तक हाती' म्हणते आई !

झळा उन्हाच्या जरी अनावर
त्यात वाहती वसंतवारे
रितेरितेपण येण्याआधी
श्वासामध्ये भरून घ्या रे !

– **सुनील शिनखेडे**
कार्यक्रम अधिकारी, आकाशवाणी, जुना कुंभारी रस्ता,
एम.आय.डी.सी., सोलापूर 413 006



आवाहन

विद्यार्थी विशेषांक

छात्र प्रबोधनच्या विद्यार्थी विशेषांकासाठी (सौर आषाढ, जुलै२०१३) खालील साहित्य प्रकारातील कसदार, लयदार, लालित्यपूर्ण साहित्य मागवण्यात येत आहे.

- रहस्यकथा, साहसकथा, कविता, ललित
- नावीन्यपूर्ण, मौजमजेचे, पटकन खेळता येणारे सामूहिक खेळ
- व्यक्तिपरिचय - एका उद्योजकाची यशोगाथा/माझा आवडता खेळाडू
- मुखपृष्ठासाठी चित्रं (विषय - आषाढी वारी, पावसाळा)

साहित्य व चित्रे पाठवण्याचा अंतिम दिनांक १० मे २०१३

याशिवाय मासिकाच्या संपादनात ज्यांना रस असेल, शिवाय सुट्टीत रोज येऊन अंकासाठी जे वेळ देऊ शकतील अशांनी आपली नावं 'छात्र प्रबोधन'च्या कार्यालयात २५ एप्रिल २०१३ पर्यंत जरूर नोंदवावीत. काही शंका असल्यास 'छात्र प्रबोधन'च्या संपादक विभागात संपर्क साधावा.

वसंत बनात, मनात हासे। सृष्टिदेवी, जणू नाचे उल्हासे।।

भारतरत्न पुरस्कार - डॉ. झाकिर हुसेन - शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल, उपराष्ट्रपती **१९६२**

प्रायोजक – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे.

Tag No. CP130721 व्हिडिओ पाहा ActiveLink
पृ. क्र. १० पाहा.

सफर आकाशाची...

– डॉ. प्रकाश तुपे

परीक्षा संपल्या. सुट्टी सुरू झाली. या सुट्टीत काय करायचं, याचा आराखडा मनात तयार होत असेल. दिवसभर हुंदडण्यात, खेळात वेळ चांगला जाईलच. मात्र संध्याकाळी रात्री अभ्यास नसल्यामुळं मोकळं मोकळं वाटेल. तुमच्या संध्याकाळच्या वेळेचा सदुपयोग करायचा असल्यास 'आकाशनिरीक्षण छंदात' बुडून जायला काही हरकत नाही. बऱ्याच जणांचा गैरसमज असतो, की ग्रहतारे पाहाण्यासाठी, ओळखण्यासाठी दुर्बीणीची गरज असते. प्रत्यक्षात आकाश निरीक्षणाच्या छंदासाठी दुर्बीणीची जरूरी नसते. आकाशातील ताऱ्यांची ओळख करून घेण्यासाठी थोडासा निवांतपणा मात्र नक्कीच हवा. आकाशातील ग्रह-ताऱ्यांचे निरीक्षण नियमितपणे काही आठवडे केल्यास आकाशाची ओळख सहज होऊ शकते.

अंधाऱ्या रात्री आकाशाकडे नजर टाकल्यास चांदण्यांचा सडा पडलेला असतो. काही चांदण्या तेजस्वी तर काही मंद तेजाच्या, काही निळसर रंगाच्या, तर काही तांबूस रंगाच्या दिसतात. क्षितिजावरच्या चांदण्या तर विविध रंग उधळतच आपल्याला आकर्षून घेतात. त्यांची ओळख व्हावी, शक्य झाल्यास त्यांच्याशी मैत्री करावी असं वाटू लागतं. मात्र सर्वच चांदण्या बिंदूवत व साधारणपणे एकसारख्या दिसत असल्यानं कुठल्या चांदणीस कुठल्या नावानं ओळखायचं, हे आपल्याला सहज समजत नाही. आकाशाची माहिती असणारी व्यक्ती सहजासहजी न सापडल्यास या दूरच्या चांदण्या आपल्यापासून अधिकच दूर गेल्यासारख्या वाटतात.

खरं पाहता चांदण्यांची ओळख करून घेणं फारसं अवघड नाही. आकाशाची ओळख करून घ्यायला नियमितपणे आकाशाकडे नजर टाकण्याची सवय लावून घ्यायला हवी. सतत आकाश पाहिल्यास एकसारख्या वाटणाऱ्या चांदण्यातील सूक्ष्म फरक व त्यांची हालचाल ध्यानात येऊन त्यांची ओळख होते. काही सोप्या उपायांनी त्यांची नावं समजू शकतात. कुठली चांदणी कधी उगवते व कधी मावळते, हेही समजू लागते. अवघ्या



रात्री ९ च्या सुमारास एप्रिल महिन्यात दिसणारे आकाश
नकाशा डोक्यावर धरून पाहावा

महिन्याभरातच आपल्याला अनेक चांदण्यांची ओळख होईल व त्यातूनच आपण चांदण्यांच्या व पर्यायानं आकाशाच्या प्रेमात पडाल.

आकाशाची ओळख करून घेण्यासाठी प्रथम शक्यतो दररोज 'ठरावीक' वेळी आकाश न्याहाळण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. शक्य असल्यास गावाबाहेर, एखाद्या टेकडीवरून किंवा घराच्या गच्चीवरून आकाश पाहण्याचा प्रयत्न करा. अंधाऱ्या ठिकाणाहून एकावेळी जास्तीतजास्त दोन-अडीच हजार तारे दिसू शकतात. शहरातून मात्र एकावेळी पन्नास शंभर तारेच दिसू शकतात. ठरावीक वेळी कुठले तारे उगवत आहेत, कुठले मावळत आहेत व कुठले डोक्यावर दिसत आहेत हे ध्यानात ठेवा. दुसऱ्या दिवशी पुन्हा आकाश पाहा. तुमच्या असं लक्षात येईल, की कालचे तारे किंचित उंचीवर दिसत आहेत. आठवड्याभरात याच प्रकाराने निरीक्षण केल्यास तुमच्या लक्षात येईल, की **पूर्वेकडचे तारे दररोज ४ मिनिटं अगोदर उगवून वरवर सरकत आहेत. तसंच पश्चिमेकडचे तारे दररोज ४ मिनिटं अगोदरच मावळताना दिसतात.**

महिन्याभरात सुरुवातीस उगवतीला पाहिलेले तारे तब्बल दोन तास अगोदरच उगवलेले दिसतील. याप्रकारे वर्षभरानंतर तोच तारकासमूह त्याचवेळी उगवताना आपण पाहू शकतो. आकाशातील तारे रात्रभरात पूर्वेकडे उगवून पश्चिमेकडे मावळताना दिसतात. मात्र तारे एकमेकांपासून दूर जाताना दिसत नसल्यानं त्यांची ओळख करून

घेण्यासाठी चंद्राचा उपयोग करून घेता येतो. चंद्र दररोज वेगवेगळ्या तारकासमूहात 'नक्षत्रात' दिसतो. चंद्र दररोज कुठल्या नक्षत्रात आहे हे पंचांगात, वर्तमानपत्रात छापलेले असते. ते वाचून चंद्राजवळील तारकासमूहाची ओळख होते. चंद्र महिन्याभरात संपूर्ण आकाशाची फेरी मारत असल्यानं त्याच्या वाटेवरील सर्व म्हणजे जवळजवळ २७ नक्षत्रांची ओळख महिन्याभरात आपण करून घेऊ शकतो. या नक्षत्रांच्या आधारावरून आकाशातील इतर तारकासभूह ओळखता येतात.

आकाशात चंद्र–सूर्याप्रमाणे ग्रहदेखील ताऱ्यांच्या पार्श्वभूमीवर सरकताना दिसतात. नुसत्या डोळ्यानं फक्त पाचच ग्रह दिसू शकतात. या पाचांपैकी बुध आणि शुक्र हे सूर्याजवळचे ग्रह असल्याने सूर्यास्तानंतर काही वेळ किंवा सूर्योदयापूर्वी काही वेळ दिसू शकतात. उरलेले तीन म्हणजे मंगळ, गुरू आणि शनी रात्रभरात आकाशात वेगवेगळ्या तारकासमूहात दिसतात. हे ग्रह कुठे आहेत याची माहिती वर्तमानपत्रात किंवा पंचांगात दिलेली असते. ती पाहून या ग्रहांचा वेध घेता येतो.

ताऱ्यांच्या गर्दीतून ग्रह ओळखण्यासाठी आपल्याला ग्रहाचे त्या दिवशी नक्की स्थान ठाऊक असणे आवश्यक ठरते. नुसत्या डोळ्याने ग्रह चांदण्यासारखेच दिसतात. मात्र ते चांदण्यासारखे चमचमत नाहीत. ग्रहाचा प्रकाश ठरावीक तेजस्वितेनं संथपणे डोळ्यात शिरतो. मात्र चांदण्या चमचमताना दिसतात कारण ग्रहापेक्षा त्या फार दूर आहेत व दूरवरून येताना त्यांच्या प्रकाशाचे पृथ्वीभोवतालच्या अस्थिर वातावरणात अनेकवेळा वक्रीभवन होते, या कारणानं तारे चमचमताना दिसतात. या उलट ग्रह, ताऱ्यांच्या तुलनेत जवळ असल्यानं त्यांच्या काहीशी मोठ्या तबकडीतील प्रकाश जरी थोडासा वक्रीभूत झाला, तरी त्याचा परिणाम अल्प असल्यानं तो जाणवत नाही; म्हणूनच ग्रह चमकताना दिसत नाहीत. यामुळे चांदण्याच्या गर्दीतून ग्रहांना शोधणे सोपे ठरते. दुर्बीणीतून पाहता चांदण्या छोट्या ठिपक्यासारख्या दिसतात, मात्र ग्रहांची छोटी बिंबे दिसतात. ग्रहांच्या चकत्यांची काही खास वैशिष्ट्ये असल्यानं त्या–त्या ग्रहांना ओळखता येते. उदा. शनी भोवती कडी दिसतात. तर गुरू भोवतालचे चार मोठे चंद्र व त्यांच्या बिंबावरचा तांबडा ठिपका दिसतो. युरेनस–नेपच्युन त्यांच्या निळ्या रंगानं आपलं लक्ष वेधून घेतात.

आकाशात अधूनमधून धूमकेतूदेखील दिसतात. धूमकेतू हे प्रचंड मोठ्या आकाराचे बर्फ, वाळू व इतर पदार्थांनी बनलेले गोळे असतात. ते सूर्याच्या गुरूत्वाकर्षणात सापडल्यास सूर्याभोवती फेरी मारताना दिसतात. सूर्याजवळ आल्यावर उष्णतेनं तापून धूमकेतूच्या गोळ्याला शेपटी फुटते व आकाशात छान असे 'शेंडे नक्षत्र' दिसते. हे धूमकेतू सूर्याला फेरी मारून जाताना त्यांचे कण मागे टाकत जातात. या कणांमुळेच उल्का वर्षावाचा आविष्कार आपण पाहू शकतो.

बऱ्याच वर्षांनंतर यावर्षी नुसत्या डोळ्याने दोन धूमकेतू दिसणार आहेत. मार्चमध्ये 'पॅनस्टार्स' नावाचा धूमकेतू क्षितिजालगत संध्याकाळी दिसला. येत्या नोव्हेंबरमध्ये 'इसॉन' नावाचा धूमकेतू दिसणार असून त्याची तेजस्विता चंद्राएवढी असेल असा अंदाज शास्त्रज्ञांनी वर्तविला आहे. 'हा धूमकेतू प्रथमच सूर्यभेटीस येत असल्यानं, नक्की तो किती तेजस्वी होईल याचा अंदाज करता येत नाही,' असं काही शास्त्रज्ञांचं मत आहे. धूमकेतू हे सूर्यमालेच्या जन्मावेळच्या पदार्थांने बनलेले असल्यामुळे धूमकेतूंचा अभ्यास हा सूर्यमालेच्या जन्माच्या रहस्याचा अभ्यास असतो. त्यामुळे शास्त्रज्ञ धूमकेतूंचं बारीक निरीक्षण करीत असतात. आपल्याला मात्र धूमकेतूंचा धूरकट पुंजका व त्यांची लांबलचक शेपटी आकर्षक वाटत असल्यानं त्यांचे निरीक्षण आनंददायक वाटेल. एकंदरीतच आकाशनिरीक्षणाचा छंद आपल्याला अथांग विश्वाच्या प्रेमात न पाडेल तरच नवल.

•••

– डॉ. प्रकाश तुपे
प्लॉट नं. १६, अमर कॉटेज, हडपसर, पुणे 411028
tupeprakash@gmail.com

आकाश निरीक्षणासाठी उपयोगी असलेले 'सॉफ्टवेअर' आणि वेबसाईटस् पुढीलप्रमाणे

Software - Redshift Stellerium
Website - space.com, skyandtelescope
astronomy.com, HEAVENS_ABOVE.COM

आवर्जून वाचा
छंद आकाश दर्शनाचा : किं. ₹ ८०
लेखक – डॉ. प्रकाश तुपे, छात्र प्रबोधन प्रकाशन

किलबिलाट विहंगांचा, भिरभिरता अंबरात। संचारेल संजीवनी, थकलेल्या पावलात।।

भारतरत्न पुरस्कार - श्री. लालबहादुर शास्त्री - स्वातंत्र्यसैनिक, पंतप्रधान, **१९६६** (मरणोत्तर)

प्रायोजक – स्टॅटफिल्ड इक्विपमेंट, पिरंगुट, पुणे.

वाचलेच पाहिजे असे काही...



–नीलिमा करमरकर

सायना म्हटलं, की डोळ्यांसमोर उभा राहतो तिचा प्रसन्नचित्त, लोभसवाणा चेहरा आणि तिचं ते आत्मविश्वासपूर्ण हास्य ! म्हणूनच कौतुकानं तिला 'फुलराणी' हे नाव पडलं असावं.

अवघ्या २२ वर्षीय सायना नेहवाल या आंतरराष्ट्रीय किर्तीच्या बॅडमिंटनपटूनं २००७ साली लिम्का फोर स्टार ही स्पर्धा जिंकली. याखेरीज सहारा यंगेस्ट अचिव्हर्स, अर्जुन ॲवार्ड, राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार, पद्मश्री, ऑलिंपिक कांस्यपदक असे अनेक सन्मान तिने प्राप्त केले आहेत. अशी ही भारताची 'स्टार' बॅडमिंटनपटू सायना नेहवाल तिच्या या रोमांचक अनुभवकथनात आपल्या बालपणाबद्दल, बॅडमिंटन विश्वातील पदार्पणाबद्दल, आयुष्यातील जवळच्या आणि महत्त्वाच्या व्यक्तींबद्दल, करिअरमधील चढ उतारांबद्दल, जिल्हापातळी ते ऑलिंपिकमधील थक्क करणाऱ्या विजयांबद्दल या पुस्तकात भरभरून बोलते आहे.

हरियाणा येथील 'हिस्सार' गावात जन्मलेली सायना लहानपणापासूनच बॅडमिंटन कोर्टवर बागडायची. कारण तिचे आईवडील दोघेही हा खेळ खेळत असत. पुढे वडिलांची हैद्राबादला बदली झाल्यावर सुट्टीतील बॅडमिंटन शिबिराला आठ वर्षांची सायना जाऊ लागली. तिथेच तिचे या खेळातले कौशल्य प्रकट होऊ लागले. तिथल्या तिच्या खडतर सरावाचे वर्णन ऐकूनच आपण चाट पडतो. उदा. ४०० मीटर वेगानं धावणं, दोरीवरच्या उड्या, पळत जिन्यावरून चढ–उतार, ४–५ कि.मी. कमी वेगानं धावणं इ.

सायना म्हणते, शाळा सुरू झाल्यानंतर माझं आयुष्य अधिक खडतर होते. पहाटे साडेचारला उठून वडिलांबरोबर २५ कि. मी. अंतरावर बसनं सरावाला जाणं. सकाळी ६ ते ८ सराव. मग परस्पर शाळेत जाणं. साडेतीन वाजता शाळा सुटल्यावर परस्पर आईबरोबर पुन्हा सरावाला जाणं, ते रात्री ९ वाजता घरी परतणं.

पहाटे साडेचारला घर सोडलेली सायना, रात्री घरी येईपर्यंत रिक्षा किंवा बसमध्ये झोपून जायची. घरी मोठी बहीण रात्रीचा स्वयंपाक करून ठेवायची. पहिली काही वर्षं तिला अतिशय जड गेली; पण आता खेळ आवडायला लागला होता. सतत खेळणं व जिंकणं याची झिंग चढली होती.

वय वर्षे १२ ते १४ पर्यंत प्रथम जिल्हा, नंतर राज्य पातळीवर, सातवीत असताना राष्ट्रीय टप्पा ओलांडून सायना आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळू लागली. १५ वर्षांची झाल्यावर तिचं व्यावसायिक बॅडमिंटनपटू होण्याचं ध्येय कायम झालं. सायनाचं शिक्षण ११ वी नंतर संपलं; पण त्याबद्दल तिला खंत वाटत नाही. शाळेनं तिला खूप मदत केली, त्याबद्दल ती कृतज्ञ आहे. तिला 'पद्मश्री' सन्मान मिळाल्यावर शाळेच्या एका इमारतीला सायनाचं नाव दिलं गेलं आहे.

विविध स्पर्धा खेळताना हारजित होतच असते. प्रसारमाध्यमं स्ततिसुमनं उधळतात; पण कडवी टीकासुद्धा करतात. आपलं बोलणं, चालणं, वागणं यांवर सर्वांची नजर असते. याचा अनुभव तिला लहान वयातच आला. सायना आपल्या यशाचं श्रेय आपले प्रशिक्षक, आईवडील यांना देते. नानीप्रसाद, गोवर्धन सर, महंमद अशिफ आणि सध्याचे प्रशिक्षक पुलेला गोपीचंद. राष्ट्रीय पातळीवरच्या अशा अधिकृत प्रशिक्षकांबद्दल ती कृतज्ञ आहे. खेळात सुधारणा करून जागतिक पातळीवर दुसऱ्या क्रमांकावर पोचण्याचे श्रेय, ती या सर्व मार्गदर्शकांना देते. २००८

सायनाबद्दल अधिक काही... – कठोर परिश्रम, कसून सराव आणि कडक डाएटचा! मैत्रिणींशी गप्पाटप्पा, सिनेमा पार्टी याला वाव नसतो. मॅच जिंकल्यावर व्हिडिओ गेम खेळणे व शॉपिंग तिला आवडतं. क्रीडाविश्वातील एक अद्‌भुत व्यक्ती या ओळखीबरोबरच या पुस्तकात सायना आपल्याला एका मुलीच्या, बहिणीच्या, शिष्याच्या, एका सामान्य युवतीच्या भूमिकेतही भेटते.

सालच्या बीजिंग ऑलिंपिकमधील सहभाग आणि तिनं मिळवलेलं कांस्यपदक हा तिच्या मानाचा शिरपेच आहे.

या अनुभवकथनात सायनानं तिच्या अनेक सामन्यांबद्दल काटेकोरपणे त्यातील बारकाव्यानिशी लिहिलं आहे. खेळासंदर्भातील उपयुक्त टीप्सही ती आवर्जून देते. या खेळात विशेष रस असलेल्या वाचकांना ही माहिती नक्कीच उपयुक्त ठरेल. सध्या सायना कोणाची ब्रँड ॲम्बॅसॅडर आहे? कोणत्या कंपनीत सन्मानाची नोकरी करते? तिची कोणती गाडी आहे? याबद्दलचे तिचे अनुभव रोचक आहेत.

पुस्तकाची मांडणी आकर्षक आहे. मोठ्या चौकटीत सायनाच्या सरावाचं वेळापत्रक, तिचा दैनंदिन आहार, तिचे आवडते खेळाडू, आवडणारी शहरे, तिच्या कायम भरून तयार असलेल्या बॅगेचं अंतरंग, मुंबई सिनेसृष्टीशी आलेला संबंध, याशिवाय तिच्या खास आवडीनिवडी म्हणजे चित्रकला, वाचन, सिनेमा अशी गंमतशीर माहिती देखील आहे. मुखपृष्ठावरचा सायनाचे प्रकाशचित्र, बालपणापासूनचे तिचे रंगीत फोटो, अर्जुन पुरस्कार व राजीव गांधी खेलरत्न पुरस्कारांची प्रकाशचित्रं, सोनिया गांधी व प्रणव मुखर्जी यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांची अभिनंदनपर पत्रं या सर्वांमुळे आत्मकथनाला वेगळ्याच उंचीवर नेले आहे.

जागतिक पातळीवर दुसऱ्या–तिसऱ्या मानांकनावर असणाऱ्या सायनाचं हे पुस्तक एका खेळाडूचा चॅम्पियन बनण्यापर्यंतचा प्रवास उत्कटपणे उलगडून दाखवतं. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व वयोगटातील वाचकांना आवडणारं, खेळाडूंना स्फूर्ति देणारं असं हे आत्मकथन आहे.

पुस्तकाचे नाव : ध्यास जिंकण्याचा...
लेखक : सायना नेहवाल
अनु. अतुल कहाते, **प्रकाशन :** रोहन
पृ. संख्या : १२६, **किं.** ₹ १२५/-

•••

– **नीलिमा करमरकर,** ब ६, 'शशीकिरण', अशोक पथ, पुणे 411004

ओळख भावनांची

बौद्धिक खेळ

उद्देश – भावनांची जाणीव होणे, भावनांतील भेद ओळखता–व्यक्त करता येणे.

साहित्य – रद्दी वर्तमानपत्र, मासिक, कोरे कागद, लिहिण्याचे साहित्य, कात्री व डिंक इत्यादी.

सूचना – वर्तमानपत्रात–मासिकांमध्ये व्यक्तींची, प्राण्यांची, कार्टूनची चित्रे आपण बघत असतो. त्या प्रत्येक चित्राच्या चेहऱ्यावरून, देहबोलीवरून भावना व्यक्त होताना दिसतात. त्यामुळे आशय, माहिती समजायला मदत होते. तुम्ही वर्तमान पत्र/मासिकातील काही निवडक १०–१२ चित्रे व्यवस्थित कापून घ्या. प्रत्येक चित्राच्या मागे चित्राच्या आकाराचा कोरा कागद नीट चिटकवा. चित्रात नेमकी कोणती भावना व्यक्त होत आहे, असे तुम्हाला वाटते आहे; ते चित्राच्या मागील कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहा. सर्व चित्रांच्या पाठीमागे भावना लिहून झाल्यानंतर या सर्व भावनांच्या आधारावर एक गोष्ट तयार करून मित्रांना ती गोष्ट, चित्र दाखवून (पपेट करून) सांगा. हे सर्व झाल्यावर खालील मुद्द्यांवर विचार करा.

मुद्दे : १. तुम्हाला सर्व भावना ओळखता आल्या का? २. कोणत्या भावना ओळखताना व सांगताना अडचणी आल्या? त्या अडचणी तुम्ही कशा सोडवल्या?

– **जया बदी,** jaya.badi@yahoo.co.in

पक्ष्यांचे किती हे झळाळते रंग। भिरभिरण्याचे पाहा न्यारे ढंग।।

भारतरत्न पुरस्कार - श्री. व्ही. व्ही. गिरी - राष्ट्रपती, राजकीय क्षेत्रातील कारकिर्दीबद्दल, **१९७५**

प्रायोजक – श्री. राजेश शंकर शेलार, पुणे.

Tag No. CP130751 ActiveLink व्हिडिओ पाहा
पृ. क्र. १० पाहा.

शिक्षणासाठी गाव सोडून शहरात जाण्याचा विचार सुरू झाला, की आजही मुख्य प्रश्न राहतो तो म्हणजे निवासाचा. शहरामध्ये ओळखीचे कुणी नाही; वसतिगृह व खानावळ शोधायची तर आर्थिक चणचण. या समस्येवर उपाय म्हणून गेली ५८ वर्षे विद्यार्थी साहाय्यक समिती ही संस्था पुण्यात कार्यरत आहे. हजारो ग्रामीण, गरीब, होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी या संस्थेने मोलाचे योगदान केले आहे. जाणून घेऊया या संस्थेविषयी...

विद्यार्थी साहाय्यक समिती एक कल्पवृक्ष

- प्रभाकर पाटील

पुणे हे शिक्षणाचे माहेरघर समजले जाते. विविध विद्या-शाखांचे उच्च शिक्षण येथे उपलब्ध असल्यामुळे ग्रामीण भागातून शिक्षणासाठी पुण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतल्या गावाकडच्या व हुषार विद्यार्थ्यांची फार मोठी कुचंबणा होते. अशा विद्यार्थ्यांचे शिक्षण सुलभ व्हावे, त्यांना योग्य ते साहाय्य व मार्गदर्शन मिळून स्वावलंबनाने आपल्या पायावर समर्थपणे उभे राहाता येणे आवश्यक असते. ही गरज ओळखून काही सेवाभावी कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन डॉ. अच्युतराव आपटे यांच्या मार्गदर्शनाखाली १९५५ साली विद्यार्थी साहाय्यक समितीची स्थापना केली. पुढे समितीचा पसारा वाढल्यावर वसतिगृहाच्या व्यवस्थापनासाठी वेगवेगळ्या कमिटींची रचना करण्यात आली.

वसतिगृहे -

केवळ पाच विद्यार्थ्यांना भोजन साहाय्य करण्यापासून सुरू झालेल्या या कार्याचा पसारा आजमितीला खूप वाढला आहे. कार्यकर्त्यांची तळमळ, सचोटी व समाजाचा सकारात्मक प्रतिसाद या बळावरच आज समितीमध्ये सुमारे ७२५ विद्यार्थी-विद्यार्थिनी वास्तव्य करीत आहेत. समितीची सध्या चार वसतिगृहे असून त्यातील दोन वसतीगृहात ३०० विद्यार्थिनी व दुसऱ्या दोन वसतिगृहामध्ये ४२५ विद्यार्थी राहात आहेत. प्रतिकूल आर्थिक परिस्थिती असलेल्या गरीब विद्यार्थ्यांसाठी या वसतिगृहात अल्पदरात निवास, भोजन सुविधांसह व्यक्तिमत्त्व विकसनाचे उपक्रम राबविले जातात.

इ. ११ वी पासून पुढे पदवी/पदविका पर्यंतचे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश दिला जातो. यासाठी विद्यार्थ्याने आपापला महाविद्यालयीन प्रवेश मिळविल्यानंतर समितीच्या वसतिगृहाच्या प्रवेशासाठी अर्ज करायचा असतो. अर्ज केल्यावर प्रत्यक्ष मुलाखत घेऊन विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. प्रवेशासाठी गुणपत्रक, उत्पन्नाचा दाखला, महाविद्यालय प्रवेश पावती, रेशन कार्ड व प्रतिज्ञा पत्र अशी कागदपत्रे लागतात. आर्थिक दृष्टीने प्रतिकूल तरीही शिक्षणाची जिद्द असणाऱ्यांना प्रवेश दिला जातो.

'स्वच्छता-स्वावलंबन-समता' या त्रिसुत्रीवरच संस्थेचा गेली ५८ वर्षे प्रवास सुरू आहे. वसतिगृहातील निरनिराळी कामे विद्यार्थी करतात. संपूर्ण इमारत, अंतर्गत व बाह्य स्वच्छता, स्वच्छता गृहे, जिने, व्हरांडे यांची स्वच्छता, देखभालीची कामे विद्यार्थीच करतात. याबरोबरच समितीसाठी निधी संकलन, जेवण वाढणे, कार्यक्रमांचे नियोजन, सहली इ. मध्येही

गुलमोहराचे झाड बहरले, लक्ष फुलांचे थवे। हिरवी पाने लवलव करती, हरवून जाती फुलांसवे।।

भारतरत्न पुरस्कार - श्री. के. कामराज - सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्याबद्दल, **१९७६** (मरणोत्तर)

प्रायोजक - सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे.

विद्यार्थ्यांचा सहभाग उत्स्फुर्त असतो. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक तास रोज काम करून 'कमवा व शिका' या योजने अंतर्गत अर्थार्जन करावे ही समितीची अपेक्षा आहे. यामुळे एकप्रकारे पालकांचाही भार हलका होण्यास मदत होते. त्यासाठी संस्थेत 'कमवा व शिका' हा स्वतंत्र विभाग आहे. विभागात ६-७ कार्यकर्ते आहेत. विद्यार्थ्यांची आवड व त्यांचा अनुभव विचारात घेऊन विद्यार्थ्यांना योग्य त्या प्रकारचे काम मिळवून देण्याचे काम, हा विभाग करतो.

व्यक्तिमत्त्व विकास :

'समाजात बदल घडवून आणायचा तर त्याचा केंद्रबिंदू हा युवकच असला पाहिजे,' या विचाराने समितीने युवक गटासाठी काम करण्याचे ठरविले. विद्यार्थ्यांच्या मूलभूत समस्यांचे निवारण झाल्यानंतर परिवर्तनशील विचार रुजविण्याचे काम येथे विविध उपक्रमांद्वारे केले जाते. क्रमिक व अवांतर पुस्तकांचा लाभ घेण्यासाठी सुसज्ज ग्रंथालय उपलब्ध आहे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांची रोज पहाटे ५.३० वाजता योगासनांपासून आपल्या दिनचर्येला सुरुवात होते. त्यानंतर ते सर्व विद्यार्थी आपापल्या महाविद्यालयात जातात. सायंकाळी व्यक्तिमत्त्व विकासासाठी निरनिराळे उपक्रम राबविले जातात. यामध्ये सोयीनुसार व आवडीनुसार विद्यार्थी सहभागी होतात. इंग्रजी संभाषण वर्ग, गटचर्चा, उद्योजकता कार्यशाळा, व्यवसाय मार्गदर्शन, संगणक सराव, विविध क्षेत्रांतील मान्यवर व्यक्तींशी सुसंवाद, शैक्षणिक सहली, मुलाखत तंत्र, सांस्कृतिक व कला स्पर्धांतर्गत वक्तृत्व, वाद-विवाद, प्रश्नमंजुषा, काव्यवाचन, कथाकथन, हस्ताक्षर, रांगोळी, प्रकल्प व चित्रकला प्रदर्शन अशा विविध कार्यक्रमांमधून विद्यार्थी आपापले व्यक्तिमत्त्व फुलवतात. स्पर्धेमधील विशेष गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा समितीतर्फे सत्कार करण्यात येतो. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे, त्यांचा आत्मविश्वास वाढवण्याचे कार्य समिती करते.

आज ५८ वर्षांचा मागोवा घेतल्यास असे लक्षात येते, की समितीमध्ये राहून आज असंख्य माजी विद्यार्थी समाजात निरनिराळ्या क्षेत्रांत आपल्या कामाचा परिणामकारक ठसा उमटवत आहेत. यात आमदार, विद्यापीठाचे कुलसचिव, प्राचार्य, प्राध्यापक, उद्योजक, शासनातील उच्च अधिकारी, डॉक्टर्स, आर्किटेक्ट, बांधकाम व्यावसायिक, न्यायाधीश, चार्टर्ड अकौंटंट असे अनेक उच्च शिक्षित विद्यार्थी महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. अनेक माजी विद्यार्थी समितीसाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मदतही करीतआहेत.

महाविद्यालयीन वसतिगृहे म्हणजे 'लॉजिंग-बोर्डिंग' असे काहीसे स्वरूप बऱ्याच ठिकाणी पाहायला मिळते. मात्र, याला सुयोग्य पर्याय देऊन समितीने विधायक वसतिगृहे उभी केली व त्यातील अनुशासन काटेकोर व काही वेळा कठोर ठेवण्यात आले. समितीचे माजी अध्यक्ष व थोर स्वातंत्र्य सेनानी कै. अच्युतराव पटवर्धन यांनी एकदा पुढील विचार मांडले होते, 'समितीमध्ये एक उत्तम नागरिक घडावा यासाठी समिती विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करून देईल. समिती हा कल्पवृक्ष आहे. मुळापासून स्वत: बदलायची तयारी ठेवा, समाज आपोआप बदलेल.'

आज ५८ व्या वर्षातही समितीचा हा कल्पवृक्ष उत्साहाने व समाधानाने डोलत आहे.

•••

- प्रभाकर पाटील

(माजी विद्यार्थी, कार्यकर्ता व विश्वस्त,
विद्यार्थी साहाय्यक समिती)

ओळखा मी कोण?

दात माझे कट्यारीसम
तीक्ष्ण अन् धारदार !
कोरितो तयांनी वेळू
बांधाया घर मम बाळ !
रूंजी घालता फुलांवर,
मी आणितो घरी
मधुबिंदूंनी भिजलेले
परागकण !
आता सांगा पाहू
आहे मी कोण?

(उत्तर अंकात अन्यत्र)

कणाकणांतून घ्या कानोसा, अवघ्या सृष्टीत। ऐकू येईल सुखमय, मंगल शांतीचे गीत।।

भारतरत्न पुरस्कार - श्रीमती मदर तेरेसा - उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल, **१९८०**

प्रायोजक - श्री. शंतनू पटवर्धन, इलिनॉइस, अमेरिका.

ऐकतो मराठी, वाचतो मराठी

– चंद्रशेखर हडप

प्रिय दोस्तांनो, मला आठवतं मी लहानपणी सहावी – सातवीत असताना माझे काही मित्र एकमेकात विचित्र बडबड करताना आढळले – **'रामाच्या दू, कानात ऊ, त्तमचि वडा.'** हे वाक्य ती मुलं परत परत म्हणून एकमेकांच्या हातावर टाळ्या देत हसत होती. आणि थोड्या वेळानं त्या वाक्याचा अर्थ मला समजला आणि मीही त्यांच्यात सामील झालो. त्या वाक्याचा अर्थ काय होता माहीत आहे? 'रामाच्या दुकानात उत्तम चिवडा.'

हे आठवण्याचं कारण म्हणजे, काही दिवसांपूर्वी एका पुस्तक प्रदर्शनात मला एक पुस्तक मिळालं. पुस्तकाचं नाव काय होतं सांगू – **'भ यंकरसुं दरम राठी भाषा.'** अर्थात 'भयंकर सुंदर मराठी भाषा.' लेखक द. दि. पुंडे. या पुस्तकात भाषेतल्या गमतीजमती आणि भाषेबद्दलची बरीच माहिती आपल्याला मिळते. आपली भाषा वाचताना जसे आपण समृद्ध होतो तसंच ती ऐकतानाही आपण समृद्ध होत जातो.

पूर्वीच्या काळी देवळांमधून कीर्तनं व्हायची. कीर्तनात पूर्वरंग आणि उत्तररंग, असे दोन भाग असत. पूर्वरंगात अभंगाबरोबरच श्लोक, पद असा थाट मांडत कीर्तनकार बरीच माहिती श्रोत्यांपर्यंत पोहोचवायचे. एका कीर्तनात ऐकलेलं एक वाक्य माझं असंच पाठ झालं होतं.

''मला सर्व कळते, असे ज्याला कळते,
त्याला काय कळते, ते सर्वांना कळते.''

ऐकणारा चांगला कान आणि साठवणूक करणारं मन असलं, की अशी 'हट के' वाक्यं सहज लक्षात राहतात.

मग काय, मे महिन्याच्या सुट्टीत घरी आमची मावस, आत्ते भावंडं आल्यावर, अशा गमतीशीर वाक्यांना, कोड्यांना नुसता उत यायचा. घरात तेव्हा १०–१२ मुलं तरी असायचीच. त्याकाळी टी.व्ही.

नव्हता, वीज आलेली नव्हती. संध्याकाळी कंदिलाच्या प्रकाशात आमच्या गप्पा चालायच्या. एकदा असेच गप्पा मारत असताना माझ्या वडिलांनी आम्हाला एक कोडं घातलं.

'वानरासी पुच्छ तीन, हत्तीसी दंत सहा,
सशाशी कान नाही, अश्वासी शिंग पाहिले ।।'

श्लोकातले सगळे शब्द तर माहीत होते; पण हा काय विचित्रपणा? वानराला तीन शेपट्या, हत्तीला सहा दात, बिनकानाचा ससा आणि घोड्याला शिंग? आम्हाला काही समजेचना! एकमेकांना विचारूनही काही अर्थबोध होईना! तेव्हा आम्ही भाऊंना म्हणजे माझ्या वडिलांना म्हणालो, ''भाऊ, आम्ही हरलो. आता तुम्हीच सांगा काय ते.''

मग भाऊंनी तोच श्लोक असा म्हणून दाखवला,

'वानरासी पुच्छ, तीन हत्तीसी दंत सहा,
सशासी कान, नाही अश्वासी शिंग पाहिले ।।'

अरेच्या, सारं जसंच्या तसंच आहे की; पण कोणत्या शब्दानंतर 'थांबायचं' हे कळलं नाही, की अर्थाचा कसा अनर्थ होतो; ते या श्लोकानं शिकवलं. मग हाच श्लोक शाळा सुरू झाल्यावर 'कोडं' म्हणून मित्रांना सांगायला सुरुवात केली.

आम्हाला सातवी, आठवीत केव्हातरी रेव्हरंड टिळकांची 'केवढे हे क्रौर्य' ही कविता होती. त्यातली एक ओळ चालीत म्हणताना आम्ही अशी म्हणायचो,

म्हणाल भुलली, जगा विसरली, प्रिया लेकरा ।

पण त्यामुळे कवितेचा अर्थ आशयाशी अगदीच विसंगत वाटत होता. प्रत्यक्षात मात्र त्या ओळी अशा म्हणावयाच्या होत्या–

म्हणाल भुलली जगा, विसरली प्रिया लेकरा ।

ही कविता आमचे शिक्षक आम्हाला छान समजावून सांगायचे. पण खरं सांगायचं, तर ही कविता योग्य पद्धतीनं म्हणतानाच त्यातलं कारुण्य आम्हाला समजून आलं.

या पत्राच्या सुरुवातीस द. दि. पुंडे यांच्या ज्या पुस्तकाचा मी उल्लेख केला त्यात बोली भाषेतल्या अनेक गमती जमती तुम्हाला वाचता येतील. उदा. कोणी ‘लवकर चल,’ असं म्हटलं तर आपण म्हणतो, ‘थांब पायात चप्पल तर घालू दे.’ किंवा म्हणतो, ‘अरे, अंगात शर्ट तरी घालू दे.’

पुंडे म्हणतात,. ‘‘खरंच आपण पायात चप्पल घालतो? का चपलेत पाय घालतो?, अंगात शर्ट घालतो का शर्टात अंग घालतो.’’ (पान ८५) इतकंच नाही तर मराठीत आपण डोळ्यांना न दिसणाऱ्या जीवांना ‘जंतू’ म्हणतो; पण तेलुगू भाषेत वाघासारख्या महाकाय दिसणाऱ्या जीवाला ‘जंतू’ म्हणतात. आहे की नाही गंमत?

शिवाजी महाराजांच्या काळात उत्तर हिंदुस्थानातून आलेला कवी भूषण हा तर मोठा शब्दप्रभू होता. मराठी मुलखात किती सुबत्ता होती. हे सांगताना तो लिहितो,

तीन बैर खाती थी, वो तीन बैर खाती है ।
नासपती खाती थी, वो बनासपती खाती है ।।

याचा अर्थ असा – मोंगलांच्या काळात ज्या घोडीला तीन बोरं खाऊन रहावं लागत होतं; ती आता तीन वेळा यथेच्छ खाते. जी नासकी पानं खाऊन राहात होती; ती आता वनस्पती तूप खाते.

तुम्हाला कबीराचे दोहे माहीत आहेत? त्यांनी एक गमतीदार दोहाही लिहिला आहे. अर्थात त्यात शिकवणपण आहेच.

दात जिभेला म्हणतात,

हम बत्तीस तू अकेली माय ।
एक दफा चभ जाये तो, फिरयादी कहा जाय ?

त्यावर जीभ दातांना सांगते...

तुम बत्तीस, मै अकेली माय ।
एक दफा टेढी चलू तो बत्तीसी गिर जाय ।।

पाहा, आपण मराठीतून हिंदीत केव्हा गेलो ते आपल्याला देखील कळलं नाही.

चला तर मग, सुट्टीत आता असं काहीतरी गमतीदार वाचा आणि तुम्हाला सापडलेल्या गमती जमती ‘छात्र प्रबोधन’कडे पाठवायला मात्र विसरू नका.

•••

– चंद्रशेखर हडप
मु. पो. काळसे, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग

‘कार्यानुभव’ घ्या... समृद्ध व्हा...

‘छात्र प्रबोधन’च्या कार्यालयात या आणि कामातील ‘मजा’ अनुभवा!

दि. ५ ते १५ मेच्या दरम्यान ११ ते ४ या कार्यालयीन वेळात नवीन काही शिकण्याचा अनुभव घेण्यासाठी जरूर या. त्यासाठी दहा दिवसांत मिळून **किमान २० तास** काम करणं आवश्यक आहे.

उत्सुक विद्यार्थ्यांनी आपली नावं ‘छात्र प्रबोधन’ कार्यालयात **२५ एप्रिल २०१३** पर्यंत नोंदवावीत.

छात्र प्रबोधनची व्यक्तिविकासाशी निगडित संग्राह्य पुस्तके

- **व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत** ७०
- **प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास** ५०
- **कल्पक बनू या**......................... ८०
- **Be Creative**. १५०
- **तरंग मनाचे** ५०
- **गीता–गीताई**............................ १०

दिस आले उन्हाळ्याचे, आम्रवृक्ष मोहरती। कुहूकुहू कोकिळा, एकमेका साद देती।।

भारतरत्न पुरस्कार - श्री. खान अब्दुल गफारखान, स्वातंत्र्यसेनानी, **१९८७**

प्रायोजक – डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लास्गो, स्कॉटलंड.

रिंगा रिंगा

– जयश्री काटीकर

(रंगमंचाचे २ मुख्य भाग, डावीकडे 'अभीची शाळा' आणि उजवीकडे त्याचं घर आहे. समोरच्या जागेत अभी स्वत:च्याच विचारात येरझाऱ्या घालतो आहे. त्याच्या हातातल्या २ मोठ्या रिंगांना अचूक जागा शोधतो आहे. त्या व्यवस्थित मांडून झाल्यावर अभी प्रेक्षकांकडे बघून बोलायला सुरुवात करतो.)

अभिषेक/ अभी : नमस्कार, मी अभिषेक. बच्चन नव्हे हं! नुसताच अभिषेक. आडनावात काय आहे? नाव महत्त्वाचं! तर मी अभिषेक. ही इकडे डावीकडं दिसतेय नं ती आमची शाळा– अभिनव विद्यालय आणि उजवीकडं दिसतंय ना ते माझं घर. बस्स एवढंच ! आत्ता शाळा आणि घर याशिवाय आमच्या आयुष्यात दुसरं काही महत्त्वाचं असतं का? तर मी सांगत काय होतो; मी अभिषेक, ही माझी शाळा आणि हे माझं घर. आणि हो या इथे माझ्या हातात आहेत ना त्या रिंगा– या नाटकात महत्त्वाची भूमिका बजावणारं एक पात्रच म्हणा नं हवंतर! माझ्या आणि हो 'त्याच्या' इतक्याच महत्त्वाच्या. कसंय, एक सॉलिड गोची आहे या नाटकात. या नाटकात प्रसंग असे २– ३ च; पण तेही महत्त्वाचे नाहीचेत मुळी. खरं नाटक घडलंय ते इथे माझ्या आणि त्याच्या मनात तेच तर मला तुमच्यापर्यंत पोचवायचंय.

(दरम्यान 'गण्याचं' पात्र रंगमंचावर प्रवेश करतं. घरोघरी वर्तमानपत्र टाकण्याचं, नंतर कुणाकडं बागकाम वगैरे करण्यांच काम करत राहतं.) (अभी खाली ठेवलेली रिंग हातात घेऊन...)

ही पाहा रिंग ! ही साधी सुधी रिंग नाही... मी जेव्हा या रिंगमध्ये येऊन बोलायला लागीन ना तेव्हा 'माझं' मनच बोलेल तुमच्याशी. अगदी तळातलं ! आणि तशीच एक रिंग गण्याजवळही आहे बरं का! आता तुमच्या लक्षात आलं असेल की नाटकातलं दुसरं पात्र 'तो' म्हणजे गण्या ! आणि हो गण्या जेव्हा त्याच्या रिंगेत जाईल तेव्हा त्याच्या मनातलं नाटकही उलगडेल आपल्यासमोर आपोआप. तर मंडळी चला तर आमच्या अभिनव विद्यालयात... पण साधारण महिन्याभरापूर्वीच्या हं ...

(शाळेची घंटा वाजतेय अभी शाळेकडे जातो. गण्याही त्याची चाललेली कामं उरकून धावतपळत, हाशहुश करत शाळेत पोचतो. शाळेत अभिषेकचा ग्रुप full form मधे आहे. गण्या या group कडे पाहून हसतो. अभिषेक मात्र तो दिसताक्षणीच तोंड फिरवतो. गण्या उगाचच भोवती घुटमळतो आहे.)

अभी : छे! हा सकाळी सकाळी दिसला ना, की माझा अख्खा दिवस खल्लास होतो यार! काय ध्यान आहे, काय हसणं आहे. मला तर शंका आहे मला बघितल्यावर मुद्दामच मला खिजवण्यासाठी हसतो हा, असं या कानापासून त्या कानापर्यंत; जिवणी फाटेपर्यंत!

निनाद : (कुत्सित हसत) कूल डाऊन! कूल डाऊन

मि. बच्चन! अरे, पेप्सोडेंट स्माईल आहे यार त्याचं !!

अभिषेक : अरे, कसलं पेप्सोडंट आणि कसलं कोलगेट? असलंच तर 'माकडछाप' असेल फार तर हे स्माईल.

पार्थ : ए थांब! एक गंमत करू. ए, ए, भोप्याऽऽ

निनाद : अे, चेष्टा पुरे हं.

पार्थ : गप रे. त्याला थोडेच कळणारेत आपले ठेवणीतले टाँटस् ! ते कळायलाही आपल्यासारखं स्कॉलर असावं लागतं म्हटलं !!

(गण्याजवळ येऊन अजागळासारखा हसत उभा आहे)

पार्थ : काय भोप्या? सॉरी हं, काय गणेश, कसे गेले चाचणीचे पेपर? मस्त होते ना?

(गण्या नुसताच होकारार्थी मान हलवतो.)

निनाद : मग किती भोपळे यावेळी?

(हसत हसत अभिषेकला टाळी देतो. मग नुसताच हसण्या -खिदळण्याचा आवाज. गण्याला कळत नाही काय करावं ते. शाळेच्या घंटेचा आवाज, मुलांची धावपळ, गणेश नेमका अभिषेकनं ठेवलेल्या रिंग मध्ये येऊन थांबतो. अडकतो. समोर प्रेक्षक. रंगमंचावर सामसूम. अभी मात्र लपून छपून 'शाळेतून' हे दृष्य बघतो आहे.)

गणेश : *(हळूहळू भीत भीत बोलू लागतो.)* खरंतर अभिषेकसारखं मला बोलता येतच नाही मुळी. अशक्यच आहे ते. पण या रिंगेत अडकलोय ना मी. आता मनातलं बोलल्याशिवाय माझी सुटकाच नाही. माझे असे मळलेले, फाटलेले कपडे पाहून खरंच का माझ्याशी कोणाला बोलावंसं वाटत नसेल? इतका का मी 'बावळट ध्यान' दिसतो? खरंतर मलाही वाटतं आपल्यालाही मित्र असावेत, त्यांच्याबरोबर आपणही भरपूर दंगामस्ती करावी, हसावं-खिदळावं; जमलं तर अभ्यासही करावा!!! पण म्हणूनच मी अभिषेक-पार्थ. निनादशी बोलायला जातो. ते सगळेच हुशार आहेत, स्कॉलर आहेत; पण त्यांच्या दृष्टीनं मी म्हणजे....

अभी : *(दरम्यान अभी त्याच्या रिंगेत आलाय)* झीरो. अ बिग झीरो. आमच्या एवढा नसू दे स्कॉलर पण किमान सगळ्या विषयात किमान पास तरी झालं पाहिजे की नको आमच्याशी मैत्री करायची तर. उगाच आपलं सारखं चिकटायला येतो, चिकटू कुठला! माझे सगळे मित्र एकदम स्मार्ट, टापटिपीत राहणारे आणि या गण्याचे कपडे पाहा. शर्टाचा मूळचा रंग कुठला, त्याचं त्यालाही सांगता येणार नाही. छे छे ! आमच्याशी मैत्री करायची लायकीच नाही.

गणेश : सांगितलं ना; कुण्णा कुण्णाला माझ्याशी बोलावं, माझ्याशी मैत्री करावी, असं वाटतंच नाही मुळी! मी जवळ जायचा प्रयत्न केला त्यांच्या, तर उगाच काहीतरी चिडवतात. माझ्याबद्दल आपापसात कुजबुजतात. मला खरंच वाईट वाटतं. पण मग अशावेळी मी काय करायचं नेमकं, काय बोलायचं; मला काही उमगतच नाही. मग मी हसतोच फक्त. त्यांना वाटतं त्यांचं चिडवणं मला कळतच नाही. तसं तर तसं. एकूण काय तर मी कुणाला आवडत नाही. माझा कुणी मित्र नाही, सगळेच मला टाळतात.

अभी : सुरुवाती सुरुवातीला तर अभ्यास पूर्ण करण्यावरूनही रोज बोलणी खायचा गण्या वर्गात. माझा अभ्यास वेळच्या वेळी पूर्ण असतो. अगदी याउलट गण्या. किती बेजबाबदार वागणं हे ! आई-वडील ओरडत कसे नाहीत कोण जाणे ! नसते उद्योग करत असतो मूर्ख लेकाचा !

(दरम्यान अभिषेकच्या घरात वावर सुरू झाला आहे. आईचं अस्वस्थपणे आत-बाहेर करणं सुरू आहे. रिंगेतून निघून अभिषेक त्याच्या घरात जाऊन टी. व्ही. पाहात

नवीन वेली चैत्रपालवी, झाडांवरी धुमारी। गर्दकेशरी बांधून फेटा, गुलमोहर फुलला दारी॥

भारतरत्न पुरस्कार - डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारतीय घटनेचे शिल्पकार, **१९९०** (मरणोत्तर)

राष्ट्रीय प्रश्नांवर मासिक व्याख्यानमाला - द्वारा ज्ञान प्रबोधिनी - जनतंत्र उद्बोधन मंच - २४२०७१८७

आरामात पसरला आहे. सायलीचा, त्याच्या बहिणीचा एकीकडे अभ्यास सुरू आहे.)

आई : अभी, नीट उठून बस. लोळतोयस काय असा? ऐकतोयस ना? बाबांच्या ऑफिसातले पाहुणे यायचेत, लक्षात आहे ना?

अभी : *(काहीसा वैतागून)* आई, हज्जारदा सांगितलंयस ना? परत परत काय तेच उगाळतेस? मस्त 'जुरासिक पार्क' लागलाय बघू देत जरा.

आई : तो नंतर बघ. आता त्या वाण्याकडून तुलाच सामान आणावं लागेल हं जाऊन. *(असं म्हणत आत जाते)*

अभी : (सायलीकडे पाहून) फोन करायचा ना सायली त्याला. आणि मागवून घ्यायचं सामानं. आईचं म्हणजे ना अतीच असतं अगदी !

सायली : अभी दादाऽऽ केला होता रे फोन तिनं. इतकं काही तिला 'हे' समजू नकोस हं ! पण 'नवीन पोऱ्या ठेवलाय, त्याला अजून पत्ते माहीत नाहीत' दुकानातले काका म्हणाले. त्यामुळे सामान आणायला तुलाच जावं लागणारेय हं दादा. मी अभ्यास करतेय.

आई : अभी जा बाबा, ही बघ यादी. चल ऊठ आधी.

'आई अभी आणि टी.व्ही. यांच्यामध्ये येऊन उभी राहते. तेव्हा अगदी नाईलाजाने अभी उठतो. बाहेर जाण्यासाठी दार उघडणार तोच दारावरची बेल वाजते. गण्या दोन्ही हातात वाण सामान घेऊन उभा आहे... गण्या चप्पल बाहेर काढून आत येतो. सामान ठेवतो. (जायला निघतो.)

अभी : आई, हा गण्या-गणेश, माझ्या वर्गात आहे. मागच्याच वर्षी आलाय.

आई : हो का? कुठे राहतोस रे गणेश?

गणेश : इथे पुढेच. नाल्याच्या पुढच्या नागपुरे वस्तीत

आई : घरी कोण कोण असतं तुझ्या? सायली, लाडू आणून दे गं गणेशला.

गणेश : माझा बा अन् मी.

(गणेश कोरडेपणानं उत्तर देतो)

आई : वडील काय करतात तुझे

गणेश : *(सायलीनं दिलेला लाडू खात; हळू आवाजात)* हमाल आहेत. सकाळ सकाळचं जातात वरच्या चौकात तरच कामं भेटतात.

आई : गणेश, ये बरं का रे परत. अभी तुझा मित्रच आहे ना ! कधीही येत जा.

(गणेश मानेनंच 'हो' म्हणतो. अभीकडे पाहिल्या न पाहिल्यासारखं करत घराबाहेर पडतो. हळूहळू त्याच्या 'रिंगे'त येऊन उभा राहतो.)

अभी : *(स्वत:च्या रिंगेत उभा राहून)* त्या दिवशी हा प्रसंग घडला खरा; पण मला नक्की काय वाटलं, सांगता येत नाही. आईनं गण्याला किती चटकन् माझा मित्र करून टाकलं होतं. मला खटकलं का ते? नक्की काही कळत नाहीये. पण आईची तेव्हाची दोन वाक्य मात्र माझ्या अगदी पक्की लक्षात राहिली. ती म्हणाली होती, ''किती कष्ट करतोय तरी किती हसतमुख आहे नाही?'' आणि दुसरं वाक्य म्हणजे ''या सगळ्या कामाच्या व्यापात अभ्यास कधी करत असेल रे तो?'' गण्या घरची सगळी कामं करतो म्हणजे नक्की काय करतो हे मात्र मी त्याला नक्की विचारायचं ठरवलं आहे !

गणेश : *(त्याच्या रिंगेत, काहीसा हवेत तरंगल्यासारख्या, आनंदी मूडमध्ये)* किती छान घर आहे नाही अभीचं? आणि आईपण किती छान आहे! आई अशीच असते का? आपुलकीनं चौकशी करणारी, गोड बोलणारी? आणि बहीणही अशीच असते? खाऊ देणारी? आणि मग अशा छान छान घरातली मुलंही अभीसारखीच छान, हुशार असणारचं की!

(एवढं बोलून गणेश जातो.)

अभी : *(रिंगेत उभा राहून)* त्या दिवशी मला काय झालं होतं कुणास ठाऊक? धड ना अभ्यासात लक्ष लागत होतं; धड ना टीव्हीत. कसंतरीच होत होतं. शेवटी संध्याकाळी उठलो आणि तडक घराबाहेर पडलो. वाण्याच्या दुकानापाशी जाऊन उगाचच रेंगाळलो. *(घराशेजारच्या वाण्याच्या दुकानात गण्या काम करतोय. त्या दिशेने पाहात)* गण्या दिसतोय का ते पाहू लागलो. आत जायचा काही धीर होईना पण ! एवढ्यात गण्यानंच मला हात केला. मग मीही त्याला हात केला. *(दोघं एकमेकांना हात करतात.)* माझी भीड चेपली. मी दुकानात गेलो. गण्याला विचारलं उद्याचा इंग्रजीचा गृहपाठ झाला? *(गण्या नकारार्थी मान हलवतो. सोबतीला ठेवणीतलं हास्य होतंच.)* मग मी तडक घरी आलो. माझी गृहपाठाची वही त्याला नेऊन दिली. बाकी त्यावेळी, त्याठिकाणी मी अजून करू तरी काय शकत होतो?

गणेश : *(दुकानातून बाहेर येऊन रिंगेत येऊन उभा आहे. उत्सुकतेनं वही न्याहाळतो आहे.)* किती सुंदर वळणदार अक्षर आहे अभीचं ! वहीपण किती टॉपटिप आहे ! कव्हरही छान आहे वहीला. नाहीतर माझी वही... तीही माझ्यासारखीच... अजागळ... पण आज अभीनं मला अचानक वही का आणून दिली? कधीही माझ्याशी न बोलणारा, मला टाळणारा अभी आज माझ्याशी आपणहून बोलला कसा काय? माझी कीव तर नसेल करत तो? मला आता या क्षणी आनंद व्हायला पाहिजे की दु:ख? जाऊ दे. एवढा विचार करत बसायला वेळ कुणाला आहे इथं. चटकन् गृहपाठ करून पटकन् मोकळं होऊन जाऊ, हे उत्तम !

अभी (रिंगेतून) **:** खरंच मला का द्यावीशी वाटली वही गण्याला? त्याच्याबद्दल कीव वाटली म्हणून, माणुसकी म्हणून की मित्र म्हणून?... त्यानंतर तसं आम्ही शाळेत रोजच पाहत-भेटत होतो एकमेकांना. त्याचं ते 'माकडछाप' इरिटेटिंग स्माईल मला आता एवढं त्रास देत नव्हतं, हेही लक्षात येऊ लागलं होतं माझ्या ! त्यानंतर शुक्रवारी घडलेल्या शाळेतल्या प्रसंगानं तर कडीच केली सगळ्यावर.

(पुढील प्रसंग... शाळेत मुलांची वर्दळ. समोर ४-६ रोपं मांडलेली. अभीचा गट त्याभोवती काम करतोय.)

निनाद : साथी हाथ बढाना, अरे या नं मदतीला. नुसतं पाहात काय बसलात?

पार्थ : सर सुद्धा ना ! नाही ती कामं लावून देतात मागं. आत्ता ऑफ तासाला मस्त क्रिकेट खेळलो असतो तर... हा नुसता वैताग...

अभी : तर काय ! चरी खोदा, अळी करा. कुदळच ना रे ही? का हे फावडंय नी ती कुदळ? कसं धरायचं तेही धड माहीत नाही...

(आजूबाजूला बघतो. सर दिसत नाहीत)

पार्थ : सर नाहीच्चेत इथे. मग आपण कशाला घाम गाळतोय फुकटचा? चल चल, सटकूया इथून.

निनाद : ए, पण सर आले तर तेवढ्यात?

पार्थ : ए रडूबाई, चल लवकर, उगाच नस्त्या काळज्या नको. सर आले, की निघताही यायचं नाही मग. आणि इतका वेळ केलंच की काम. पण नाही जमलं. तर त्यात एवढं काय? हा आपला दोष थोडाच. ए, चल रे अभ्या. *(पुढे गण्या काम करताना दिसतो.)*

अभी : *(रिंगेत येऊन)* गणेश काय आखीव - रेखीव, सुंदर अळी केलीस तयार ! बाप जन्मात आपल्याला नसतं बुवा जमलं हे असं काही करायला.

(अभी गण्याचं काम बघत उभा आहे.)

गणेश : *(जागेवरून काम करता करता)* अरे अभी

भारतरत्न पुरस्कार - श्री. राजीव गांधी, पंतप्रधान, **१९९१**, (मरणोत्तर)

सौर चैत्र शके १९३५ **पुण्यामध्ये मुलींसाठी - क्रीडा दले, विज्ञान दल -** द्वारा ज्ञान प्रबोधिनी- युवती विभाग-मेधाविनी ☎ ९४२३१६२१३४

तू? असं काय बघतोयस? त्या कुलकर्ण्यांच्या बंगल्यात होतो ना आधी कामाला, तिथे मी बागकामच करायचो. म्हणून सवयीनं जमतंय मला हे सारं करायला.

अभी : *(रिंगेतून)* म्हणजे? किती आणि कोणकोणत्या प्रकारची कामं केलीत गण्यानं आजवर? स्वयंपाक करणं, घरचे केरवारे, भांडी घासणं, कपडे धुणं, बागकाम करणं, सकाळी वर्तमानपत्र टाकणं, वाण्याकडे पुड्या भरणं आणि शिवाय शाळा शिकणं, अभ्यास करणं... छे माझीच दमछाक होतेय. केवढं केवढं करतोय गण्या! आणि मी? फक्त अभ्यास? अभ्यासाव्यतिरिक्त मला काय येतं? मी शाळेत जायच्या वेळी आई मला डबा करून देते; दोन वेळचं जेवण ताटात वाढून देते. मग माझ्या हुशारीचा मी इतका गर्व करणं बरोबर आहे का? गुणांच्या बाबतीत मी वरचढ असेनही कदाचित; पण अनुभवांच्या बाबतीत मात्र...*(गण्याकडे पाहात)* गण्या तू खरंच great आहेस रे !

गण्या : अरे, २-४ वेळा तू केलीस ना अळी तयार की, तुलाही येतील रेखीव अळी करायला, फार काही अवघड नसतं रे हे. इतकं कशाला मनाला लावून घेतोयस तू?

अभी : *(रिंगेतूनच)* त्याच्या या वाक्यानं तर माझी दांडीच उडाली ! मी समजत होतो त्याहून किती वेगळा आहे गण्या. किती समजुतदार नि प्रेमळ ! मी आत्तापर्यंत किती मग्रुरीनं आणि आखडूपणानं वागलो त्याच्याशी!! माझी मलाच लाज वाटू लागली. किती चुकतो आपण एखाद्याला त्याच्या बाह्यरूपामुळे ओळखण्यात !

अभी : *(रिंगेतून गण्याला उद्देशून)* गण्या, तू आठ वाजेपर्यंत असतोस ना रे दुकानात? मग नंतर

येत जाशील घरी? आपण तासभर तरी मिळून अभ्यास करूया ! अभ्याससुद्धा काही फार अवघड नसतोच रे ! तू थोडावेळ काढू शकलास ना अभ्यासाकरता, तर तुलाही तो सहज जमेल... अगदी नक्कीच जमेल... मग येत जाशील ना?

(गण्या त्याच्या नेहमीच्या सवयीप्रमाणं मान हलवत हसतो फक्त. मग टुणकन् उडी मारत रिंगेत जातो.)

गण्या : छे छे ! काल-परवापर्यंत मला वाटत होतं हा अभी माझी कीवच करतोय; पण तसं अजिबातच नाहीये बरं, खरंच मनापासून बोलतोय तो. तुम्हालाही तसंच वाटतंय ना? तो एवढा मैत्रीचा हात पुढे करत असताना मी इथे असा कोरडा कसा राहू? मला या क्षणी, आत्ता खरं खरं काय वाटतंय सांगू?

(गणेश आणि अभिषेक दोघेही एकदम.)

अभिषेक-गणेश : असं वाटतंय की या 'रिंगा' मधून बाहेर पडून खरी खरी मिठी मारावी 'त्याला.'

(दोघं एकदम एकमेकांकडे बघून खळखळून हसतात. रिंगांमधून बाहेर येत एकमेकांना कडकडून मिठी मारतात.)

•••

मूळ कथालेखिका व नाट्यरूपांतर - जयश्री काटीकर
एफ-३०१, रिव्हरव्ह्यू रेसिडेन्सी, सनसिटी रस्ता,
निंबजनगर, आनंदनगर, सिंहगड रस्ता, पुणे 411051
jayakatikar@gmail.com

आरोग्यम् धनसंपदा !

– डॉ. रमेश गोडबोले

जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्याचा अर्थ शारीरिक, मानसिक, समाजिक व आध्यात्मिक स्वास्थ्य असा खूपच व्यापक केला आहे. यातील शरीर व मन या प्रत्येकाच्या आरोग्यरूपी नाण्याच्या दोन बाजू आहेत. शरीर बलवान व सुदृढ असेल पण मन कमकुवत असेल, तर स्वास्थ्य लाभणार नाही. तसेच मन आनंदी व प्रसन्न असेल पण शरीर व्याधीग्रस्त असेल, तरीही स्वास्थ्य लाभणार नाही. म्हणून शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी शालेय जीवनापासूनच जाणीवपूर्वक काही सवयी लावून घेऊन त्यानुसार आपण आचरण केले, तर पुढील आयुष्यात आपल्याला उत्तम आरोग्याचा लाभ मिळतो. त्यासाठी आपण कोणती जीवनशैली (Lifestyle) अंगिकारली पाहिजे हे प्रत्येक मुला-मुलीने जाणून घेणे आवश्यक आहे.

गेल्या १०० वर्षांत वैद्यकीय क्षेत्रांतील अनेक शोधांमुळे मानवाचे सरासरी आयुष्यमान दुप्पटीने वाढले आहे. लसीकरण आणि अँटिबायॉटिक्ससारख्या प्रभावी औषधांनी कॉलरा, टायफॉइड, देवी, प्लेग अशा रोगांवर बराच विजय मिळवला आहे. शालेय वयात होणाऱ्या घटसर्प, डांग्या खोकला, पोलिओ अशा गंभीर आजारांचे प्रमाण नगण्य झाले आहे. परंतु आयुष्यमान वाढूनही स्वास्थ्य व तंदुरुस्तीचा लाभ आपण घेऊ शकलेलो नाही. प्रचंड प्रमाणात होणारी वृक्षतोड, वातानुकूलित इमारती, पेट्रोल-डिझेलचा अवास्तव वापर, प्लास्टिकचा अनाठायी उपयोग, कीटकनाशके व रासायनिक खते यांचा शेतीसाठी बेसुमार वापर इ. कारणांमुळे प्रदूषणात प्रचंड वाढ झाली आहे. त्याचीही कारणे आपणच ओढवून घेतली आहेत.

शरीर तंदुरुस्त राहण्यासाठी शरीरातील प्रत्येक स्नायू व सांधे यांची हालचाल होणे आवश्यक असते. जसं खूप दिवस दाराची उघड झाप झाली नाही तर त्याच्या लोखंडी बिजागऱ्या गंजून जातात. यांत्रिकीकरण, संगणकीकरण, स्वयंचलित वाहने यामुळे अनेक कामे कमीतकमी श्रमात व जलदगतीने होऊ लागल्यामुळे शरीरातील स्नायू व सांध्यांना फारसे कामच करावे लागत नाही. त्यामुळे संधीवातासारखे म्हातारपणी होणारे रोग आता अगदी तरुण वयातच होऊ लागले आहेत.

मोबाईलच्या अवास्तव वापरामुळे माणसांची 'मोबिलिटी' म्हणजे हालचालक्षमता खूप कमी झाली आहे. शेजारच्या खोलीत बसलेल्या मुलीशी आई मोबाईलवरून बोलते. एक मजला चढण्यासाठी 'लिफ्ट' वापरली जाते. अशा गोष्टींमुळे देवाने वापरण्यासाठी दिलेल्या हात-पाय या इंद्रियांना कामच राहिलेले नाही. त्याचे दुष्परिणाम आता भोगावे लागत आहेत.

जी शरीराची तीच मनाच्या आरोग्याचीही गोष्ट आहे. शाळेच्या प्रवेशापासून ते आवडीच्या क्षेत्रात शिक्षणाची संधी मिळविण्यापर्यंत स्पर्धेला तोंड हे द्यावेच लागते. ही स्पर्धा जीवघेणी असते. त्यामुळे शाळेच्या वेळेतील शिक्षण अपुरे वाटल्यामुळे निरनिराळे क्लासेस मुलांना लावावेसे वाटतात. अशा गच्च वेळापत्रकामुळे खेळण्यासाठी वेळच राहत नाही. घरात आई-वडील-भाऊ-बहिणी-आजी-आजोबा यांच्याशी बोलायला फुरसत मिळत नाही. त्यामुळे कोणतीही

चाफ्याच्या झाडावर काल नुसती पानंच होती। सकाळी पाहतो तर फांदी फुलांनी लगडली होती।।

भारतरत्न पुरस्कार - श्री. मोरारजी देसाई, सामाजिक/राजकीय क्षेत्रातील कामगिरीबद्दल, पंतप्रधान, **१९९१**

सहभागी व्हा, अनुभव घ्या - सुट्टीमधील जोडीकार्ये - द्वारा छात्र प्रबोधन ☎ २४२०७१७४

अडचण एकमेकांजवळ बोलली जात नाही. त्यावर उपाय सापडत नाही. मग मनावर खूप ताण येतो. हा ताण असह्य झाला म्हणजे नैराश्य येते. मानसिक स्वास्थ्य संपते.

वरील कारणांमुळे जीवनमानात सुधारणा झाली, आयुर्मान वाढले, तरी आरोग्य व माणसाच्या स्वास्थ्यात उलट घसरण झाली आहे. आधुनिक सुविधांचा मर्यादित वापर केला, तर आपले आरोग्य आपण नक्कीच सुधारू शकतो. त्यासाठी विचारपूर्वक नियोजनाची गरज आहे.

दिनचर्या :

'लवकर निजे लवकर उठे, त्याला सुखसमृद्धी लाभे', अशी उक्ती यशस्वी व सुखी जीवनाची युक्ती आहे. दिवसभर कामात व्यग्र असल्यामुळे शहरातील मुलांना रात्री तासन्‌तास टी. व्ही. पाहण्याशिवाय चैन पडत नाही. शिवाय इंटरनेटवर चॅटिंग, व्हिडिओ गेम अशा करमणुकीची साधने उपलब्ध झाल्याने झोपावयास रात्रीचे बारा वाजून जातात. त्यामुळे आरोग्याचे 'तीन तेरा' होतात. शिवाय रात्री बाहेर जाऊन चमचमीत पावभाजी, पिझ्झा असे 'फास्ट फूड' खाण्याने आरोग्यही 'फास्ट' बिघडते. यासाठी रात्री अकराचे पुढे न जागता पहाटे पाच वाजता उठल्यास दिवसाची सुरुवात छान होते. पहाटे मेंदू तरतरीत असतो. त्यावेळी मुलांनी पाठांतर करावे. त्यानंतर १२ सूर्यनमस्कार घालण्याचा परिपाठ ठेवला तर सर्व शरीराला चांगला व्यायाम होतो. त्यानंतर पोषक न्याहरी हवी. त्यामध्ये दुधाचा समावेश असावा. क्लास, शाळा झाल्यावर संध्याकाळी मोकळ्या हवेत एक तास मैदानी खेळ खेळून (वेळेवर घरी जाऊन) रात्रीचे जेवण करावे. निदान रात्रीचे जेवण घरच्या सर्वांनी एकत्र घ्यावे. त्यामुळे घरच्यांशी संवाद साधता येतो. एकमेकांच्या अडीअडचणी कळतात. रात्री थोडा अभ्यास करून वेळेवर झोपी जावे. अशी आदर्श दिनचर्या आरोग्याचा पाया आहे. हा पाया पक्का असेल तर लहान-सहान आजार टाळता येतात. रात्री झोपण्यापूर्वी दैनंदिनी लिहिणे, उद्याच्या कामांची क्रमवार प्राधान्यानुसार यादी करणे असा परिपाठ ठेवल्यास कामात सुसूत्रता येते. आठवड्यातून एक-दोन वेळा रोजची चाकोरी सोडून टी. व्ही. वरचे काही कार्यक्रम, थोडे चमचमीत पदार्थ खाल्ले, तर हरकत नाही. परंतु तो नित्यक्रम नसावा.

आहार :

मुलांनी पोषक व समतोल आहार घेतल्यास त्यांची शारीरिक वाढ चांगली होते. परंतु जरुरीपेक्षा जादा उष्मांकांचा (कॅलरीज) आहार व शारीरिक श्रमांचा अभाव यामुळे हल्ली शाळेतील मुलांमधे 'स्थूलपणा' ही एक नवीन समस्या निर्माण झाली आहे. स्थूलपणामुळे अनेक रोगांना निमंत्रण मिळते. या उलट वयात येणारी मुले-मुली चित्रपटातील नायक-नायिकांसारखे दिसण्याचा आटापिटा करतात. मुली 'झिरो फिगर' करण्यासाठी 'डाएटवर' राहतात. मुले पिळदार दंड व भरदार छातीसाठी जिममध्ये जाऊन चुकीचा व्यायाम करतात. कोणताच अतिरेक न करता रोजचे महाराष्ट्रीयन जेवण घेतले, तर ते आपोआप 'बॅलन्स डाएट' होते. परंतु ठरावीकच भाज्या, कृत्रिम शीतपेये (कोकाकोला, पेप्सी इ.), खारवलेले पदार्थ, बेकरी प्रॉडक्टस्, आईस्क्रीम यांची घरोघरी रेलचेल दिसते. परंतु असा आहार रोगाला आमंत्रण देतो. त्याऐवजी धान्ये (भात, गहू, ज्वारी इ.), कडधान्ये, डाळी, फळभाज्या, पालेभाज्या, कंदभाज्या, मोड आलेली धान्ये, ऋतूमानानुसार फळे, दूध, अंडी असा समतोल आहार रोगांना जवळ येऊ देत नाही.

जंगलाची वाट, फुलं-वेलींची कमान। काय थाटमाट, आला वसंत भरात।।

ज्या प्रकारच्या आहाराचे आपण सेवन करतो. तशी माणसाची वृत्ती असते, असे भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितले आहे. आपली खाद्यसंस्कृती खूप समृद्ध आहे. पंजाबी, दाक्षिणात्य, कोकणी, मालवणी, राजस्थानी, गुजराथी अशा विविध पद्धतीचे रूचकर पदार्थ सहज उपलब्ध आहेत. परंतु हे पदार्थ थोडा 'बदल' म्हणून चांगले आहेत. रोज खाणे धोकादायक आहे. 'सात्विक आहार हा आदर्श आहार आहे,' असे विनोबा भावेंनी सोप्या शब्दात सांगितले आहे.

'व्हिटॅमिन डी' हे सूर्यप्रकाशातून भरपूर मिळते. परंतु हल्ली मुलांच्या अंगावर ऊन कधी पडतच नाही. त्यामुळे त्याच्या कॅपस्यूल त्यांना खाव्या लागतात. त्या खूप महाग असतात. सूर्यप्रकाश हा फुकट मिळतो.

व्यायाम

मुलांनी स्वैरपणे खेळले, तर निराळ्या व्यायामाची गरज नसते. कुमार मुला-मुलींनी मैदानातील खेळ खेळल्यास आपोआप व्यायाम होतो. तरुण मुला-मुलींनी जिममध्ये किंवा विविध आयुधे वापरून पद्धतशीर व्यायाम केल्यास अधिक चांगले. सूर्यनमस्कार हा अतिशय सोपा, बिनधोक व सर्वांगसुंदर व्यायाम आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने निदान १२ सूर्यनमस्कार नियमितपणे घातल्यास व्यायामाचे बरेचसे फायदे साध्य होतात. सुट्टीच्या दिवशी टी. व्ही. समोर बसून वेळ घालविण्यापेक्षा डोंगरावर फिरण्याचा व्यायाम घेतल्यास शरीर व मन दोन्ही ताजेतवाने राहते. ट्रेकिंग हा एक आरोग्यवर्धक छंद आहे.

मनाची मशागत

मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धीचे कारण ।।

असे संत ठामपणे सांगतात. प्रसन्न मन ठेवण्यासाठी ताणतणावापासून दूर राहण्याची कला प्रत्येकाने जोपासली पाहिजे. मनाविरुद्ध होणाऱ्या गोष्टींना सामोरे जाण्यासाठी मनाची मशागत करावी लागते. आदर्श देवदेवता, राष्ट्रपुरुष यांचे आचार-विचार मनाला उभारी देतात. रोज केलेली उपास्य देवतेची प्रार्थना मन प्रसन्न ठेवण्यास मदत करते.

शरीर व मन दोन्ही जेव्हा सक्षम असतात तेव्हा उत्तम आरोग्याचा लाभ होतो. पैशाने आरोग्य किंवा स्वास्थ्य विकत मिळत नाही. उत्तम आरोग्य हीच शाश्वत संपत्ती आहे. म्हणूनच 'आरोग्यम् धनसंपदा' ही ओळ रोज मनात घोळवत ठेवावी.

●●●

- डॉ. रमेश गोडबोले
'रवि' इमारत, अलका चित्रपटगृहाशेजारी,
सदाशिव पेठ, पुणे ३०

छात्र प्रबोधन - जोडीकार्य उपक्रमात सहभागी व्हा !

तुमच्याच गावात विविध प्रकारचे अनुभव तुमच्या गतीनुसार, वेळेनुसार, घेण्याची विशेष संधी!

(इयत्ता ८ वी ते १२ वीच्या मुला-मुलींसाठी)

साहस, संवाद व बुद्धिच्या विविध पैलूंना खाद्य देणाऱ्या ७ अनुभवांची साखळी तुम्ही पूर्ण करायची आहे. यात भाग घेणाऱ्या प्रत्येकाने 'छात्र प्रबोधन'चे सभासद असणे आवश्यक आहे. या उपक्रमासाठी तुमच्या वयाची किंवा थोडी छोटी-मोठी जोडी ठरवा. ती जोडी मुलामुलांची अन् मुलीमुलींची अशी असावी. जोडी ठरली की खालील क्रमांकावर दूरभाष करा. प्रत्येकवेळी तुम्हाला एक काम सांगितले जाईल. ते पूर्ण झाल्याचे दूरभाष करून सांगितले की पुढचे काम मिळेल. अशी एप्रिल-मे मिळून ७ कामे पूर्ण केली की मे अखेरीला/जूनमध्ये ३ दिवसांची साहस सहल असेल. त्याबाबतचे तपशील पुढील अंकात कळतील. **तेव्हा होताय ना सहभागी?**

मागील वर्षी सुमारे २५ वेगवेगळ्या गावातील मुलामुलींनी या उपक्रमाचा लाभ घेतला व दिलेली कामे यशस्वीरित्या पूर्ण करून सुट्टी खरोखरच अर्थपूर्ण केली. अनुभवसंपन्नतेबरोबरच साहस सहलीचाही आनंद लुटला.

संपर्क - शुभांगी सोलापूरकर, सुलभा कुलकर्णी - ०२०- २४२०७१७४/१७९, सकाळी १२.०० ते ४.००

कुठून कुठून येतात पक्षी, नाचऱ्या पायात घेऊन नक्षी। फडफडती पंख इवलाले, सुखावते सारी सृष्टी।।

भारतरत्न पुरस्कार - श्री. जे. आर. डी. टाटा, उद्योगपती, **१९९२**

पाचवी ते नववीसाठी मानसपट मापन - द्वारा ज्ञान प्रबोधिनी, प्रज्ञा मानस संशोधिका ☎ २४२०७१४५

रे हिंदबांधवा थांब या स्थळी...

– राम जोशी

‘वीस वर्षे सलगपणे युद्धनेतृत्व करणारा, त्या कालावधीत ३२ लढाया करणारा; पण एकही पराभव न पत्करणारा ‘बाजीराव’ हा अफाट योग्यतेचा जगातील एकमेव सेनापती आहे’, हे गौरवोद्‌गार आहेत दोस्त राष्ट्रांचा आघाडीचा सेनापती मोंटगोमेरी याचे!! त्याने ‘वॉरफेयर्स’ या युद्धशास्त्रावर लिहिलेल्या आपल्या ग्रंथात असं लिहून ठेवलं आहे. वैशिष्ट्यपूर्ण अशा या लढायांमध्ये निजाम–बाजीरावाच्या पालखेड येथील लढाईचा उल्लेखही आहे. आजही या लढाईचा अभ्यास युद्धशास्त्राचे विद्यार्थी करतात. पहिल्या बाजीरावाने शिवछत्रपतींचे हिंदवी राज्य त्यांच्या पश्चात विस्तारत नेऊन उत्तरेत वाढवले आणि प्रस्थापित केले.

अश्वारोहणात बाजीराव अव्वल होता. त्याचे घोडदळ अत्यंत वेगाने हालचाली करण्यात तरबेज होते. असे म्हणतात, की मोठमोठे पल्ले मारताना त्याचे घोडेस्वार घोड्यावरच चणे खाऊन पोट भरत असत. एकदा बाजीरावानं २०० कि.मी. अंतर केवळ २ दिवसांत ५०,००० घोडदळासहीत कापले आणि दिल्लीत येऊन थडकला. आधीच त्याचे नुसते नाव ऐकून हादरणारी दिल्ली त्याच्या दर्शनाने पार गर्भगळीत होऊन गेली होती.

पुरंदरे–रेठेकर, गोविंदपंत खेर (बुंदेले), बालाजी कोठेकर, राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर हे नव्या दमाचे कर्तृत्ववान नेतृत्व बाजीरावानेच पुढे आणले. बाजीराव झाला नसता, तर निजाम दक्षिणाधिपती झाला असता. नर्मदेपलीकडे इंदोर, ग्वाल्हेर, झाशी, उज्जैन, सागर या प्रदेशात मराठी संस्थाने निर्माण झालीच नसती आणि दिल्लीपर्यंत मराठ्यांचा दरारा पोहोचला नसता. १७६१ मध्ये यमुनेच्याही उत्तरेला जाऊन मराठ्यांनी अब्दालीबरोबर पानिपतावर जो लढा दिला, तो याच दराऱ्याच्या बळावर! शिवाजी महाराजांच्या पाठोपाठ अनेक अद्भुत कृत्यं बाजीरावाने करून दाखवली आहेत.

१७३९ मध्ये इराणचा बादशहा नादीरशहा दिल्लीवर

रावेरखेडी येथील बाजीरावाची समाधी

एखाद्या प्रेक्षणीय ऐतिहासिक स्थळाला भेट देताना त्यामागील इतिहास आपल्या डोळ्यांसमोर जिवंत होत असतो. आपल्या पराक्रमाने पेशवाईच्या इतिहासाचे तेजस्वी पान लिहिणारे पहिले बाजीराव पेशवे यांच्या समाधीस्थळाला भेट देण्याचा असाच प्रेरणादायी अनुभव या लेखात वाचायला मिळेल !

चालून आला. अर्थात त्याला घरभेदी फितुरांचे निमंत्रण होतेच. त्याने दिल्ली लुटून प्रजेवर प्रचंड अत्याचार केले. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी उत्तरेकडे निघालेला बाजीराव रावेरखेडी येथे एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात पोहोचला. या काळात त्या भागात उन्हाळा खूप असतो; त्याचाच त्रास बाजीरावाला झाला. त्याला विषमज्वर (टायफॉईड) झाला. या आजारामुळे दि. २८ एप्रिल १७४०, वैशाख शुद्ध १३, शके १६६२ या दिवशी पहाटे बाजीरावाने वयाच्या चाळीसाव्या वर्षी डोळे मिटले. एका अजोड योद्ध्याची कारकीर्द उमलता उमलताच संपुष्टात आली. बाजीरावाच्या निधनानंतर त्यांचा परम मित्र राणोजी शिंदे याने रावेरखेडी येथे बाजीरावाची समाधी बांधवून घेतली.

अशा या बाजीरावाच्या समाधी स्थळाचे दर्शन घेण्याकरता आम्ही नर्मदातटी रावेरखेडी या एका अत्यंत छोट्या गावात दाखल झालो होतो. उत्तर हिंदुस्थानात जायचे तर नर्मदेला उतार शोधणे आवश्यक आहे. त्याशिवाय नर्मदेच्या उत्तरेला प्रवेश नाही. असा उतार रावेरखेडी येथे आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत छाती इतक्या पाण्यातून नदी ओलांडावी लागते. रावेरखेडीमध्येच बाजीरावाने एक वाडा बांधला होता. त्या वाड्याचे

गुढी पाडवा दिवस सणाचा, आनंदाचा, उत्साहाचा। नव वर्षाचा, नव आशांचा, नव्या नव्या शुभ संकल्पांचा।।

भारतरत्न पुरस्कार - सत्यजीत रे, सिनेक्षेत्रातील कार्याबद्दल, **१९९२**

NTS मार्गदर्शन, विविध कौशल्यांचे प्रशिक्षण - द्वारा ज्ञान प्रबोधिनी-बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र ☎ २४२०७१९४

प्रवेशद्वार आजही उभे आहे. जवळच्याच टेकडीवर बांधलेलं एक रामेश्वराचं मंदिरही तिथं उभं आहे.

'प्रतापी बाजीराव' असं ज्याला म्हटलं गेलं, त्या 'पहिल्या बाजीरावा'च्या स्मारकासमोर आम्ही नतमस्तक होऊन उभे होतो व स्मरण करत होतो त्या अजोड योद्ध्याचं!

आज उभ्या असलेल्या त्या समाधीचा पाया चौकोनी आहे. त्यावर अष्टकोनी आकाराची साधारण १० फूट उंचीची घुमटी आहे. कोणत्याही योद्ध्याच्या समाधीस्थळी जसे शिवलिंग असते, तसे एक शिवलिंग आतमध्ये स्थापन केले आहे. त्या शिवलिंगावर आम्ही सर्वांनीच पुष्पांजली वाहिली आणि त्या अद्वितीय पराक्रमी पुरुषाच्या स्मृतीला मनोमन नमस्कार केला.

समाधीभोवती बांधलेल्या धर्मशाळेत शिरण्यासाठी पूर्वाभिमुख दरवाजा आहे. या दरवाज्याजवळ बाहेरील बाजूस एक प्रचंड विस्तारलेला पिंपळवृक्ष सळसळत उभा आहे. त्याची सळसळ लक्ष वेधून घेत होती. त्याचा विस्तार पाहून असे वाटत होते, की तो कदाचित बाजीरावाच्या मृत्यूचा साक्षीदार असावा. म्हणूनच आपल्या सळसळीतून तो आम्हाला सांगत असावा, 'हो, हीच ती पवित्र भूमी आहे, जिथे सबंध उत्तर हिंदुस्थानात ज्याच्या नावाचा दबदबा होता, तो बाजीराव चिरनिद्रा घेतो आहे.' त्या घटनेला मी आणि ही नर्मदामाता साक्षी आहोत.' पुढे तो म्हणत असावा, 'तुमच्या महाराष्ट्रात जरी बाजीराव जन्मला असला, तरी तो नर्मदापुत्रच आहे.' आणि खरोखरच बाजीरावाला नर्मदापुत्र म्हणायला काही प्रत्यवाय नसावा.

बाजीरावाने वयाच्या केवळ एकोणिसाव्या वर्षी पेशवाईची वस्त्रे अंगावर चढवली आणि पुढली २० वर्षे सततच्या लढाया करण्यात गेली; ती बऱ्याच मोठ्या प्रमाणात उत्तर हिंदुस्थानातच !

अशा वीरपुरुषाचं स्मारक मात्र आजही दुर्लक्षित आहे. रावेरखेडीपासून पश्चिमेला १२-१३ कि.मी. अंतरावर असेलल्या मंडलेश्वर येथे नर्मदेचे पाणी अडवून त्यावर एक वीज प्रकल्प उभा राहात आहे. या धरणामुळे जो जलाशय तयार होईल, त्यामध्ये हे स्मारक बुडण्याचा धोका निर्माण झाला आहे. हा वीज प्रकल्प जेव्हा जाहीर झाला, त्यानंतर काही इतिहास प्रेमींच्या ही गोष्ट लक्षात आली. त्यांनी स्मारक वाचवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आणि बाजीराव पेशव्यांची समाधी प्रकाशात आली.

या धडपडणाऱ्या मंडळींनी पुरातत्त्व खात्याबरोबर पत्रव्यवहार करून धर्मशाळेभोवतालची जागा संरक्षित करून घेतली. जागा तर संरक्षित झाली; पण मुख्य प्रश्न होता स्मारक वाचवण्याचा. त्यासाठी सरकारी स्तरावर आवश्यक ते प्रयत्न यशस्वी होऊन आता नर्मदेच्या पात्राच्या बाजूला समाधी स्थळापेक्षा जास्त उंचीची भिंत बांधून स्मारकाला संरक्षित करण्याचे निश्चित झाले आहे. अजूनही याठिकाणी पोहोचायला चांगला रस्ता नाही.

आता गरज आहे ती अनेक इतिहास प्रेमींनी त्या स्मारकाला भेट देण्याची. त्या ठिकाणाला एक ऐतिहासिक महत्त्वाचे पर्यटन स्थळ म्हणून टिकवून ठेवण्याची. गेली चार-पाच वर्षे **२८ एप्रिल या बाजीरावांच्या स्मृतिदिनी** तिथे कार्यक्रम केला जातो. महाराष्ट्रातून अनेक इतिहास प्रेमी त्या करता जात असतात. त्या रस्त्याची वर्दळ वाढली तर रस्ता नीट होण्याची शक्यता वाढेल. मध्यप्रदेशच्या सहलीत या स्मारकाला प्रत्येक मराठी माणसाने एकदातरी भेट द्यायलाच हवी.

●●●

- श्री. राम जोशी

१ कृष्णविहार, समर्थनगर, पिंपळभाट, अलिबाग

रावेरखेडी हे गाव मध्यप्रदेशातील पश्चिम निमाड या जिल्ह्यात नर्मदाकिनारी वसले आहे. महाराष्ट्रातून राष्ट्रीय महामार्ग तीनने निघाल्यावर मध्यप्रदेशातील सैंधवा, शेगाव, ठिकरी अशी मोठी गावे मागे पडतात आणि आपण नर्मदेच्या दक्षिण तीरावर खालघाट या गावी पोचतो. येथूनच पूर्वेला सनावदच्या दिशेने निघायचे. (सनावद हे रेल्वे स्थानकही आहे.) या मार्गावर निघाल्यावर कसराबाद, पिपलगाव, खानपुरा ही गावे मागे टाकून आपण बेडीया या गावी पोहोचतो. रावेरखेडीला जाण्याकरता या गावातून उत्तरेकडे प्रवास करावा लागतो. हा पुढचा रस्ता कच्चा आणि अरुंद असल्यानं बससारखी मोठी वाहने नेणे अवघड होते. त्यामुळे बेडीया ते रावेरखेडी हा १२ कि.मी.चा प्रवास जीपमधून करावा लागतो.

नवपर्ण फुलांनी उभवून रम्य पताका। येतसे पाडवा हासत नाचत नवखा।।

भारतरत्न पुरस्कार - डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, शास्त्रज्ञ, राष्ट्रपती, **१९९७**

सातवी ते नववीच्या मुलामुलींसाठी-सामूहिक विद्याव्रत संस्कार -द्वारा ज्ञान प्रबोधिनी-संवादिनी ☎ २४२०७२२२

कल्पकता आपल्या ‘आसपास’ची

कल्पकतेला वाव

लेखांक - १

डॉ. नलिनी गुजराथी

‘नवीन सुचलं पाहिजे, कल्पकतेशिवाय पर्याय नाही.’ हे प्रत्येकालाच जाणवतं. पण ‘कल्पक माणूस जन्मावाच लागतो.’, ‘ज्याअर्थी आपल्याला नवीन सुचत नाही त्याअर्थी आपण कल्पक होऊ शकणार नाही.’ असे मोठ्ठे गैरसमज अनेकांच्या मनात दडलेले असतात. ते दूर करण्यासाठी, आपल्या प्रयत्नांना योग्य तंत्रांची जोड देण्यासाठी आणि तुम्हालाही सुचू शकेल असा विश्वास देण्यासाठी या अंकापासून ‘कल्पकतेला वाव’ ही लेखमाला सुरू करत आहोत.

तुमच्या कल्पकतेला धुमारे फुटण्यासाठी तुम्ही लेख वाचून त्यातल्या कृतिपाठांवर आवर्जून काम करा.

दि. १४ मार्चच्या सकाळमधील एका बातमीनं माझं लक्ष वेधून घेतलं. ती बातमी अशी होती की पुण्याच्या वाहतूक समस्येवर पोलिसांनी विद्यार्थ्यांकडून उपाय (सोल्यूशन्स) मागविले होते. उपाय दाखविणाऱ्या प्रकल्पाचं प्रदर्शन पोलीस ग्राऊंडवर भरलं होतं. ते पाहायला उत्सुकतेनं लोकांनी गर्दी केली होती. मुलांनी गर्दीचा एकेक रस्ता निवडून तेथील वाहनांची संख्या, त्यांचा वेग, गर्दीचं प्रमाण इ. अनेक मुद्द्यांचा अभ्यास करून उपाय सुचवले होते.

मुलांनी किती बारकाईनं आणि वेगळा विचार केला होता, याचं एक उदाहरण देते. रस्ता ओलांडायला तरुणांना जर दहा सेकंद लागत असतील, तर ज्येष्ठांना जवळपास दुप्पट वेळ म्हणजे २० सेकंद लागतात. त्यामुळे रस्ता ओलांडण्यासाठी सिग्नल मिळाल्यावर वाहनांच्या गर्दीत कसेबसे जीव सांभाळून उभं राहण्याच्या कसरतीत अपघात होण्याची शक्यता वाढते. तेव्हा रस्त्याच्या मध्यभागीदेखील उभं राहण्यासाठी झेब्रा क्रॉसिंगवर सुरक्षित जागा हवी किंवा सिग्नलचा तरी वेळ वाढवायला हवा.

हे पाहून लक्षात आलं, की मुलंही बारकाईनं, ज्येष्ठांचा विचार करून सामाजिक जाणीवेतून उपाय सुचविताहेत. पोलिसांनी अशा तऱ्हेनं उपाय मागविले, यात त्यांचीही कल्पकता दिसून येते. आणि या प्रदर्शनाद्वारा विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला भरपूर वाव मिळाला हेही लक्षात येतं.

वाव म्हणजे संधी ! कल्पकता म्हणजे नवीन, वेगळ्या अशा अनेक पर्यायांचा समस्यांची उत्तरे शोधताना केलेला विचार होय ! असा कल्पकतेला वाव देण्याच्या अनेक घटना भोवताली घडताना दिसत असतात.

नुकतंच पुण्यात ‘डिपेक्स’ नावाचं प्रदर्शन अभाविप आणि सृजन या संस्थांनी इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी भरवलं होतं. त्यात पर्यावरण, सौर ऊर्जा, बायोगॅस अशा विविध विषयांवर महाविद्यालयीन मुलांनी प्रकल्प सादर केले होते. त्यात शालेय विद्यार्थ्यांचे राज्य/राष्ट्रीय पातळीवर निवडले गेलेले २५-३० प्रकल्पदेखील मांडण्यात आले होते. इथंही मुलांमधील कल्पकतेला, सृजनशीलतेला भरपूर वाव मिळाला होता.

आपले माजी राष्ट्रपती मा. डॉ. अब्दुल कलाम हे तर अत्यंत अभिजात कल्पनाशक्ती असलेले शास्त्रज्ञ आहेत. त्यांना तरुणाईत खूपच रस आहे. भारताला महासत्ता बनवायचे असेल, तर याच तरुणाईला साद घातली पाहिजे, हे ओळखून ‘इग्नाइट’ या संस्थेद्वारा ‘इनोव्हेशन’ नावाचा एक अभिनव उपक्रम राबविला जात आहे. भारतभरातील विद्यार्थ्यांकडून त्यांना सुचणाऱ्या नावीन्यपूर्ण कल्पना योजनाबद्ध रीतीने प्राध्यापक, अधिकारी गोळा करतात. या कामासाठी प्रचंड यंत्रणा राबविली जाते. या कल्पनांमधून उत्कृष्ट सर्जनशील कल्पना सुचविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी डॉ. अब्दुल कलाम यांच्या वाढदिवशी पुरस्कार दिला जातो. या कल्पना सुचविणाऱ्यांमध्ये ७-८ वर्षाची, शाळेत न जाणारी, पंपावर काम करणारी, ग्रामीण भागातली मुलंसुद्धा मोठ्या संख्येनं आढळली आहेत. म्हणजेच

नावीन्यपूर्ण कल्पना सुचणे, ही फक्त शहरी भागातील, हुशार, इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या मुलांची मक्तेदारी नव्हे, हे या घटनेनं अधोरेखित झालंय! किंबहुना संपूर्ण भारतातल्या तळागाळातल्या विद्यार्थ्यांपर्यंत सृजनशीलतेचा हा विचार पोहोचला, तरच देशाच्या प्रगतीला वेग येणार आहे. या उपक्रमातील एक ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. अनिल गुप्ता यांचं भाषण ज्ञान प्रबोधिनीने सुवर्ण महोत्सवानिमित्त भरविलेल्या 'प्रज्ञावंतता' या मानसशास्त्राच्या परिषदेत मला ऐकायला मिळालं. मुलांनी सुचविलेल्या कल्पनांविषयीचे त्यांचे अनुभव थक्क करणारे होते. त्यातली काही उदाहरणे वानगीदाखल देते.

एका दुसरीतल्या मुलीनं सुचविलं होतं – रात्री वाचताना सोयीचं जावं म्हणून चष्म्यात दिवा पाहिजे. एका पायाने अपंग असलेल्या भावाची कुबडी घेऊन चालताना होणारी कुचंबणा पाहून त्या विद्यार्थिनीला वाटलं, की कुबड्यांमध्ये 'शॉक ॲब्सॉर्ब'वर बसविले, तर चालताना धक्के कमी बसतील ! सर्जनशीलतेला संवेदनशीलतेची जोड असायला लागते, हे या उदाहरणातून नेमकं कळतं.

राजस्थान, बिहार यांसारख्या भागात सायकल रिक्षा चालविल्या जातात. प्रवाशांचे ओझे वाहून नेताना पॅडल मारमारून रिक्षेवाला घामाघूम होतो. ती व्यथा समजून घेऊन एका विद्यार्थ्यानं म्हटलंय, की सायकल रिक्षाला पाठीमागे आणखी एक-दोन ठिकाणी, पॅडल लावून प्रवाशांनीसुद्धा पॅडल मारले, तर रिक्षावाल्याचे श्रम हलके होतील ना?

अशाच आणखी काही कल्पना! वृद्धाश्रम आणि बालकाश्रम एकत्र चालविले, तर दोन्ही गटांचा प्रश्न सुटेल! सायकलच्या दोन्ही बाजूस झाडू बसविता आले, तर रस्त्यावरची धूळ, कचरा सायकल चालवता चालवता आपोआपच बाजूला करता येईल. खेड्यातली उनाड मुलं एका दगडात खांबावरचा दिवा तोडतात. अशा मुलांना नेमबाजीचं शिक्षण देऊन ऑलिंपिकसुद्धा गाजविता येईल. या सर्व कल्पना सर्वसामान्य मुलांनीच सुचविल्या आहेत. मुलांपुढे जर स्थानिक, राज्य/राष्ट्रीय स्तरावरील विविध क्षेत्रांतील समस्या सतत मांडत राहिलं, तर ती मुलं उत्तरं शोधायला प्रवृत्त होतील. मुलांच्या कल्पकतेला वाव देण्यासाठी प्रेरणेचा एक धक्का शिक्षकांनी मारण्याची गरज आहे. 'इग्नाईट' या संस्थेनं हे काम उत्तमरित्या सुरू केलं आहे!

एम. आय. टी. ही संस्थापण रोबोटिक्स या आधुनिक तंत्रज्ञानातील 'रोबोकॉन' ही स्पर्धा कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी योजत असते. ग्रामीण भागातील मुलंसुद्धा त्यात भाग घेऊन यश मिळवताना दिसतात.

'नासा'सारखी अंतराळ संशोधन करणारी संस्था जगातल्या सर्व मुलांसाठी प्रतिवर्षी प्रतिभेचा विस्फोट (ब्रेन स्टॉर्मिंग) करणारी निबंध स्पर्धा, प्रकल्प स्पर्धा आयोजित करते. अंतराळ यानात कोणते शास्त्रीय प्रयोग करता येतील, त्याच्या अनेक कल्पना 'नासा'ला लहान मुलांकडून मिळाल्या आहेत व त्या प्रत्यक्षात आणल्या गेल्या आहेत. 'इन्टेल'सारखी संस्थादेखील इंटरनेट – ई मेल माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी कल्पनाशक्तीला वाव देणाऱ्या स्पर्धा योजत असते. इंटरनेट, गुगल सर्च, विकिपिडिया इ. मुळे परस्परसंपर्क (कम्युनिकेशन) हा सुलभ आणि वेगवान झाला आहे. या सर्व माध्यमांचा उपयोग मुलांनी, शिक्षकांनी, पालकांनी करायला हवा, तर मुलांमधील सुप्त कल्पनाशक्तीला वाव मिळणार आहे!

कल्पनाशक्ती विकसित करण्याच्या मुळाशी दोन

चैत्रामधली चैत्र पालवी, आशेला नव अनुभव दावी। झाले गेले घडून जाई, नवीन वर्षी नव नवलाई।।

भारतरत्न पुरस्कार - श्रीमती अरुणा असफअली, स्वातंत्र्यसैनिक, **१९९७** (मरणोत्तर)

महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी नेतृत्व पायाभरणी वर्ग- द्वारा ज्ञान प्रबोधिनी -नेतृत्व संवर्धन केंद्र - २४२०७१७९

कृतिपाठ... १

तुमच्या कल्पना छात्र प्रबोधनकडे पाठवा. नावीन्यपूर्ण कल्पनांना अंकात प्रसिद्धी !

- टाकाऊ प्लॅस्टिकच्या बाटल्यांचा वापर करून सुशोभनाच्या कोणत्या वस्तू बनवता येतील?
- टाऊक प्लॅस्टिक परत वापरात आणण्याच्यादृष्टीने (Recycling) प्लॅस्टिकचा पुनर्वापर कसा-कसा करता येईल?
- कोणत्या विविध उपयांनी फुलं जास्तीत जास्त ताजी ठेवता येतील?
- वाळून गेलेल्या रंगीत फुलांचा उपयोग कोणत्या विविध कारणांसाठी करता येईल?

महत्त्वाच्या प्रक्रिया आहेत. एक आहे **निरीक्षणाची** आणि दुसरी आहे **जिज्ञासेची !** त्यासाठी भोवताली घडणाऱ्या घटनांचं सूक्ष्म निरीक्षण करायला हवं. त्या घटना तशा का घडताहेत असा प्रश्न विचारायला हवा. दैनंदिन जीवनातील अडचणी, उणीवा आपल्याला दिसत असतात पण आपण त्याकडे दुर्लक्ष करत असतो. समस्या लक्षात येण्यासाठी सूक्ष्म निरीक्षण, संवेदनशीलता, जिज्ञासा हवी. त्याचबरोबर समस्या सोडविण्यासाठी एक 'ऊर्मी'ही मनात उसळावी लागते. मनामध्ये उपाय शोधण्यासाठी प्रेरणा निर्माण व्हावी लागते. ही प्रेरणा परिस्थितीच्या रेट्यातून निर्माण होऊ शकते किंवा स्पर्धा, बक्षिसे इ.च्या आकर्षणानं जागृत होते. जसं सध्या दुष्काळ अगदी दाराशी येऊन ठेपला आहे तेव्हा पाणी वाचवण्याचे, पाणी साठवण्याचे विविध उपाय शोधणं सरकारपासून ते सामान्य माणसापर्यंत सर्वांना भाग पडले आहे. युद्धाच्या काळातही अशाच परिस्थितीच्या रेट्यानं शास्त्रज्ञांना शोध लावण्यासाठी प्रतिभेला जुंपावे लागते. अणुबाँबचा शोधही अशा युद्धजन्य परिस्थितीतच लागला आहे. (अर्थात तो मानवाच्या हिताचा नव्हता) तेव्हा अशी प्रेरणा, असा 'ड्राइव्ह' आपल्या मनात सतत जागृत ठेवून वातावरणातील संधींचा लाभ घ्या, तर तुमच्यातील कल्पनाशक्तीला जरूर वाव मिळेल आणि त्यातून अनेक प्रश्न सुटायला मदतही होईल !

●●●

- डॉ. नलिनी गुजराथी
१२७७, शुक्रवार पेठ, सुभाषनगर, गल्ली क्र. ५, पुणे २
nalini@prabodh.com
(लेखिकेने 'वैज्ञानिक कल्पकते'वर पीएच.डी चे संशोधन केले आहे.)

छात्र प्रबोधनच्या अधिकाधिक सभासदांनी खालील स्पर्धेत भाग घेऊन आपल्या कल्पनाशक्तीला वाव द्या !!.

'इग्नाईट २०१३' स्पर्धा

'नॅशनल इनोव्हशन फाऊंडेशन - इंडिया' या संस्थेतर्फे 'इग्नाईट २०१३'

'तंत्रज्ञानातील अभिनव कल्पना व नवनिर्मिती (Original techonological ideas and innovations)'

या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेचे इ. १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांनी **आपल्या अभिनव कल्पना**, आपले नाव, इयत्ता, शाळेचे नाव, पत्ता आणि दूरभाष क्रमांक या तपशिलांसह ई-मेल द्वारा अथवा पोस्टाने **३१ जुलै २०१३** पूर्वी खालील पत्त्यावर पाठवाव्यात. विजेत्यांना डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी (१५ ऑक्टोबर) पारितोषिके वितरित करण्यात येतील.

अधिक माहितीसाठी www.nif.org.in हे संकेतस्थळ पाहा.

संपर्कासाठी पत्ता - नॅशनल इनोव्हशन फाऊंडेशन - इंडिया, सॅटेलाइट कॉम्प्लेक्स, जोधपूर टेक्रा, प्रेमचंदनगर रस्ता, सॅटेलाइट, अहमदाबाद ३८००१५, गुजरात

मुक्तगाणं

निसर्ग महाली
तुझा चालतो
नित –
निराळा थाट

उभ्या पिकांवर
वृक्ष –लतांवर
राज्य...
तुझे चालते.

किलबील गाणी
तो... गुंजारव
आम्हा...
कुठे कळतो...?

अगम्य गायन
तुझे चालते
तू...
सृष्टीचा भाट

निसर्गाच्या
भाव मनीचे
मुखातूनी...
तुझ्या बोले

मनासारखा
अर्थ...
तयाचा
आम्हीच लावतो

झाडी झुडपे
निर्झर... नद्या
दऱ्या...
डोंगरी घाट

उगवती
मावळतीचे
संकेत–
तुलाच आकळती...

ऋतू ऋतूंचे
मुक्त सोहळे
तूच...
मुक्त भोगावे

मुक्त संचार
तुझा–चालतो
मुक्त...
तुझी वाट

लागता
चाहूल त्यांची
मार्ग–
तुझे बदलती

गीत...
खऱ्या मुक्तीचे
तुझ्या...
मुखाने गावे

– राजाराम बनसकर
'घरोटा' जैन गल्ली, मु. पो. ता. कळमनुरी,
जि. हिंगोली ४३१७०२

रंगीबेरंगी फुले बहरली, तरूतरू मोहरला। मंद-मंद मधुगंध दरवळे, दिशांत दाही भरला।।

भारतरत्न पुरस्कार - श्री. चिदंबरम सुब्रम्हण्यम, स्वातंत्र्यसेनानी, कृषीमंत्री, **१९९८**

अभ्यासगट, नागरी वस्ती व ग्रामीण प्रज्ञा कार्यक्रमात सहभाग - ज्ञान प्रबोधिनी- युवक विभाग- आशुतोष ९०४९०८०७८०

अविस्मरणीय लंडन !!

– चि. रुचिर कुलकर्णी

मित्रांनो, माझ्यासाठी मागील वर्षाची उन्हाळ्याची सुट्टी फारच खास होती. तुम्ही म्हणाल, 'या वर्षाच्या उन्हाळ्याच्या सुट्टीचे आता वेध लागलेत आणि तू अजूनही मागच्याच सुट्टीत अडकलास?' मित्रांनो, पण काही सुट्ट्या या फारच अविस्मरणीय असतात. वेळा काळाची गणिते तिथे फोल ठरतात. आम्ही गेल्या वर्षी एप्रिल महिना अखेर युरोप दौऱ्यावर गेलो होतो. तो माझा पहिला परदेश प्रवास होता. मनात खूपच कुतूहल आणि उत्सुकता होती. कसा असेल युरोप? कसा असेल तिथला निसर्ग, संस्कृती, माणसं? मग काय? तिथला भूगोल, इतिहास याची माहिती घेण्यासाठी 'इंटरनेट' होतेच साथीला! नेटवर रोज मी तापमानही आवर्जून बघायचो. घरचं वातावरण माझ्या कृत्यांमुळे युरोपमय झालं होतं!

इंग्लंड, हॉलंड, स्वित्झरलँड, जर्मनी, ऑस्ट्रीया, इटली, फ्रान्स असे देश युरोप दौऱ्यात पाहायला मिळणार होते. एकूण १९ दिवसांचा हा दौरा असणार होता. या १९ दिवसांत माझ्या मनावर गारूड केलं ते 'लंडन' या शहरानं! आमच्या प्रवासाची सुरुवात इंग्लंड या देशापासून झाली. आमचे मुंबई ते लंडन थेट विमान होते. मध्ये 'मस्कत' येथे चार तासांचा विराम होता. 'मस्कत'चा छोटेखानी विमानतळ संपूर्ण वातानुकुलित होता. विमानतळाच्या बाहेर पडल्यावर गरम वाऱ्यांच्या शेकानं आम्हाला चांगलंच हैराण केलं! कधी एकदा धावपट्टीवरून आत वातानुकूलित क्षेत्रात जातो असं होऊन गेलं...

अगदी या उलट लंडन! लंडनचं 'हिथ्रो' विमानतळ अतिभव्य होतं. आमच्याबरोबर एकाच वेळी चार विमानं धावपट्टीवर उतरताना दिसत होती. नुकताच हिवाळा संपला असला, तरी इथं विमानतळाबाहेर येताच अंगावर शहारा आणणारे थंड हवेचे 'झोत' आम्ही अनुभवले. विमानतळावरची एकूण सर्व यंत्रणा सुनियंत्रित व शिस्तीत चालू होती. आमची 'guided tour' असल्यामुळे आमच्याबरोबर आणखी पंधरा कुटुंबं होती. आम्हाला विमानतळावरून हॉटेलवर न्यायला लक्झरी बसची सोय केली होती. लंडनचं पहिलं दर्शन म्हणजे विमानतळ ते वेंब्ली भागातल्या हॉटेलपर्यंतचा रस्ता! अत्यंत आखीव-रेखीव, खड्डेविरहित रस्ते, वाहतुकीची शिस्त आणि रस्त्यावरून चालताना पादचाऱ्यांना दिला जाणारा मान या सर्व बाबी लंडनच्या बाबतीत माझ्या मनात पक्क्या ठसल्या. (पुढे युरोपभर काही प्रमाणात सगळीकडेच त्या जाणवल्या, अपवाद होता इटलीचा)

लंडनमधील पहिल्या दिवशी सुरुवातीला आम्ही 'बकिंगहॅम पॅलेस' म्हणजेच इंग्लंडच्या राणीचं निवासस्थान पाहिलं. तो अनेकानेक दालनं असलेला भव्य राजवाडा

थेम्स नदीवरील टॉवर ब्रिज

आज बहरून आला, नवा उत्सव पानात। ओझे फुलांचे सोसेना, गंध घुमे वारियात।।

भारतरत्न पुरस्कार - **लोकनायक जयप्रकाश नारायण**, स्वातंत्र्यसेनानी, **१९९९**, (मरणोत्तर)

संग्रही ठेवा - '**शब्दांची रत्ने**', छात्र प्रबोधन प्रकाशन, किं. ₹ ६०/-

म्युझियममधला सचिन तेंडुलकरचा बॅट धरून अभिवादन केलेला मेणाचापुतळा

बकिंगहॅम पॅलेस – इंग्लंडच्या राणीचे निवासस्थान

होता. त्याचवेळी 'चेंज ऑफ गार्ड्स'ची वेळ झाली होती. म्हणजे राजवाड्याभोवतीच्या एका राखणदलाची वेळ संपून ती जबाबदारी दुसरी राखणदलाची तुकडी स्वीकारते. राखणदलातले बॉबी (पोलिस) वाजत-गाजत, अतिशय शिस्तबद्ध कवायत करत हा सोहळा 'देखणा' करतात.

नंतर लंडनच्या प्रसिद्ध 'थेम्स' नदीवरच्या टॉवर ब्रीजवरून आम्ही 'लंडन टॉवर' अर्थात जिथे भारताचा कोहिनूर हिरा ठेवला आहे, ते म्युझियम पाहायला गेलो. राणीच्या मुकुटात विराजमान झालेला कोहिनूर हिरा बघून आमचे डोळे दिपून गेले. त्यावेळी एकेकाळच्या भारताच्या ऐश्वर्याची चुणूक बघायला मिळाली, तर दुसरीकडे 'गुलामगिरीत' पडलेला हिरा बघून मन खट्टू झालं. तिथं ठेवलेल्या अनेक मुकुटातले हिरे जरी झळकत होते, तरी आपल्या कोहिनूरची शान व झळाळी काही 'और'च होती.

अशाच एका आगळ्यावेगळ्या म्युझियमला दुसऱ्या दिवशी आम्ही भेट दिली; ते म्हणजे मॅडम तुसाँ वॅक्स म्युझियम! तिथे जगभरातल्या ज्येष्ठ, श्रेष्ठ, कर्तृत्ववान, अशा विविध क्षेत्रांतील व्यक्तींचे मेणानं बनवलेले हुबेहूब पुतळे वैशिष्ट्यपूर्ण रचनेत मांडले आहेत. तिथे गांधीजींचा, सचिन तेंडुलकरचा, भारतातील सिनेक्षेत्रांतील अभिनेते, अभिनेत्रींचे पुतळे बघून अभिमान वाटला. नंतर आकाश पाळण्यासारख्या भव्य चक्रातून – 'लंडन आय' मधून आम्हाला लंडनचं विहंगम दृश्य दिसलं. तिथेच शेजारच्या इमारतीत 'फोर-डी' मुव्ही बघायची सोयही होती. अर्ध्या तासाची 'मुव्ही' बघण्याचा धमाल अनुभव आम्ही तेव्हा घेतला. बिगबेन क्लॉक टॉवर, वेस्ट मिनिस्टर्स ॲबे-सरकारी कार्यालयं व तेथील सदस्यांची निवासस्थानं, पिकॅडेली सर्कस हे भाग पाहून मुंबईच्या फोर्ट भागाची आठवण आवर्जून झाली.

त्याच दरम्यान तिकडे ऑलिंपिकच्या स्वागताची तयारी जोरदार सुरू होती. सुशोभनासाठी झेंडे, पताका फडकत होते. स्टेडियमची डागडुजी वेग घेत होती. ऑलिंपिकच्या स्वागतासाठी तिथली लोकं उत्सुक होती. इतिहास आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याची, त्याचं संवर्धन करण्याची, त्याचा अभिमान बाळगण्याची प्रवृती सर्वच लंडनवासीयांमध्ये प्रकर्षाने दिसून आली. असं असलं, तरीही काहीशी अलिप्त, मुडी व आपल्याच कोषात रमणारी अशी तिथली माणसं होती. आपल्यासारखं भरभरून बोलणं, हसणं त्यांच्यामध्ये अपवादानंच आढळलं. माझं मन नकळत तुलना करत होतं.

आपण भारतीय परदेशी गेलो, की तिथली शिस्त, नियम यांचे काटेकोर पालन करतो. परंतु आपल्या देशात आल्यावर मात्र सर्व नियम धाब्यावर बसवतो. या आपल्या सवयीचा मला तेव्हा फार राग आला. प्रत्येकानं स्वयंशिस्त पाळली, आपल्या देशातील नियमांचा, शिस्तीचा शासनाचा आदर केला तरच 'बाहेरचे लोक' देश विघातक कृत्यं करायला धजावणार नाही, असंदेखील वाटलं. लंडन शहरातील आखीव-रेखीवपणा, तेथील स्वच्छता, निटनेटकेपणा, शिस्त पाहून मी मनोमन असे विचार करू लागलो...

●●●

– चि. रुचिर कुलकर्णी, (इ. ९ वी)
सी – २०४, पाटे संस्कृती,
सहकारनगर क्र. २, पुणे 411009

गंगू गायीची गोष्ट

– प्रतिमा इंगोले

ही गोष्ट आहे गंगू गायीची, तिच्यावर मायप्रमाणे जीव लावणाऱ्या एका सासुरवाशिणीची ! घरातल्या प्रत्येकाशी तिचं जिवाभावाचं नातं जुळतं. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात गुरावासरांचं असलेलं प्रेमाचं स्थान या कथेत अनुभवायला मिळेल. वऱ्हाडी भाषेचा गंध कथेला अकृत्रिम सौंदर्य प्राप्त करून देतो.

माझ्या मायला लग्नात आंदण म्हणून गाय भेटली. गाय कसली ती वासरीच होती. असेल दोन वर्षांची. अर्थात त्या काळच्या सासुरवासात माझी माय गायीलाच 'माय' मानायची. तिची काळजी घ्यायची. असह्य झालं, तर तिच्या जवळ सुखदु:ख सांगायची. तिचं असं वासरीशी चाललेलं गूज आजीला आवडायचं नाही. मग ती कातावायची. खरंतर लग्नाला दोन वर्ष झाली तरी मायला वासरीच तेवढी तिच्या मायेची आहे, असं वाटायचं. पुढं माझा जन्म झाल्यावर ओघानं माझाच लळा लागला. वासरीसाठी फारसा वेळ मिळेनासा झाला; पण तोपर्यंत वासरीच मायची जीव की प्राण होती.

एकदा वासरी तापानं खूप आजारी पडली. त्या काळात खेड्यातून ढोर डॉक्टर नसायचे. त्यामुळे आजारी पडल्यास ढोरावर घरगुती उपचार केले जायचे. मायचा जीव घाबरा झाला. तिला वासरीचं आजारपण पाहून अन्नही गोड लागेना. वासरीनंही मान टाकली होती. शेजारची गोपीकाकू मायची मैत्रीण होती. तिला मायनं बोलवून आणलं.

''गोपाबाई ! पाय बरं ! वासरीनं मानच टाकली बयना.''

''देवके, तू असं कर. वारीच्या मारोतीले भारोभार शेरणी कबूल कर !''

''मी पायली सूनवायरी ! कुठून आणू वं इतली शेरनी?''

''देव फकत भावाचा भुकेला रायते. गलीवरचा एक गोटा उचलून आणावं; तो ढोराच्या आंगावून

उतरावं, आन देवाले मनाभावानं हात जोडून म्हणावं, ‘देवा, माया ढोराले बरं लागू दे बापा; मी या गोट्याच्या भारोभार शेरनी वाटीन.’’

‘‘असं हाये?’’

‘‘आन शेरनी कोणती? तं खडीसाखर, साखर नायी तं आपला गूयच कबूल करावं आन तोच वाटावं. देवाले फकत भाव पायजे आणखीन कायी नायी.’’ गोपी काकू म्हणाली.

‘‘मी करतो मग तसं?’’

मायनं गलीतला लानसाक गोटा उचलून आनला आन त्यालेच वासरीच्या आंगावून उत्तरलं. गोट्याले न्हानलं, धुतलं, हयद, कुकू वायलं आन कबूल केलं.

‘‘ वारीच्या मारोती बापा, म्हाया वासरीले बरं लागू दे. मी तुया भारोभार गूय वाटीन.’’

बोलाफुलाला गाठ पडली. आणि खरंच मायला वासरीनं डोळे उघडल्याचं दिसलं. तसंच तिनं तिला पाणी पाजलं. तिच्या अंगावरून हात फिरवला. आपल्या वाट्याची भाकर तिला खावू घातली. वासरी हुशारी आल्यागत टुकटुक बघू लागली. थोड्या वेळात उठून उभी झाली. तिनं छान हंबर घातला. मायला शहारून आलं. ती आपल्या कामाला लागली.

पण माय गोट्याच भारोभार तरी गूळ कुठून आणीत. तिला तो नवस फेडताच येईना. वासरी सतत आजारी पडू लागली. मुळातच वासरी अशक्त होती. ती पुन्हा आजारी पडायची. मायला वाटायचे, आपल्याला नवस फेडता येत नाही. म्हणूनच ती आजारी पडते.

पुढे माझा जन्म झाला. तसा कोणी मला रुपया, दोन रुपये खाऊसाठी दिला, तर तो खड्डा करून मायनं पुरून ठेवला होताच. एकदा आजी लेकीच्या गावाला गेली होती, तेव्हा मायनं खड्डा उकरून काढला. गोपी काकूच्या मुलाला दुकानावर पाठविलं. त्याच्या हातून गोट्याच्या भारोभार गूळ बोलाविला. सगळ्या बालगोपालांना वाटला.

आजी गावावरून आल्यावर तिला त्याबद्दल कळलेच. तसे तिने परत ठसके फोडले. ‘‘इकडे चहात टाकायला गूय सापळत नायी अन् तिकळे ढोराईसाठी गूय वाटल्या जाते.’’

माय मुकाट ऐकत राहिली. वासरी पुढे गाभनही राहिली; पण तिलाही वासरीच झाली आणि त्या दगदगीचा त्रास सहन न झाल्यामुळं त्यातच ती दगावली. माझ्या पाठीवर मायला जुळ्या मुली झाल्या होत्या. बहिणींना आयतंच खेळणं मिळालं. कारण विनाआईच्या वासरीचा सांभाळ करणं तसं कठीणच; पण त्या दोनी मालू आणि शालू त्या वासरीचं अगदी हौसेनं आणि मायेनं करायच्या. तिला पाणी पाजायच्या, अर्थातच दूध सापडणं शक्यच नव्हते. त्यामुळे वेटाळातून ताक मागून आणायला माय सांगायची. त्या दोघीही दुडदुडत जायच्या हरकाने वासरीसाठी ताक घेऊन यायच्या. मग माय ते घमिल्यात घेऊन ताकात बोटं बुडवून वासरीला पाजायची. तरीही आजी ठसके फोडायची. ‘मरतुकडी गाय लेकीले दान केली’, असे म्हणायची. पण माय तिकडे लक्षच द्यायची नाही.

माय वासरीले मरू थोडीच देणार होती. तिला दात फुटले तशी ती आपली भूक ठेऊन वासरीला कोरभार भाकर चारू लागली. आम्हीही आमच्या ताटातला घास तिला चारत होतोच. माये बापू वावरातून येता येता वासरीसाठी

किलबिल किलबिल पक्षी गाती वसंत रागाला। नृत्यगायने आसमंत हा मंत्रमुग्ध झाला।।

भारतरत्न पुरस्कार - गोपीनाथ बोरदोलाई, स्वातंत्र्यसैनिक, मुख्यमंत्री-आसाम, **१९९९**, (मरणोत्तर)

संग्रही ठेवा - ‘**आपला पाऊस**’, छात्र प्रबोधन प्रकाशन, किं. ₹ ३०/-

गवताचं पेंडक आनत व्हते. कसंबसं बिनामायच्या वासरीचं पोट भरत होतं. आणि ती कशीबशी जगत होती. आम्ही तिघंही तिच्यावर जीव टाकत होतोच. तीसुद्धा आमच्यावर लोभ करायची. आमचे हात चाटायची. आम्हाला पाहून आनंदानं हंबरायची. मग आजीचं काहीच चालायचं नाही. ती सोडून सगळेच बिनामायच्या वासरीला जीव लावायचे.

वासरी घरातीलच एक झाली. आम्ही तिचं नाव 'गंगा' ठेवलं. गंगेसारख्या पांढऱ्याशुभ्र रंगाची वासरी आमच्या वेटाळाच्याच लाडाची झाली. कोणीही तिला नैवेद्य दावू लागलं. आयाबाया उरलं सुरलं तिला खाऊ घालू लागल्या. सगळ्यांच्या अन्नावर पोसणारी म्हणून की काय गंगा कधी आजारी पडत नव्हती. मायची इच्छा होती, म्हणून मी एकदा तिला हातात दोर धरून 'वारीलाही' घेऊन गेलो.

वारीला गेलो तर इतर ढोरं खालीच उभी राहिली; पण गंगा दुडूदुडू पायऱ्या चढून वर आली. थेट मारोतीच्या देवळात! मंडपातून तिनं मारोतीरायचं दर्शन घेतलं. सगळ्यांना तिचं खूपच कौतुक वाटलं.

वासरीसोबत आम्ही सर्वच मोठे होत होतो. विशेष म्हणजे वासरीला लवकरच गोऱ्हा झाला आणि घरादाराला दुभतं झालं.आजीला घरच्या दूधाबरोबर भाकरी खाता येऊ लागली. तशी तीही खूश झाली. अधेमधे स्वत: वासरीला भाकरी चारू लागली. तिचे दूध माय अडल्यानडल्याला द्यायची. ताक तर फुकटच वाटायची. म्हणायची, ''मायी गंगू लोकाईच्या ताकावर पोसली हाय. मी काहाले तिचं ताक इकून पैसा करू.''

कोणी आजारी असलं तर माय दही नेऊन द्यायची. आयाबाया सारवायला म्हणून गंगूचं शेण न्यायच्या. गंगूला उरलं सुरलं खाऊ घालायच्याच पण तिच्यासाठी मुद्‌दाम शेवटी चानकी टाकायच्या. गंगू अशी सर्वांची झाली होती. आजीलाही आता गंगूचा लळा वाटायचा. त्या शेण न्यायच्या.

गंगूला दुसराही गोऱ्हा झाला. घरच्या शेतीसाठी आता घरचीच बैलजोडी होणार होती. त्यामुळे बापूंना गंगाचा हरिक येत होता. कारण भाड्याच्या जोडीच्या साहाय्यानं शेती करणे खूपच महागात पडत होते; पण इलाज नव्हता. घरी फक्त तीन एकर शेती. त्यासाठी बैलजोडी विकत घेणंही परवडणार नव्हते.

आजी आजारी पडली तेव्हा गंगूच्या दूधावर तिचं आजारपण निभावलं. कारण ती फक्त दूध भाकरच चुरून खायची. परत घरात दुभतं झालं. यावेळी मात्र दुधाचे 'उकडे लावले.' कारण आमच्या तिघांचा वाढता खर्च शेतीच्या उत्पन्नात भागत नव्हता. त्यामुळं दूध, दही विकावंच लागत होतं. त्यातून भाजीपाला भागत होता. माय दुधाची काटकसर करून लोणी बनवत होती. गायीच्या तुपाला भावही मिळायचा. दूधापेक्षा तूप विकणे तिला आवडायचं. कधीमधी घरी रोडगे केले, तर त्यासोबत वरणावर तूप खायच्या कामी यायचे. पण रोज खाणंही परवडणारं नव्हतं. त्याऐवजी त्याचा पैसा जास्त उपयोगी पडायचा.

तूप विकून असा बाजूला ठेवलेला पैसा माय स्वयंपाकघरात डब्याखाली ठेवायची. त्यावर्षी आम्ही दिवाळी खूपच थाटात साजरी केली. घरी गंगूचं दुभतं होतं. त्यामुळे मायच्या हातात पैसा होताच. दिवाळीला कपडे घेतले. फटाके आणले. पण त्यामुळेच गहजब झाला. कारण कधी नव्हे ते मी अंगणात फटाके उडवले. अंगणातच गंगूचा गोठा होता आणि त्यात बाजूलाच थोडासा कडबा भरून ठेवला होता. फटाक्याची ठिणगी उडाली ती थेट कडब्याच्या गंजीत दडली. तिला आयतंच खाद्य मिळाले; ती पेटू लागली.

आम्ही सर्व झोपलो होतो. माय नुकतीच आवरून आडवी झाली होती. सर्वांचा डोळा लागला. दिवाळीच्या दगदगीनं माय लवकरच घोरू लागली. कडब्यांना लागून लाकडं ठेवलेली होती. गोठ्यावर टिन होते. कडब्याचा ढिगुला पेटला. तशी गंगू ओरडू लागली ती दावं तोडायचा प्रयत्न करू लागली.

गंगू आग बघताच जीवाच्या

आकांताने ओरडू लागली. आम्ही गाढ झोपेत होतो. त्यामुळं कोणालाच ऐकू येईना, गंगू ओरडू लागली तशी तिची तीनही वासरं ओरडू लागली. एकच गजर उठला. आवाज ऐकून गोपीकाकू सावध झाली. बघते तो गोठा पेटलेला. तरीही आम्ही उठेनात. शेवटी तिचा मुलगा उठला तो भिंतीवरून अंगणात उतरला. बघतो तो गोठा पेटला. बाजूची लाकडाची गंजीही पेटली आणि आग त्याला लागून असणाऱ्या स्वयंपाकघराकडे पसरू लागली.

''देवकीकाकू, देवकीकाकू!''

तो ओरडू लागला. आधी त्यानं गोऱ्यांचे दावे सोडले. दार उघडलं. तसे ते धावतच बाहेर पडले. नंतर वासरीचे दावे सोडले. तीही बाहेर पडली. तो गंगूचं दावं सोडणार तितक्यात टिनचं छप्पर कोसळलं. आता सगळेच उठले. आम्ही धावतच गोपीकाकूकडे गेलो. मायनं तितक्या गोंधळातही स्वयंपाकघरात जाऊन आपले साठवलेले पैसे आणले. आग विझवण्याऐवजी बापू आणि माय गंगीला वाचविण्यासाठी ओरडू लागले.

''आंधी माया गंगीले काढा बापा कोणी?'' मायनं टाहो फोडला. काही टिन उचलून गंगीचं दावं सोडलं. पण गंगी उठू शकली नाही. तिला टिन लागल्यामुळे ती घायाळ झाली होती. इकडे आग स्वयंपाकघराकडं पसरली होती. त्यामुळे किमान घर तरी वाचवावं म्हणून सगळी धडपडू लागली. आग विझविण्यासाठी विहिरीचं पाणी काढावं लागत होतं. दोन माणसं तर त्यातच गुंतले होते. आग काही आटोक्यात येत नव्हती. आता अख्खं गाव उठलं होतं आणि आग विझविण्यासाठी धडपडत होतं.

पण माय आणि बापू मात्र गंगीतच गुंतले होते. गंगी उठत नाही असं पाहून माय तिच्याकडे धावली होती. गंगीच्या अंगावरच टिन पडल्यामुळे तिला जखमा तर झाल्याच होत्या; पण ती पळण्याचा प्रयत्न करू लागल्यामुळे तिला अधिक दुखापत झाली होती. मागचे दोन्ही पाय मुरगळले होते. त्यामुळे तिला चालता येत नव्हते. आगीचा विचार सोडून मायनं बापूला गंगीसाठी बादलीत पाणी आणायला लावलं. ओरडून ओरडून गंगीचा घसा सुकला होता. त्यामुळे तिला तहान लागलीच होती. पण पाणी पिऊनही तिला हुशारी आली नव्हती. माय तर सारखी तिच्या अंगावरून हात फिरवीत होती. खेड्यात इतक्या रात्री डॉक्टरची काही सोयही नव्हती. गंगी अस्वस्थ होत होती. दावं तोडण्याचा प्रयत्न करून करून तिचे समोरचे पायही मुरगळले होते आणि घशाला कोरड पडत होती. मायनं ओळखलं गंगी काही वाचत नाही. तिनं तितक्या रात्री गोपीकाकूकडून भाकरी आणली. गंगीला चारली.

''गोपीकाबाई! माया गंगीले एकांदी भाकर द्यावं. ते निऱ्हा डोये पांढ्ढे करून रायली.''

गंगीनं शेवटचं 'हम्मा' म्हटलं आन् मान टाकली. मायनं तसाच टाहो फोडला. तिला घर जळलं त्याचं जितकं दु:ख झालं नाही तितकं गंगीच्या अपमृत्यूचं झालं. तिला दुसऱ्या दिवशी शेतात नेऊन पुरलं. आगीनं आमचं खूप नुकसान झालं होतं. पण गंगीमुळे प्राण वाचले होते. ती सारखी हंबरत होती. त्यामुळे गोपीकाकूला जाग आली होती. आणि पुढचा अनर्थ टळला होता. गंगूचे आमच्यावर आभाळभर उपकार होते. ते कधीही फिटणार नव्हते.

●●●

– **डॉ. प्रतिमा इंगोले**
अ – ००४, वृंदावन गार्डन सोसायटी,
लोकमान्य कॉलनी, पौड रस्ता,
कोथरुड, पुणे 411038

ही कथा लिहिली गेलीय 'वऱ्हाडी' या बोली भाषेत ! अकराव्या शतकातील प्राचीन मराठी भाषेचा प्रभाव या भाषेवर असल्याचे जाणवते. तुम्ही शिकत असलेली 'प्रमाण' मराठी भाषा व या कथेतील 'बोली'भाषा यात कोणता फरक जाणवतोय याची नोंद करा. नीट लक्षपूर्वक वाचलंत, तर शब्दांचे अर्थ, रूपं नक्कीच समजतील. काही शंका असल्यास जरूर कळवा. त्याचं स्पष्टीकरण द्यायला आम्हाला नक्की आवडेल.

हिरवेपण ओरबाडून, ग्रीष्म जातो निघून दूर। वसंत उतरला पालवीत, की झाडे लावतात हिरवा सूर।।

भारतरत्न पुरस्कार - उस्ताद पं. बिस्मिल्लाखान, शहनाई वादक,संगीत कलाक्षेत्र, **२००१**

संग्रही ठेवा - '**बकुळफुलं**', छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ६०/-

लेखांक – ४

निर्णयातील प्रभाव व स्वभाव

सुभाष देशपांडे

आपण जेव्हा लहान असतो, तेव्हा आई किंवा बाबा आपल्याला बजावत असतात 'हे करू नको' किंवा 'ते कर.' आपण त्यांचे ऐकतो; कारण ते आपले 'आई-बाबा' असतात, आपली काळजी घेतात, आपल्यावर प्रेम करतात, कधी कधी आपले हट्टही पुरवितात. 'शाम, फुलांच्या कळ्या तोडू नयेत,' हे सांगणारी आई, शामच्या आयुष्याला भावनेची समृद्धी देऊन गेली. तुमच्या माझ्यासारखे बरेचसे शाम मोठे झाल्यावर, 'आईला काय कळतंय' असे म्हणू लागतात व आपल्यावरचा तिचा 'प्रभाव' नाकारू लागतात. 'मी केव्हा काय करावं; हे ठरविण्यास माझा मी मुखत्यार आहे. ह्यात इतरांनी लुडबूड केलेली मला चालणार नाही', असा रागाचा फणकारा आठवी-नववीतही आपल्याला येतो. तेव्हा आपला 'स्वभाव' घडत असतो, प्रकटही होत असतो.

पुष्कळ वेळेला खेळाचा निर्णय 'आपला', अभ्यासाचा निर्णय 'पालकांचा', अशी विभागणी होते. खेळाचा तरी निर्णय दरवेळी 'आपला' असतो का, असं पाहिलं पाहिजे. आपल्या सोसायटीतला मित्र किंवा दादा हाक मारतो म्हणून आपल्याला खेळावंसं वाटतं. त्यावेळी आपल्या खेळण्याच्या निर्णयावर 'त्यांचा' प्रभाव असतो. 'काय खेळूया?' अशी चर्चा सुरू झाल्यावर तुमच्या मनात अगोदर काय येतं? इतरांनी वेगळे काही सुचविल्यावर तुम्ही तुमच्या मनात आलेला विचार किंवा पर्याय खोडून काढता, की त्याचा आग्रह धरून इतरांना तोच खेळ खेळायला लावता?

'तू म्हणशील तसं' असं जेव्हा तुम्ही मित्राला/दादाला म्हणता, तेव्हा त्याच्या शरीरयष्टीचा किंवा एरवीच्या रुबाबदार वागण्या-बोलण्याचा किंवा गंमतशीर- चटपटीत बोलण्याचा तुमच्यावर प्रभाव पडलेला असतो. निर्णयाची सुत्रं तुम्ही त्याच्या हाती अलगद देऊन टाकता. असं २-४ वेळा झालं, की तुम्ही त्याच्या सांगण्याप्रमाणे कोणताही खेळ खेळायला तयार व्हाल, तो ही गृहीत धरतो. तुम्ही हरकत घेणार नाही अथवा भांडण काढणार नाही याची त्याला खात्री वाटते. आपण त्याच्याकडे आपल्या नकळत ओढले जात आहोत, हे तुम्हाला जाणवत नाही. त्याचे वावगेही वाटत नाही. त्याबद्दल रागही येत नाही; कारण तुम्ही लहान असता.

हे लहानपण तसं पुढं वयावर अवलंबून राहत नाही. विषय काय आहे आणि आपला स्वभाव कसा आहे, त्यावर ते ठरत जातं. घरात आईचं शेपूट म्हणून वावरणारी तुमची बहीण शाळेच्या सहलीला जायचं म्हणाली, की 'बघ बाई, बाबांची परवानगी घे', असं आई म्हणते. घरात पैशाचे सगळे व्यवहार बघणारे बाबा, तुमच्या बहिणीचं पुढं लग्न ठरलं, की अंतिम निर्णयासाठी आईकडे बघतात; असे तुम्हाला आढळेल. म्हणजे कधी आई लहान होते, तर कधी बाबा! तुम्हां बहीण-भावांना मात्र वाटत राहतं, की आपण मोठे होत आहोत!

आपल्या वागण्या-बोलण्यावर, बाहेर जाण्यावर किंवा लवकर घरी येण्यावर इतर कुणाचा प्रभाव आहे, हे शोधा बरं ! तो ज्याचा किंवा जिचा आहे तो **निर्णयकर्ता**! तुम्ही कर्म !! कधीकधी पस्तावून 'कर्म माझं' असं जेव्हा तुम्ही म्हणता, तेव्हा निर्णय आपल्या हातात नाही; याचा तो राग असतो. परीक्षेचा निर्णय शाळेच्या हाती, तुम्हाला स्कुटर चालवू द्यायची की नाही याचा निर्णय पोलिसाच्या हाती, तुम्हाला टीममध्ये

घ्यायचं की नाही, याचा निर्णय कप्तानाच्या हाती. आणि तुम्ही कोणते औषध घ्यायचे याचा निर्णय डॉक्टराच्या हाती.

अनेक बाबतीतले इतरांनी घेतलेले असे निर्णय तुम्ही तुमच्यासाठी मान्य करता किंवा स्वत:हून त्यांच्यावर सोपविता. असे कोणकोणत्या बाबतीत तुम्ही करता, यावर विचार करून पाहा. सकाळी किती वाजता तुम्हाला झोपेतून उठवावे याचा निर्णय आईवर; पण अभ्यासाला एकदा बसल्यावर तो सलग किती वेळा करायचा हा निर्णय 'तुमचा तुम्ही' घेऊ शकता का? का तो सोसायटीतल्या मित्रावर किंवा दादावर सोपविलेला असतो? कोणत्या तरी बाबतीत 'मी ठरवेन तसेच मी करीन' असे जमले म्हणजे आले निर्णयातील स्वावलंबन!

नुसती आवड-निवड म्हणजे स्वावलंबन नव्हे. दादापेक्षा वेगळ्या फ्लेव्हरचे आईस्क्रीम हवे अशी फर्माईश सोडणे, म्हणजे निर्णय नव्हे. कपडे खरेदीला गेलात, की कोणत्या डिझाईनचा शर्ट किंवा ड्रेस घेऊ? असा प्रश्न मुलांना किंवा मुलींना पडतो. त्या आवडी-निवडीतले पर्याय पाहून, टिकाऊपणा आणि किंमत यांची योग्य सांगड घालता येणे, म्हणजे निर्णय! चोखंदळपणा हा स्वभाव आहे! शेवटी दुकानदाराच्या बोलण्यातला नग खरेदी करणे, हा प्रभाव! आणि केलेली खरेदी मित्र मंडळींना पसंत पडली की नाही याचा कौल घेत, 'एकदा विकलेला माल येथे परत घेतला जात नाही' अशी दुकानातली पाटी आठवून, आपण केलेल्या खरेदीचं समर्थन करत राहणं हे कार्य होय!! ते अनेकांच्या नित्य कपाळी येतं. म्हणून **'कर्ता'** होणं महत्त्वाचं.

व्यवहारात पुढेपुढे अनेक बाबतीत हे घडते. शास्त्र शाखेला जाऊ की कला शाखेला जाऊ? नोकरी करू की व्यवसाय करू? सुट्टीत शिबिराला जाऊ की फिरायला जाऊ? या सर्वच बाबतीत तुम्ही कसा निर्णय घेता, याचे विश्लेषण करा. परावलंबन अनेक बाबतीत अपरिहार्य असते; तरीही काही निवडक निर्णयाच्या बाबतीत तरी स्वावलंबन हवे, एवढं मात्र नक्की.

●●●

- सुभाष देशपांडे
कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ, पुणे ३०
subhash.deshpande@jnanaprabodhin.org

बौद्धिक खेळ

खरी-खरी उत्तरे शोधा !

उद्‌देश : पडलेल्या प्रश्नांची माहिती मिळवण्याकरता चालना मिळणे, संकल्पना स्पष्ट होणे, जिज्ञासा वाढवणे.
साहित्य : पेन, वही किंवा कोरे कागद इत्यादी.
सूचना : आपण रोज नवीन नवीन माहिती बघत-ऐकत-वाचत असतो. हे करत असताना त्या संबंधीचे अनेक प्रश्न आपल्या मनात येत असतात. प्रत्येक प्रश्नांची खरी उत्तरे आपल्याला माहिती असतीलच असे नाही. ही खरी उत्तरे शोधण्यासाठी वहीच्या पानाचे तीन भाग करा. त्या मधल्या भागात तुम्हाला पडलेले प्रश्न लिहा. प्रश्नांच्या उजव्याबाजूला तुम्हाला त्या प्रश्नाचे उत्तर काय असेल असे वाटते ते उत्तर लिहा. आणि डाव्याबाजूला प्रश्नाचे खरे उत्तर लिहा. खरे उत्तर शोधण्यासाठी पुस्तक, शिक्षक, पालक, विषयतज्ज्ञ, इंटरनेटची मदत घ्या. तुम्हाला वाटलेले उत्तर व खरे उत्तर काय आहे, याची तुम्हालाच स्पष्टता येईल. आणि तुम्हालाच पडलेल्या प्रश्नाचं योग्य, अचूक व खरे उत्तर मिळण्याचा आनंद तुम्हाला मिळेल. हा खेळ तुम्हाला मित्राबरोबर सुद्धा खेळता येईल.

खेळून झाल्यावर खालील मुद्द्यांवर विचार, चर्चा करा.

मुद्दे - १. खेळ आवडला का? २. कोणत्या-कोणत्या विषयाचे प्रश्न तुम्हाला पडलेत?
३. खरी-खरी उत्तरे शोधण्यासाठी नवीन, वेगळ्या कोणत्या पद्धतीचा उपयोग केलात?

- जया बदी, jaya.badi@yahoo.co.in

माझ्या आनंद लोकात केले, वसंताने घर। आंब्या आंब्याच्या फांदीला फुटे, कोकिळेचा स्वर।।

भारत शौर्य पुरस्कार २०१३ - तरंग अतुलभाई मिस्त्री- वय १७, (नर्मदा नदीमध्ये बुडणाऱ्या लोकांना वाचवले.)

संग्रही ठेवा - कादंबरीका- **'कहाणी दोन भावांची'**, **'मृद्‌गंध'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ३०, ६०

'तुम्हीच संपादक व्हा !' हस्तलिखित स्पर्धा २०१२-१३- मागोवा

Tag No. CP130771 ActiveLink व्हिडिओ पाहा पृ. क्र. १० पाहा.

(हस्तलिखित स्पर्धेचा निर्णय मलपृष्ठाच्या आतील पानावर दिला आहे.)

'तुम्हीच संपादक व्हा' या हस्तलिखित स्पर्धेत अगदी मनापासून सहभागी झालेल्या सर्व मित्र-मैत्रिणींचे प्रथम कौतुक आणि पाठीवर शाबासकीची थाप ! पुढील वर्षीही तुम्ही सर्वांनी अधिक संख्येनं आणि अधिक गुणवत्तेनं या स्पर्धेत सहभागी व्हावं, यासाठी तुम्हा सर्वांना खूप खूप शुभेच्छा !

वर्ष २०१२ हे ज्ञान प्रबोधिनीचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आणि 'छात्र प्रबोधन'चे द्विदशकपूर्ती वर्ष ! या निमित्तानं या हस्तलिखित स्पर्धेला लाभलेला तुमचा उदंड प्रतिसाद आमच्याही उत्साहात भर घालणारा ठरला. या वर्षी इ. सातवी ते दहावीमधील ५९ संघ (सुमारे ८७५ विद्यार्थी) महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांतून स्पर्धेत सहभागी झाले आहेत. पुण्याबरोबरच कऱ्हाड, चाळीसगाव, नागपूर, भंडारा, रत्नागिरी, नाशिक, अकोला इ. विविध गावांचे स्पर्धेत प्रतिनिधित्व आहे.

तुम्ही सर्वच मुला-मुलींनी आपापलं हस्तलिखित अधिक दर्जेदार, अधिक नावीन्यपूर्ण, अधिक नेटकं करण्याचा मनापासून प्रयत्न केला आहे. चांगलं अक्षर असणाऱ्यांचा, चित्रकला चांगली असणाऱ्यांचा, लेखक मंडळींचा असा संपादक गट बऱ्याच हस्तलिखितातून काम करताना जाणवला. गटानं कार्य साधण्याचा तुमचा प्रयत्नदेखील चांगला आहे. पण संपादन करण्याबरोबरच अनेकांना हस्तलिखितासाठी लिहितं करणं, हेही संपादक मंडळाचं काम आहे.

यावेळी हस्तलिखिताच्या स्वरूपामध्ये थोडा बदल करण्यात आला होता. हस्तलिखितातील वाङ्मयीन वैविध्य वाढावे, प्रतिभाशाली/कल्पक लेखनासाठी मुलं उद्युक्त व्हावीत, हा त्यामागचा उद्देश होता. त्यामुळे कल्पनाप्रधान गोष्ट, गुप्तसंदेश कविता, निर्जिव वस्तूंमधला संवाद, वस्तूमधील सुधारणा, कोलाज इ. प्रकार हस्तलिखितात असणं बंधनकारक होतं. त्यासाठी काही तंत्र तुम्ही मुलांनी शिकून घ्यावीत असाही प्रयत्न होता. ही तंत्रे समजून घेऊन त्याप्रमाणं लेखन करण्याचा तुम्ही चांगला प्रयत्न केला आहे. २-४ प्राणी कल्पनेनं एकत्र करून त्यावरची गोष्ट लिहिणं तुम्हा मुलांना आवडलेलं दिसतं आहे. बहुतांशी हस्तलिखितात हा प्रयत्न केलेला जाणवतो. परंतु 'प्राणी कसा तयार झाला' इथपर्यंतच कथा बरेचदा मर्यादित राहिली आहे. असा प्राणी तयार झाल्यानंतरची धमाल, गोष्टीत रंगवायला अजून परिश्रम घेण्याची आवश्यकता भासते. 'गुप्तसंदेश कविता' लिहिण्याचाही चांगला प्रयत्न केलेला दिसतो. कुठे कुठे संदेश आणि आशय एकच आलेला दिसतो. 'जिज्ञासा' हस्तलिखितातील 'संदेश' उमजला नाही. (कदाचित परीक्षकांची परीक्षा घेण्याचं योजलं असावं). 'ज्ञानसखा' हस्तलिखितातील 'चष्म्याविषयी'च्या, 'सृजनाची कैलास लेणी'मधील शाळेसंबंधीच्या 'सुधारणा' लक्षात राहणाऱ्या आहेत. याठिकाणीही सुधारणा सुचवताना त्यातील परिणामांची किंवा या सुधारणा कशा करता येतील याविषयीची चर्चा अपेक्षित नसते, हे लक्षात घ्यायला हवं. दोन निर्जिव वस्तू एकत्र आल्यावर दरवेळी त्या

हस्तलिखितांची पारितोषिके देणाऱ्यांची नावे

१. **श्री. दिवाकर बाळकृष्ण बापट** (कै. बाळकृष्ण दत्तात्रय बापट यांचे स्मरणार्थ)

२. **सौ. ललिता लिखिते** (कै. शं. रा. देवळे यांचे स्मरणार्थ)

३. **श्रीमती निर्मला गोपाळ किराणे** (कै. गो. म. किराणे यांचे स्मरणार्थ)

वरील देणगीदारांनी दिलेल्या देणगीच्या ठेवींवरील व्याजातून हस्तलिखित स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकांची पारितोषिके देण्यात आली आहेत. अन्य सर्व पारितोषिके 'छात्र प्रबोधन' तर्फे देण्यात आली आहेत. सर्व यशस्वी स्पर्धकांना पुस्तकरूपाने ही पारितोषिके पाठवली आहेत.

वनवनितेच्या गालांवरती, तांबूस मृदू पानांची लाली। वसंत स्वागत करण्यासाठी, मधुर कोकिळा स्तवन गायली॥

पद्मविभूषण पुरस्कार - प्रा. यश पाल - विज्ञान आणि तंत्रज्ञान - उत्तरप्रदेश ,**२०१३**

संग्रही ठेवा - '**त्रिमितीची किमया**', ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, किं. ₹ ५०/-

भांडण्याच्याच मूडमध्ये दिसतात. त्या तुलनेत घंटा आणि कुलूप यांतला संवाद (यशोघट) उल्लेखनीय होता.

गणितवर्षाच्या निमित्ताने गणिततज्ज्ञाचा परिचय, स्वामी विवेकानंद शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने त्यांच्यावरील लेख आणि 'एका उद्योजकाची मुलाखत' हे व्यक्तिपरिचयही अनिवार्य होते. यात गणितज्ञ 'रामानुजन' यांचा लेख (यशोघट) नेमका झाला आहे. त्याला ३७ च्या पाढ्याचे जोडलेले पानपूरक स्फुटंही उचित वाटले. 'ऊर्जा' हस्तलिखितातील विवेकानंदांवरचा लेख चांगला. विवेकानंदांचे विचार, त्याचे सार/अर्थ आपल्या शब्दांत, आजची उदाहरणे देत मांडायला हवा आहे. 'जिज्ञासा' हस्तलिखितातील श्री. पोळ यांची मुलाखत विशेष रंगली आहे.

या व्यतिरिक्तच्या साहित्यात वेगवेगळ्या विषयांना (अगदी स्त्री-भ्रुण हत्या, मराठी अस्मिता, इ.) स्पर्श करणाऱ्या कविता आहेत. 'समाजजागल्या' हस्तलिखितातील कविता विशेष उल्लेखनीय. 'पाखरू' मध्ये एखादी स्वरचित कविता असती तर जास्त परिणाम साधला असता.

अनेक मान्यवरांना श्रद्धांजली देऊन त्यांची दखल घेतल्याचं काही हस्तलिखितातून जाणवते. स्फुटं किंवा पानपूरके मोजक्याच हस्तलिखितात दिसली (स्फूर्ती, जिज्ञासा,) प्रवासवर्णनपर लेखांमध्ये दौलताबादचा किल्ला (ऊर्जा), दिल्लीवर्णन (इंद्रधनू), कोकण (यशोघट) विशेष उल्लेखनीय. पहाटेच्यापारी (पाखरू) ललितलेख छान. त्याला चित्रांची जोडही उत्तम! 'शब्दझुला'मधील 'वाङ्मयचौर्य नसल्याचे' मुख्याध्यापकांचे पत्र उल्लेखनीय. शब्दांगणमधील 'माझं जरा चुकलंच' या विषयीची २ पत्रं आणि 'इंद्रधनू' मधील 'इंद्रधनू' हे लेख विचारप्रवर्तक झाले आहेत. 'यशोघट', 'पाखरू', 'समाजजागल्या' यातील पुस्तक परीक्षणासाठी निवड केलेले पुस्तक नेमके आहे व त्यावरचं परीक्षणही उत्तम झालं आहे. परीक्षणासाठीच्या पुस्तक निवडीलाही तितकेच महत्त्व आहे.

हस्तलिखित तयार करताना ते 'स्पर्धेसाठी पाठवायचे' हाच निव्वळ हेतू असतो का, असावा का, यावर तुम्ही विचार करणं गरजेचं वाटतं. आपल्यासारख्याच इतर मुलामुलींनीही ते वाचलं पाहिजे, त्यासाठी लेखन केलं पाहिजे. त्यातले विषय निवडताना ते आपल्या आवाक्याबाहेरचे तर नाहीत ना, आपल्याला ते व्यवस्थित कळले आहेत ना, आणि आपण ते आपल्या भाषेत (इतरांना समजेल असे) मांडतो आहोत ना इकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यायला हवं.

यावेळी जलरंगांचा विशेष वापर हस्तलिखितांमध्ये आढळला. टापटीप, हस्ताक्षर, चित्रांची जोड, सजावट यात 'पाखरू', 'यशोघट', 'समाजजागल्या', 'सृजनाची कैलासलेणी', 'शब्दझुला' ही हस्तलिखितं सरस ठरली. काही हस्तलिखितांमध्ये मात्र, सुरुवातीचा उत्साह शेवटपर्यंत टिकला नाहीये, हे लक्षात येते.

सातवीतल्या मुलांचा 'ज्ञानसखा' हा पहिलाच प्रयत्न अगदी मनापासून व उत्स्फूर्त झाला आहे. जे वाटतंय ते प्रामाणिकपणे, निरागसपणे मांडण्याकडे त्यांचा कल दिसतो.

या स्पर्धेच्या निमित्तानं तुम्ही मुलं-मुली काय वाचता, कसा विचार करता, कसं लिहिता हे जाणून घेण्याची संधी मिळाली. बंधनकारक विषयांमुळे तुम्हाला काही नवीन सुचलं, की ही बंधनं जाचक वाटली? 'आम्हाला जे पाहिजे ते हस्तलिखितात लिहायला त्यामुळे वावच मिळाला नाही', असे वाटले का? तुमचं म्हणणं जाणून घ्यायला आम्हीही उत्सुक आहोतच; पण हे तुमचं वाचन-लेखन या स्पर्धेपुरतंच मर्यादित राहू नये. कारण तुमच्यातून उद्याचे कवी-लेखक-चित्रकार-संपादक तयार होणार आहेत, याची खात्री बाळगा. त्यासाठी सातत्यानं लिहीत राहा.

•••

परीक्षक – स्वाती ढेकणे, वर्षा कुलकर्णी, अंजली कर्वे, स्वाती दाढे, आश्लेषा महाजन, वृषाली लेले, जयश्री काटीकर व ईशान पुणेकर

प्रथम तीन क्रमांकांची हस्तलिखिते 'छात्र प्रबोधन'च्या संकेत स्थळावर क्रमशः एप्रिल महिन्यापासून पाहू शकाल.
छात्र प्रबोधनचे संकेतस्थळ www.chhatraprabodhan.org

उत्साहाची, चैतन्याची कुणी उधळली जणु मूठ। सुगंधाची दश दिशात चाललीसे लयलूट।।

गीता चोप्रा शौर्य पुरस्कार २०१३ - रेणू - वय ८, दिल्ली, (आश्रमातील मुलींवर होणाऱ्या अत्याचारांना वाचा फोडली.)

संग्रही ठेवा - '**जिद्दीची लोभस रूपं**', छात्र प्रबोधन प्रकाशन, किं. ₹ ६०/-

हसता... हसता...

मंत्र्यांचे भाषण !

सभेत मंत्री भाषण वाचून दाखवत होते. त्यांना १५ मिनिटे बोलायचे होते; परंतु त्यांचे भाषण तासभर झाले. लोक गडबड करू लागले. कार्यक्रमानंतर मंत्र्यांनी आपल्या सेक्रेटरीला चांगलेच धारेवर घेतले,

''१५ मिनिटांच्या ऐवजी तू तासाभराचे भाषण तयार केलेस, त्यामुळे लोकांनी माझी चांगलीच हुर्यो केली.''

''नाही साहेब. भाषण १५ मिनिटांचंच होतं; पण तुम्ही त्याच्या चार झेरॉक्स कॉपी वाचून दाखवल्यात.''

ऐतिहासिक प्रगती !

नाना : बेटा, तुझ्या प्रगती-पुस्तकावरून दिसतंय, की तू इतिहासाचा अभ्यास नीट करत नाहीयेस.

मुलगा : त्यात माझा काही दोष नाही. आमचे सर नेहमी मला असे काही प्रश्न विचारतात, की त्या गोष्टी माझ्या जन्माआधीच घडलेल्या असतात. मग मला कसं कळणार?

पोलिसांचा कुत्रा !



बंडू – हा कोणत्या जातीचा कुत्रा आहे?

खंडू – तो पोलिसांचा कुत्रा आहे.

बंडू – पण तो तसा काही दिसत नाहीये.

खंडू – अरे तो नाहीच दिसणार. तो गुप्तचर विभागात आहे ना?

पाटीचा प्रताप !

शामूला रोजच शाळेत जायला उशीर व्हायचा. हे पाहून एके दिवशी गुरुजींनी त्याला उशीर होण्याचं कारण विचारलं. शामू म्हणाला, 'काय सांगू गुरुजी? शाळेत वेळेवर पोहोचण्यासाठी मी रोज घरून लवकर निघतो; पण आपल्या शाळेजवळच्या मेन रोडची ती पाटी. तिच्यामुळे मला उशीर होतो.'

'काय झालं त्या पाटीला?' गुरुजींनी विचारलं.

'शाळा-सावकाश जा,' असं त्या पाटीवर लिहिलंय.

...तेव्हाच वाजवीन !

''बाबा, मला एक ढोलकं आणून द्या ना.'' एका लहान मुलाने आपल्या वडिलांकडे हट्ट धरला. ''तुला ढोलकं आणून दिलं असतं; पण सारा दिवस वाजवून तू मला त्रास देशील.'' बाबा म्हणाले.

''नाही हो बाबा,'' मुलगा शांतपणानं म्हणाला, ''दिवसभर वाजवून मी तुम्हाला जराही त्रास देणार नाही. तुम्हाला चांगली झोप लागल्यावरच मी ते वाजवत जाईन.''

असाही उपयोग !

''उन्हात का उभा राहिला आहेस बाळ?'' रस्त्यातून जाणाऱ्या एका माणसाने मुलाला विचारले. मुलगा म्हणाला, ''घाम वाळवतोय.''

(पान क्र. १८ वरील 'ओळखा मी कोण?' कोड्याचे उत्तर – भुंगा)

शब्द-सूर-ताल-लय, भवती अवघं गाणं आहे। मनोमनी उत्कट आशा, हे जीवन सुंदर आहे।।

बापू गायधनी शौर्य पुरस्कार २०१२ - हली बरफ, वय १५, ठाणे, मोठ्या बहिणीला चित्त्यापासून वाचवले.

संग्रही ठेवा - **'आयुष्यातील वादळलाटा'**, ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, किं. ₹ ७०/-

अनुभवसंपन्न आणि आनंददायी सुट्टीसाठी... व्यक्तिकार्ये
(५ वी ते ८ वीच्या मुला-मुलींसाठी)

मित्रांनो, आता सुट्टीचे वेध लागलेत हो नं ! ही सुट्टी अधिक आनंददायी व अर्थपूर्ण कशी करता येईल? यासाठी छात्र प्रबोधन तुम्हाला नक्कीच मदत करेल. चला तर मग खाली दिलेली कामांची यादी वाचा आणि लागा कामाला. काही कामे काही तासांची आहेत, तर काही कामे ८-१० दिवस रोज थोडा थोडा वेळ करत जाण्याची आहेत.

काम पूर्ण झाले, की वहीत दिनांक घालून त्यापुढे ते नोंदवून ठेवा. काम करताना आलेली मजा, झालेली फजिती, मिळालेली नवीन माहिती, नवीन अनुभव इ. गोष्टीही थोडक्यात लिहा. शक्य झाल्यास आपल्या आई-बाबांची त्यापुढे स्वाक्षरी घ्या. आवडली ना कल्पना? नवीन अनुभव घेण्यासाठी या **'व्यक्तिकार्यांचा'** तुम्हाला नक्कीच उपयोग होईल. अजून १६ कामांची यादी पुढच्या अंकात (सौर वैशाख, मे २०१३) देणार आहोत. या दोन महिन्यांच्या सुट्टीत मिळून दिलेल्या ३२ कामांपैकी कोणतीही २० कामे पूर्ण केलीत तर घरच्यांच्या शाबासकीबरोबरच तुम्हाला छात्र प्रबोधनतर्फे बक्षिसही मिळेल. काय म्हणता, 'काय आहे बक्षीस?'... ***सरप्राईज !!!***

व्यक्तिकार्ये - एकट्याने करण्याची कामे

१. जवळच्या भाजीच्या दुकानात जाऊन दहा पालेभाज्यांची माहिती करून घ्या व कोणतीही एक पालेभाजी आणून त्याची भाजी तयार करा. (निवडण्यापासून शिजवण्यापर्यंत सर्व कृती तुम्हीच करायची आहे.)

२. आईच्या वेगवेगळ्या काळातील व वेगवेगळ्या प्रसंगांमधील प्रकाशचित्रे संकलित करून त्याचा संगणकावर एक स्लाइड शो तयार करा किंवा मोठ्या कार्डशीटवर ती प्रकाशचित्रे वापरून त्याचे कोलाज तयार करून त्यांना योग्य शीर्षके द्या.

३. बँकेत स्वत:च्या किंवा आई-बाबांच्या खात्यात काही रक्कम जमा करा व काही रक्कम काढून आणा.

४. कलिंगड/फणस ही फळे स्वत: कापून घरातल्यांसमवेत तुम्हीही खा.

५. किराणा मालाच्या दुकानात गर्दीच्या वेळी चार तास काम करण्याचा अनुभव घ्या.

६. जवळच्या एखाद्या ग्रंथालयात जाऊन पुस्तकांची माहिती करून घ्या. एखाद्यातरी पुस्तकाचे वाचन तिथे बसून करा.

७. स्वत: कुंडीत धने पेरून आलेल्या कोथिंबिरीचा स्वयंपाकात वापर करा.

८. तुम्ही राहात असलेल्या वाडा/बिल्डिंग/सोसायटीमधील सामाईक दिव्यांची साफसफाई करा.

९. आपल्या नातेवाईकांच्या आणि परिचितांच्या (किमान ५०) वाढदिवसांची महिनावार दिनदर्शिका (कॅलेंडर) तयार करा.

१०. छात्र प्रबोधनमधील तुम्हाला आवडलेल्या कोणत्याही लेखातील/कथेतील एखादा उतारा (किमान १०० शब्द) पाठ करा व तो आईवडिलांसमोर सादर करा.

११. ६ × ६ चौकटींमधील मराठी/इंग्रजीतली ३ शब्दकोडी तयार करा. एकूण ३६ चौकटींपैकी सहा चौकटींवर फुल्या मारा.

१२. कोणतेही एक वृत्तपत्र वापरून त्यातील सलग तीन दिवस येणाऱ्या बातम्यांचे १० गटांमध्ये वर्गीकरण करा.

१३. तुमच्या घरात कचऱ्यात टाकून दिल्या जाणाऱ्या ५० वस्तूंची यादी करा. त्यांचे ५-७ गटात वर्गीकरण करा आणि त्यातल्या एका वस्तूचा कशा रितीने पुन्हा वापर करता येईल याबद्दल दहा कल्पना लिहून काढा.

१४. एखादा छानसा चित्रपट पाहून त्याची तुमच्या शब्दात गोष्ट लिहा. (वहीची ४ ते ५ पाने)

१५. कुल्फी/आईस्क्रीम स्वत: तयार करून विकणाऱ्या फेरीवाल्याची मुलाखत घ्या. ते तयार करण्याची प्रकिया पाहून या.

१६. आई व वडिलांच्या तीन-तीन पिढ्या मागे जाऊन तेव्हापासून तुमच्यापर्यंतचा तुमच्या कुटुंबाचा एक कुटुंबवृक्ष तयार करा.

८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी छात्र प्रबोधनतर्फे 'जोडीकार्य' उपक्रम

तपशील याच अंकात पृष्ठ क्र. २८ वर वाचा व आवर्जून सहभागी व्हा.



वसंत चाहूल लागे आता, कोकीळ घेई तान। उन्मेषाला आले भान, सृष्टीचे ओठी आले गान।।

संजय चोप्रा शौर्य पुरस्कार - गजेंद्रराम - वय ११, छत्तीसगड (विहिरीत बुडणाऱ्या मुलाचे प्राण वाचवले.)

संग्रही ठेवा - कथासंग्रह-'**दरवळ**, छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ४०/-

'छात्र प्रबोधन निव्वळ मासिक नव्हे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ' हे मासिकाच्या प्रत्येक महिन्याच्या मुखपृष्ठावर जेव्हा जेव्हा वाचले, त्या त्या वेळी मला कुतूहल वाटलं. 'मासिक' ही 'चळवळ' कशी होऊ शकते? मी स्वत: याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. ज्यावेळी संपूर्ण मासिक मी वाचतो आणि वाचल्यानंतर आपण काय वाचले याचा जेव्हा विचार करतो; त्यावेळी खरोखर आपण कितीतरी गोष्टी 'करू' शकतो याची कल्पना येते. मासिकातील कथा, कविता, ललित लेख, कृतीपर उपक्रम इ. तर अप्रतिम असतातच. प्रत्येक वेळी नवं वाचायला मिळणार म्हणून मासिकाची दर महिन्याला वाट पाहाणं, हा त्यातलाच एक भाग! 'छात्र प्रबोधन'साठी केंद्रप्रमुख, म्हणून काम करताना मासिकाविषयी इतरांच्याही प्रतिक्रिया कळतात. चर्चा होते. त्यातुनच खरी चळवळ उभी राहते, असं मला वाटतं. 'छात्र प्रबोधन'मुळे युवक विद्यार्थी व केंद्रप्रमुख म्हणूनही खूप काही शिकायला मिळालं, मिळत आहे. यासाठी 'छात्र प्रबोधन' चा मी आभारी आहे.

- चि. शुभम जोशी, केंद्रप्रमुख औरंगाबाद

✻

पाठ्य पुस्तकाबाहेर विद्यार्थ्यांना वाचायला, 'लिहायला', 'बोलायला' व हे सर्व करण्यासाठी 'विचार करायला' लावणारे उपकरण म्हणजे 'छात्र प्रबोधन'. कृती करण्यासाठी दिशा दाखवणारे पुस्तक, एखाद्या विद्यार्थ्याला देण्यासाठी उत्तम भेट म्हणजे छात्र प्रबोधन. तसेच आम्हा कार्यकर्त्यांना कार्यप्रवण करणारी ही ठिणगी आहे. 'प्रमाण मराठी' भाषा खेड्यातील शिक्षक-विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे मासिक हे साधन आहे. महाराष्ट्रात विद्यार्थी विकसनाचे काम आवडीने करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र आणणारे 'छात्र प्रबोधन' हे व्यासपीठ आहे.

- विनायक गद्रे, केंद्रप्रमुख,
इचलकरंजी जि. कोल्हापूर

माझ्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'

✻

छात्र प्रबोधन
२० वर्षांची वाटचाल

शाळेतील विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण करणारे, नवनव्या लेखकांना, कवींना संधी देणारे, मुलांच्या अभिव्यक्तिला वाव देणारे, कृतीप्रवण करणारे मासिक म्हणजे छात्र प्रबोधन होय. मान्यवर लेखकांबरोबरच नवनव्या लेखकांचा परिचय, सामान्य माणसांमधील 'असामान्यत्व' मुलांपर्यंत पोहोचवणारे, मुलांची सामाजिक जाणीव प्रगल्भ करणारे असे हे मासिक. छात्र प्रबोधनसाठी केंद्रप्रमुख म्हणून काम करताना म्हणूनच खूप समाधान वाटते.

- मिलिंद चिंदरकर, केंद्रप्रमुख,बांद्रा, मुंबई

✻

मुलांना टि.व्ही.चे जे वेड लागले आहे, त्यापासून परावृत्त करण्यासाठी मासिकाचा उपयोग होतो. मुलांची वाचनाची आवड वाढीला लागते. कुटुंबातील सर्वांनाच हा अंक वाचनीय वाटतो. विविध ठिकाणी बोलताना, चर्चांमध्ये यातील आशय-विषय खूपच उपयोगी पडतात. छात्र प्रबोधनमुळे पालक आणि मुले यांच्यामधील संवाद वाढण्यास खूपच मदत झाली आहे.

- प्रशांत अवचट, केंद्रप्रमुख, शिरूर (घोडनदी), जि. पुणे

✻

ज्ञान प्रबोधिनी, पुणे तर्फे सुट्टीतील शिबिरे

शिबिराचे नाव	दिनांक / वेळ	वयोगट	तपशील व शुल्क	विभाग–संपर्क
१. बालविकास शिबिरे (अनिवासी)	६ ते १२ मे १३ ते १९ मे २० ते २७ मे, २०१३ स. १२ ते दु. ५	७ ते १२ वर्षे मुले – मुली	विविध बौद्धिक क्षमतांना चालना देणारे खेळ, प्रकल्प, गटकार्य इ. **शुल्क रु. १५००/–**	**प्रज्ञा मानस संशोधिका** सुजाता होनप ९४२०१७८०२० वीणा तिखे ८३९०९९८२६३
२. क्षमता संवर्धन शिबिर (अनिवासी)	२७ मे ते २जून २०१३ सकाळी १२ ते दुपारी ५	८ वी ते १०वीत गेलेले मुले – मुली	बौद्धिक, सामाजिक, भावनिक कौशल्ये व अभ्यास कौशल्ये यांवर आधारित खेळ, प्रकल्प, व्याख्याने, गटकार्य इ. **शुल्क रु. १५००/–**	**प्रज्ञा मानस संशोधिका** वीणा तिखे ८३९०९९८२६३ सुजाता होनप ९४२०१७८०२०
३. नेतृत्व संवर्धन शिबिर (निवासी)	युवकांसाठी – २७ ते ३१ मे व २३ ते २८ जून २०१३ युवतींसाठी – १३ ते १७ मे १६ ते २० जून २०१३	१२ वी ते एस. वाय. ची परीक्षा दिलेले युवक–युवती	नेतृत्वाला आवश्यक कौशल्यांच्या कार्यशाळा, गटकार्य, गटचर्चा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन व प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित प्रशिक्षण **शुल्क रु. ३०००/–**(अधिक सेवाकर)	**नेतृत्व संवर्धन केंद्र** महेन्द्र सेठिया ९४०४२२४७०५ नितीश नरखेडकर ९६०४००२३५०
४. विद्याव्रत संस्कार (अनिवासी)	२० ते २६ मे २०१३	वयोगट १३ ते १५ वर्षं – मुलामुलींसाठी	विद्याव्रत संस्काराच्या माध्यमातून सुयोग्य असे मार्गदर्शन दिले जाते. **शुल्क रु. ५००/–**	**संत्रिका/संवादिनी** उज्ज्वलाताई ०२०–२४२०७१४६ शुभांगीताई ०२०–२४२०७२२२
५. नेतृत्व संवर्धन शिबिर (निवासी)	२४ ते २९ एप्रिल १३	८ वी ते १० वी परीक्षा दिलेल्या फक्त मुलांसाठी	नेतृत्व कौशल्यांचे प्रशिक्षण, गटकार्य व प्रत्यक्ष अनुभव याद्वारे नेतृत्वाची संधी! **शुल्क रु. ९००/–**	**छात्र प्रबोधन** अमेय आमशेकर ९०९६९२५५२८ अभिजित काळे ९५०३८८०७३३
६. रूप पालटू शिक्षणाचे (निवासी)	११ ते १६ मे २०१३	यावर्षी / गेल्या २–३ वर्षांत B.Ed./ B.P.Ed / M.Ed होत असलेल्या/झालेल्या युवा अध्यापकांसाठी	ज्ञान प्रबोधिनीमध्ये सिद्ध झालेल्या शैक्षणिक प्रयोगांचा परिचय, विचारवंत व कृतिशील शिक्षणतज्ज्ञांसमवेत चर्चा, कृतिसत्रे, काही शैक्षणिक प्रकल्पांना भेटी. **शुल्क रु. १५००/–**	**शैक्षणिक उपक्रम संशोधिका** प्रकाश रणनवरे ९८२३१५३९४८ गीता साठ्ये ९८२२६६०६८३
७.कल्पक बनूया (अनिवासी)	२ मे ते ५ मे २०१३ सकाळी ८ ते ११	इ. ७ वी व ८ वी मुले–मुली	कल्पक विचार करण्याची तंत्रे आणि कृतीयुक्त सराव. **शुल्क रु. ६००/–**	

याशिवाय या अंकात छात्र प्रबोधनतर्फे आयोजित 'अभिव्यक्ती शिबिर' – पान क्र. १०, 'छात्र प्रबोधनमध्ये कार्यानुभव' पान क्र. २०, 'जोडीकार्य' – पान क्र. २८ वर माहिती पाहावी.

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ चैत्र, शके १९३५, १ एप्रिल २०१३ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे–२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.

छात्र प्रबोधन आयोजित 'तुम्हीच संपादक व्हा २०१२' स्पर्धेचा निर्णय





द्वितीय क्रमांक : पाखरू
सरस्वती विद्या मंदिर, कराड

प्रथम क्रमांक : यशोघट
बाल शिवाजी मा. शाळा, अकोला

तृतीय क्रमांक : शब्दझुला
लाहोटी कन्या शाळा, कराड



उत्तेजनार्थ पारितोषिके

समाजजागल्या
– फाटक हायस्कूल, रत्नागिरी

इंद्रधनू
– तात्यासाहेब सामंत विद्यालय, चाळीसगाव

ज्ञानसखा
– रमणबाग हायस्कूल, पुणे

सृजनाची कैलासलेणी
– ध्रुव ॲकॅडमी, धांदरफळ, ता. संगमनेर

सर्वांचे अभिनंदन !

(सविस्तर लेख अंकातील पान क्र. ४३ वर पाहा)

सौर चैत्र, शके १९३५/एप्रिल २०१३, पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
पंजीकरण क्रमांक (RNINO.)MAHMAR/2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**

आम्ही जाउच जाऊ

अदम्य अपुल्या आकांक्षांचे गीत आजला गाऊ
जिथे जायचे ठरले तेथे, तेथे जाउच जाऊ,
आम्ही जाउच जाऊ ।। ध्रु. ।।

नवतेजाप्रत नवक्षितिजांच्या दौडत दौडत जाऊ
क्षणभर सांगुनी मनिचे हितगुज स्वप्ने नव रंगवू
नवीन कवने, नव्या कहाण्या नवस्फूर्तीने गाऊ ।। १ ।।

नसति भाषणे जीवन ध्येये ही तर अमुची सारी
यत्न शिंपुनी फुलवू क्षेत्रे कर्तृत्वाची न्यारी
इतिहासाची दिशा पालटू महान मानव घडवू ।। २ ।।

कधी न रुसणे, कधी न रडणे, ना कधी थकणे, सदा पुढे चालणे
एकचि निश्चय झाला अमुचा राष्ट्र पुन्हा उभविणे
दुर्गमतेची तमा न आम्हा पाऊल पुढेच ठेवू ।। ३ ।।

निश्चय, निष्ठा, नीती यांचे कंकण बांधुन हाती
व्रतस्थ होउनि व्यापुनि टाकू विश्वाच्याही मिती
विश्वविजेते हिंदुराष्ट्र ते पुन्हा जगाला दावू ।। ४ ।।

सौर दिनदर्शिका
शके १९३५

एप्रिल	२०१३	चैत्र/वैशाख
सो.	1	११
मं.	2	१२
बु.	3	१३
गु.	4	१४
शु.	5	१५
श.	6	१६
र.	7	१७
सो.	8	१८
मं.	9	१९
बु.	10	२०
गु.	11	२१
शु.	12	२२
श.	13	२३
र.	14	२४
सो.	15	२५
मं.	16	२६
बु.	17	२७
गु.	18	२८
शु.	19	२९
श.	20	३०
र.	21	वै. १
सो.	22	२
मं.	23	३
बु.	24	४
गु.	25	५
शु.	26	६
श.	27	७
र.	28	८
सो.	29	९
मं.	30	१०

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
या अंकाची किंमत : ₹ २५/-
वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-
प्रकाशन दिनांक :
सौर ११ चैत्र, शके १९३५
१ एप्रिल २०१३
www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -